# कुंभारांना कौशल्य विकासासाठी पाच एकर जागा

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा.



ना. चंद्रशेखर बाबनकुळे, ना. पंकज भोयर यांचा भव्य सत्कार करताना रमाकांत क्षिरसागर, संजय प्रजापति, संजयराव गाते, संजय जोर्ले, उत्तम मांजरमकर, संतोष कुंभार व मान्यवर




ना. बावनकुळे यांना सन्मानपत्र प्रदान करताना मरकड, उमाजी सुर्यवंशी, संजय जोर्ले, ज्ञानेश्वर म्हस्के व मान्यवर



जगातील सर्वांत कमी उंचीची महिला ज्योती आमगे हिच्या पुस्तकाचे प्रकाशन ना. बावनकुळे यांचे हस्ते संपन्न डावीकडून मोहनराव जगदाळे, संजयजी जोर्ले व इतर मान्यवर



कुंभार समाजास संबोधित करताना महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बाबनकुळे

**नागपूर :** 'पारंपरिक कुंभार व्यवसायाचे पुनरुज्जीवन आणि समाजबांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे. समाजाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करून त्यांचे ऋण फेडण्याचा हा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. या अंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पारंपरिक कुंभार व्यवसाय व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रासाठी पाच एकर जागा दिली जाईल', अशी घोषणा महसूलमंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी केली.

सकल कुंभार समाज विकास परिषदेतर्फे रेशीमबाग येथील महात्मा जोतिराव फुले सभागृहात राज्यव्यापी कृतज्ञता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. व्यासपीठावर राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर तसेच कुंभार समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते. कुंभार समाजबांधवांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले, 'नागपूरसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पारंपरिक कुंभार व्यवसाय व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रासाठी पाच एकर

जागा दिली जाईल. कुंभार महिला बचतगटांना व्यवसायासाठी अडीच एकर जागा आणि एक लाख रुपयांचे भांडवली अनुदान मिळेल. संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्ड तातडीने कार्यान्वित करून त्यांच्या तेर या जन्मस्थानाचा विकास आराखडा तयार केला जाईल. ग्रामीण भागातील व्यावसायिकांना माफक दरात इंधन उपलब्ध करून दिले जाईल.' पूर्वीचे जाचक शासकीय परिपत्रक रद्द करून सुलभ व समाजहिताचे नवीन परिपत्रक जारी केल्याबद्दल परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय व पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्र्यांचे आभार मानले. कार्यक्रमाला भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, माजी आमदार सुधाकर कोहळे यांच्यासह राज्यातील समाजबांधव व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन चंदनलाल प्रजापती यांनी केले. आभार सुभाष तेटवार यांनी मानले.

***

# गोवा प्रमाणे मातीच्या मूर्तींना अनुदान द्या - पारंपारिक मूर्तिकारांची मागणी



मातीच्या मुर्तीकार संघाचे अध्यक्ष सुरेश पाठक यांनी गणपती मुर्ती ना. बावनकुळे यांना भेट दिली याप्रसंगी संजय गाते, चंदन प्रजापति आणि मुर्तीकार उपस्थित होते

**नागपूर :** पर्यावरणपूरक सण साजरे करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने गोवा राज्याच्या धर्तीवर मातीच्या मूर्ती तयार करणाऱ्या पारंपारिक मूर्तिकारांना प्रति मूर्ती अनुदान देण्याची योजना तातडीने लागू करावी, अशी मागणी रेशीमबाग येथे आयोजित कृतज्ञता मेळाव्यात सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेश अध्यक्ष संजय गाते यांच्या नेतृत्वात पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघाच्या शिष्टमंडळाने मातीचा सप्तमृत्तीका गणेश भेट देऊन महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्याकडे केली आहे.

संघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाठक यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, सर्वोच्च न्यायालय आणि राज्य शासनाच्या निर्देशांमुळे विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात गणेश, दुर्गा, लक्ष्मी यांच्या मातीच्या मूर्तींची निर्मिती मोठ्या प्रमाणात होते.

मात्र मातीच्या मूर्ती बनवणे ही कौशल्यपूर्ण, श्रमप्रधान आणि खर्चिक प्रक्रिया आहे. त्यामुळे POP च्या स्वस्त मूर्तींची मागणी वाढते आणि त्यामुळे जलप्रदूषणासह जलचरांना धोका निर्माण होतो व विसर्जनानंतर मूर्तींची विटंबना झाल्याने नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात व यामुळे सांप्रदायिक सौहार्द बिघडण्याची स्थिती निर्माण होते.

**गोवाचा आदर्श :** निवेदनात गोवा सरकारच्या २००८ पासून सुरू असलेल्या योजनेचा दाखला देण्यात आला. गोव्यात मातीच्या मूर्ती बनवणाऱ्या प्रत्येक मूर्तिकाराला प्रति मूर्ती २०० रुपये अनुदान दिले जाते. त्यामुळे तेथे मातीच्या मूर्तींचे उत्पादन वाढले, मूर्तिकारांना आर्थिक आधार मिळाला आणि POP मूर्तींवर प्रभावी नियंत्रण आले आहे.

**रोजगार वाचवा, पर्यावरण वाचवा :**

पाठक म्हणाले, पीओपी मूर्ती कारखान्यांना राजकीय पाठबळ दिल्याने पारंपारिक कलेचा ऱ्हास होऊन हजारो पारंपारिक कुंभार आणि मूर्तिकारांचे कुटुंब बेरोजगार होण्याच्या मार्गावर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'Mission Life' आणि 'वोकल फॉर लोकल' चा नारा दिला आहे. त्याला प्रतिसाद म्हणून राज्य शासनानेही पर्यावरणपूरक मूर्तीला प्रोत्साहन व राजाश्रय द्यावे. व अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**योजनेचे फायदे :** संघटनेनुसार या योजनेमुळे

१) पर्यावरणपूरक मूर्तींना चालना.
२) पिओपी मूर्तीचा वापर बंद होईल.
३) जलप्रदूषण थांबेल.
४) पारंपारिक रोजगाराचे संरक्षण होईल.
५) युवा पिढीचे शिल्पकलेकडे आकर्षण वाढेल आणि
६) महाराष्ट्र पर्यावरणपूरक उत्सवात आदर्श राज्य बनेल.

निवेदन देताना शिष्टमंडळात संघाचे पदाधिकारी चंदनलाल प्रजापती, रामेश्वर चौधरी, गजानन बुरबादे, अनिल ठाकरे, नाना कोटंगले, गोविंदा कपाट, नरेश खांदारे, सुनील कोलूरवार, मनोज वरवाडे, योगेश वझे, राजेश चिकाणे, नितीन माहुलकर, निशांत प्रजापती सह मोठ्या संख्येने मूर्तिकार उपस्थित होते.

***

## आश्वासन - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती; समाजातर्फे मागणीचे निवेदन सादर
# कुंभार समाज महिला बचत गटासाठी प्रत्येक जिल्ह्यात अडीच एकर जागा



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देताना कुंभार समाजाचे प्रतिनिधी.

**मातीकला बोर्डाला निधी द्या. मातीकला बोर्डाची स्थापना २०१९ मध्ये झाली असून त्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, बोर्डाचे कामकाज ठप्प आहे. किमान ५० कोटींचा निधी देऊन बोर्ड कार्यान्वित करावा तसेच श्री संत शिरोमणी गोरोबा काका कुंभार माती कला आर्थिक विकास महामंडळ तातडीने सुरू करावे.**

**रमाकांत क्षीरसागर, प्रदेशाध्यक्ष,**
**कुंभार समाज सामाजिक संस्था**

**नागपूर :** महिला बचत गटांना प्रत्येक जिल्ह्यात अडीच एकर जागा आणि एक लाख रुपयांचे अनुदान देण्याचा शासन निर्णय झाला असून, कुंभार समाजानेही यासंदर्भातील प्रस्ताव घेऊन मंत्रालयात यावे, असे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नागपूर येथे कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या शिष्टमंडळाशी झालेल्या भेटीत त्यांनी हे आश्वासन दिले.

संस्थेचे प्रदेशाध्यक्ष रमाकांत क्षीरसागर व जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बावनकुळे यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यामध्ये कुंभार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी गोरोबा काका कुंभार माती कला आर्थिक विकास महामंडळाला मंजुरी देऊन ते तातडीने कार्यान्वित करावे, तसेच माती कला बोर्डासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय पेसा नियम २०१४ मुळे माती उचलण्यावर आणि पारंपरिक माती कला व्यवसायावर येणाऱ्या अडचणींचाही मुद्दा शिष्टमंडळाने उपस्थित केला. माती उत्खनन परवाना मिळविण्यासाठी ग्रामसभेची अट शिथिल करावी, अशी मागणी करण्यात आली. विटा, कौले, सणासुदीच्या वस्तू व मूर्ती निर्मितीसाठी दरवर्षी ७०० ब्रासपर्यंत स्वामित्वधन माफ असतानाही अनेक ठिकाणी दंड आकारला जात असल्याची तक्रारही करण्यात आली.

यावर बावनकुळे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत कुंभार समाजाच्या मागण्यांबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. संबंधित प्रश्नांवर सकारात्मक विचार करून शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

---

# नागपुरात कुंभार समाजाची शक्तीप्रदर्शन सभा.
## एकजुटीचा निर्धार, मागण्यांवर सरकारचे सकारात्मक आश्वासन
## समाज हितासाठी कुंभार समाजाच्या विविध संघटना आल्या एका मंचावर

नागपुरात पार पडलेल्या कुंभार समाजाच्या कृतज्ञता सोहळ्यात राज्यभरातील विविध संघटनांनी एकाच मंचावर येत समाज एकजुटीचा बुलंद संदेश दिला.

यावेळी रमाकांतजी क्षीरसागर, संजय जोरले, उत्तमराव मांजरमकर, विजयराव देवडे, सौ. रसिकाताई खेडेकर, कल्याणराव कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाजाच्या विविध मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या माध्यमातून ७०० ब्रास रॉयल्टी माफीचा शासन निर्णय झाल्याबद्दल समाजाने कृतज्ञता व्यक्त केली. तसेच कुंभार कला कौशल्य विकास कार्यक्रमासाठी पाच एकर शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचेही आश्वासन देण्यात आले. प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

अकोला जिल्ह्यातून जिल्हाध्यक्ष संजय वाडकर यांच्या नेतृत्वाखाली पुंडलीकराव वनकर, प्रा. दिलीप अमुरकर, रामचंद्र मेहरे, राजेंद्र चांदुरकर, सुरेशराव वलीवकर, मनोज बनचरे, दिलीप इंगळे, राजुभाऊ वाडकर, अर्जुनराव जवंजाळ, मदन प्रजापती, नितीन मेहरे, महादेवराव लाहुडकर, अतुल वाडकर, गोपाळ सोनोने, विनोद मदनकार, रामदास आयस्कर, शुभम सोनोने यांच्यासह शामशेठ राजे, दत्ताजी कुंभार, मोहन जगदाळे मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

समारोपावेळी प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी अकोला जिल्ह्याच्या उल्लेखनीय सहभागाबद्दल जिल्हाध्यक्ष संजय वाडकर व त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन करून आभार मानले.

***

# मा. ना. चंद्रशेखरजी बावनकुळे जनतेच्या वेदनांप्रती संवेदनशील महसूल मंत्री

**- शरद वाडेकर**

नुकतेच दीड वर्ष पूर्ण झालेय, मा.ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी महाराष्ट्र शासनाच्या महसूल मंत्रीपदाची धुरा सांभाळल्याला. मात्र या अल्प कालावधीत **सर्वसामान्य जनतेच्या महसूल खात्याशी संबंधित अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या आणि त्यामुळे वेदनादायी झालेल्या अनेक जिव्हाळ्याच्या समस्या त्यांनी सोडविल्या आहेत. त्यामुळे त्यांचे कार्यकाळात महसूल प्रशासनाची प्रतिमा लोका–भिमुख, उद्योगस्नेही व गतिमान म्हणून उंचावली आहे.** महाराष्ट्रात सर्वदूर लाखो कुटुंबांना आणि कोट्यवधी नागरिकांना याचा लाभ झाला आहे. मागील दीड वर्षांतील त्यांनी घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि राबविलेले उपक्रम यांच्या खाली दिलेल्या गोषवाऱ्यावर नजर जरी टाकली तरी हे स्पष्ट होते.

१) अकृषिक वापरासाठी परवानगी असलेल्या अधिसूचित क्षेत्रातील जमिनींबाबत १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ कालावधीत तुकडेबंदी कायद्याविरुद्ध झालेले व्यवहार/विभाजन कोणतेही शुल्क न आकारता विनामूल्य नियमित प्राथमिक अंदाजा–नुसार याचा लाभ राज्यातील सुमारे पन्नास लाख कुटुंबांना मिळाला आहे.

२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत नियोजन प्राधिकरणाने एखाद्या जमिनीवर विकास परवानगी देणे/बांधकाम आराखडे मंजूर करणे अनुज्ञेय असल्यास जिल्हाधिकारी यांच्या स्वतंत्र अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही. अकृषिक रूपांतरणाचा भाग असलेली सनद प्रणाली संपुष्टात आणणे, जुन्या अकृषिक आकारणी व रूपांतरण कराऐवजी आता एक वेळचे अधिमूल्य भरण्याची सोपी व्यवस्था करण्यात आली आहे.

३) केंद्र व राज्य शासनाचे 'सर्वांसाठी घरे' हे धोरण विचारात घेऊन विशिष्ट अटींवर राज्यातील मुंबई शहर, मुंबई उपनगर हे जिल्हे आणि पुणे महानगरपालिका क्षेत्र व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर जिल्ह्यामधील दि. ०१.०१.२०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमित करण्याचे शासन निर्णय.

४) भोगवटादार वर्ग २ मधील जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करणे.

महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्टयाने/कब्जेहक्काने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करणे) नियम २०२५ दिनांक ४ मार्च २०२५ व शुद्धिपत्रक दि. ६ मार्च २०२५ आणि त्या अनुषंगाने शासन परिपत्रक दि. २० ऑगस्ट २०२५ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचना.

५) जिवंत सातबारा मोहीम टप्पा १ आणि टप्पा २.

दिनांक १९.०३.२०२५ च्या शासन निर्णयानुसार मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी करण्याच्या दृष्टीने 'जिवंत सातबारा मोहीम' राबविण्यात आली (टप्पा १) आणि ३०.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये कालबाह्य व अनावश्यक नोंदी सातबारावरून कमी करून सातबारा अधिक स्पष्ट आणि सुटसुटीत करणेची मोहीम राबविणेत आली (टप्पा २). यामुळे जमिनीच्या मालकी हक्काचे उद्भवणारे वाद कमी होण्यास मदत होईल तसेच शासकीय योजना आणि विकास कामांसाठी जमिनीची अचूक आकडेवारी उपलब्ध होईल.

६) कुंभार समाजाच्या व्यक्तींना पारंपारिक व्यवसाय करण्यासाठी सोयी उपलब्ध करून देणे, शासन निर्णय दि. १०.०६.२०२६.

७) राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजने अंतर्गत शासकीय जमीन चारा/बांबू पिकासाठी भाडेपट्ट्याने देणेबाबतचे धोरण. शासन निर्णय दि. १९.०६.२०२६.

नोंदणीकृत पात्र महिला, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विधवा महिलांचा बचतगट, उमेद/माविम अंतर्गत येणारे महिला बचतगट तसेच ग्रामसंघ यांना रोजगार संधी, दुग्धव्यवसाय बळकटी, शासकीय जागांचे अतिक्रमणापासून संरक्षण, चारा, बांबू, नर्सरी, अपारंपरिक ऊर्जास्रोतांसाठी कच्च्या मालाचे उत्पादन या उद्देशांनी शासकीय जमिनी ३ वर्षांसाठी (बांबू पिकासाठी १० वर्षासाठी) नाममात्र दराने भाडेपट्टयाने देणेची तरतूद.

८) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान, या अभियानाचे माध्यमातून सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रश्नांचे/तक्रारींचे निराकरण करणेत आले आहे.

९) शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडीमार्गाचे सीमांकन करून त्यांना विशिष्ट क्रमांक देणे, शेतरस्ता देणे व त्याबाबत ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क सदरी नोंद घेणेबाबत क्षेत्रीय अधिकारी/प्राधिकारी यांना दिशानिर्देश. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना.

१०) महसूल विभागामार्फत जनतेला दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले व विविध प्रकारच्या सेवांसाठी जीपीआर संकल्पनेचा वापर करून सुलभता आणली आहे. तसेच कार्यक्षम परिणामकारक व गतिमान प्रशासनासाठी महसूल विभागांतर्गत राज्यभर सात संगणक प्रणाली लागू केल्या.

११) एकाहून अधिक सहधारक असलेल्या जमिनीच्या हिश्याच्या विभाजनाकरिता मोहीम. कौटुंबिक वाटणीची जमीन मोजणी प्रति पोटहिस्सा दोनशे रुपयांत.

१२) देवराईच्या संरक्षण व संवर्धनासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करणारा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

१३) राज्यातील देवस्थान इनाम जमिनींबाबत अधिनियमाचे प्रारूप तयार करायची प्रक्रिया सुरू केली आहे.

१४) नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या स्थापनेस प्रशासकीय मंजुरी.

**मा. मंत्रीमहोदयांचे कार्यकाळात एखाद्या समस्येवर उपाय योजना करताना अनुषंगिक समस्यादेखील विचारात घेऊन सर्वसमावेशक उपाययोजना करणेवर भर जाणवतो.** अगदी अलीकडचे उदाहरण **'कुंभार समाजाच्या व्यक्तींना पारंपारिक व्यवसाय करण्यासाठी सोयी उपलब्ध करून देण्याबाबत'**चा महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचा **शासन निर्णय १० जून २०२६ रोजी निर्गमित झाला आणि महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेल्या कुंभार समाजात उत्साह आणि चैतन्य निर्माण झाले आहे.**

कुंभार समाजास पारंपरिक व्यवसाय करताना अलीकडच्या काळात माती उपलब्ध होताना, आवा/भट्टीसाठीचे इंधन उपलब्ध होताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच परप्रांतातून येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञान वापरून बनविलेल्या मालाशी स्पर्धा करावी लागत आहे. यामुळे कुंभार कलाकारांमध्ये बेरोजगारी आणि दारिद्र्याचे प्रमाण वाढले आहे. त्यातच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक ८ मे २०१९ अन्वये 'श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डाची स्थापना करणेबाबत'चा शासन निर्णय निर्गमित केला, मात्र त्या अनुषंगाने मागील सात वर्षात पुढे काहीच कार्यवाही झाली नाही. **त्यामुळे सूर्य उगवला पण प्रकाश पडलाच नाही असा विदारक अनुभव कुंभार समाजास येऊन समाज निराश व नाउमेद झाला होता. या पार्श्वभूमीवर १० जून २०१६ चा हा शासन निर्णय कुंभार समाजासाठी दिलासादायक, चैतन्यदायी व सुखद अनुभव आहे.**

या शासन निर्णयातील पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुंभार समाजाच्या कुटुंबास वर्षाला सातशे ब्रासपर्यंतच्या मर्यादित काढलेल्या मातीवर स्वामित्वधन माफ असेल या तरतुदीवर सर्वाधिक चर्चा होत असली तरी **कुंभार समाजाच्या आजवर उपेक्षित अशा पारंपारिक व्यवसायाशी निगडित अनेक अडचणींची दखल घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचे प्रामाणिक प्रयत्न या शासन निर्णयात स्पष्टपणे जाणवतात** हे या शासन निर्णयाचे खास उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे.

या शासन निर्णयात लाभ मिळणेसाठीची कार्यपद्धती स्पष्टपणे नमूद केली आहे. पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कुंभार समाजाच्या व्यक्तींनी करायची पूर्तता, कुंभार समाजाच्या अधिकृत संघटनांकडून अपेक्षित सहाय्य, शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या या शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद आहेत.

कुंभार समाजातील व्यक्तीना पारंपरिक व्यवसायासाठी ज्या ज्या जमिनीतून/स्रोतांतून माती उपलब्ध होऊ शकते त्याची माहिति तालुक्यातील कुंभार व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडून प्राप्त करून घेऊन सदर जमिनीचा जिल्हा गौण खनिज आराखड्यामध्ये समावेश करणेची तरतूद लोकाभिमुख आहे. गावतळी, पाझर तलाव, बंधारे, पाणलोट क्षेत्र, जलसंधारणाचे प्रकल्प, जलसंपदा विभागाचे तलाव यांमधून गाळ/माती काढणेसाठी अशा जिल्हा गौण खनिज आराखड्यामध्ये समावेश करणेची आवश्यकता नसलेचे शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद असून त्याबाबतची कार्यपद्धतीदेखील विषद केली आहे. खाजगी मालकीच्या क्षेत्रातून माती काढणेची कार्यपद्धतीदेखील सविस्तर नमूद केली आहे.

महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेल्या पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या पिढीजात कुंभार समाजाची व्यक्ती राज्यात कोठेही या शासन निर्णयातील सवलतीचा लाभ घेण्यास पात्र असेल अशी सोयीस्कर तरतूद या शासन निर्णयात आहे. मात्र त्याचवेळी या तरतुदीचा गैरवापर होऊ नये म्हणून कुंभार समाजाच्या व्यक्तीस ओळखपत्रासाठी 'महाखनिज' या संगणक प्रणालीवर संबंधित तहसीलदार यांजकडे अर्ज करणे बंधनकारक केले आहे. असे ओळखपत्र पाच वर्षांसाठी वैध असेल आणि त्यानंतर पुन्हा पाच वर्षांसाठी त्याचे नूतनीकरण करता येईल. त्याचप्रमाणे असे ओळखपत्र प्राप्त केलेल्या कुंभार समाजाच्या व्यक्तीस माती उत्खनन परवाना मागणी करणारा अर्ज 'महाखनिज' या संगणक प्रणालीवर करणे बंधनकारक केले आहे. माहे नोव्हेंबर ते जून कालावधीत परवाने देण्याची तरतूद.

पिढीजात कुंभार समाजाच्या कुटुंबास विटा, कौले किंवा इतर वस्तू तयार करण्यासाठीच्या प्रयोजनार्थ महसूल विभागाशी संबंधित असलेल्या परवानग्या मिळणे सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी यांनी एक खिडकी योजना तयार करून उपलब्ध करून देण्याची तरतूद या शासन निर्णयात आहे. माती वाहतुकीसाठी मोफत इ-टीपी सुविधा, कुंभार क्लस्टर निर्मितीची तरतूद, पारंपरिक कुंभारखाणींच्या संरक्षणाची तरतूद, वीटभट्टी व्यवसायासाठी विशेष सवलती, सवलतीच्या दरात फ्लाय ऐश (राख) उपलब्धता ही या शासन निर्णयाची इतर वैशिष्ट्ये आहेत.

मा. ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी महाराष्ट्र शासनाचे महसूल मंत्री म्हणून मागील दिड वर्षात घेतलेले उपरोक्त शासन निर्णय आणि राबविलेले उपक्रम याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्रीमहोदय मा. ना. देवेंद्रजी फडणवीस, महाराष्ट्र शासनाचे सन्माननीय दोन्ही उपमुख्य मंत्रीमहोदय, राज्य मंत्रिमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, राज्यमंत्री महोदय मा. ना. डॉ. पंकजजी भोयर, महसूल विभागाचे संबंधित प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांनादेखील धन्यवाद दिले पाहिजेत.

***

# प्रजापति कम्युनिटी सर्विस फाऊंडेशन द्वारे प्रेस कॉन्फ्रन्स



प्रजापती समाजाने भविष्यातील निवडणुकांमध्ये आपल्या सुमारे ९ कोटी लोकसंख्येसाठी सर्व राजकीय पक्षांकडून प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या आधारावर तिकिटांची मागणी केली. अध्यक्ष राजेश प्रजापती यांनी राजकीय सशक्तीकरणासाठी सामाजिक उत्थान प्रशिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली: चर्चेसाठी भाजप, काँग्रेस आणि समाजवादी पार्टी यांना पत्रे लिहिल्याची पुष्टी केली तसेच माननीय विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासोबत काही बैठका झाल्या आहेत.

**नवी दिल्ली, २९ जून २०२६:** प्रजापती/कुंभार समुदायाने आपल्या अखिल भारतीय संघटना प्रजापती कम्युनिटी सर्व्हिस फाउंडेशन (पी.सी.एस.एफ.)च्या माध्यमातून दिल्लीत राजकीय क्षेत्रात पदार्पण करु इच्छिणाऱ्या समुदाय प्रतिनिधींसाठी सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले, ज्यामध्ये २०२७ मध्ये विधानसभा निवडणुका होणाऱ्या राज्यांमधून सुमारे ५५ प्रतिनिधी सहभागी झाले होते. समुदायातील ज्येष्ठ राजकारण्यांनी आपल्या ज्ञान आणि अनुभवाच्या माध्यमातून इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन केले.

फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश प्रजापती म्हणाले, ''प्रजापती/कुंभार समुदायाची लोकसंख्या संपूर्ण भारतात सुमारे ९ कोटी अंदाजित आहे, परंतु राजकीय प्रतिनिधित्वाच्या अभावामुळे आमच्याकडे सामाजिक मान्यतेचा अभाव आहे. या परिस्थितीचे निराकरण करण्यासाठी, फाऊंडेशनने उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, दिल्ली आणि गोवा येथून सुमारे ५५ प्रतिनिधींसाठी अशा प्रकारचा पहिला सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट मेंटरिंग प्रोग्राम आयोजित केला. या कार्यक्रमाद्वारे, आम्ही असे नेते तयार करू जे प्रत्येक लोकशाही संस्थेत आमचा आवाज उठवू शकतील. आम्ही मागणी करतो की राजकीय पक्षांनी गाव, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर प्रजापती/कुंभार उमेदवारांना प्रमाणशीर लोकसंख्येच्या आधारावर निवडणूक तिकिटे वाटप करावीत.''

प्रजापती कम्युनिटी सर्व्हिस फाउंडेशन (पी.सी.एस.एफ.) ने निष्पक्ष प्रतिनिधित्वाची मागणी करत भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि समाजवादी पार्टी यांना औपचारिक पत्रे पाठवली आहेत. फाउंडेशनच्या नेतृत्वाने संपूर्ण भारतातून आलेल्या प्रतिनिधींसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसद्वारे राजकीय सशक्तीकरणाच्या माध्यमातून समुदायाच्या सामाजिक उत्थानावर चर्चा करण्यासाठी राहुल गांधी यांच्यासोबत आधीच काही बैठका घेतल्या आहेत.

शिक्षणाच्या प्रचंड खर्चाचा सामना करण्यासाठी, प्रजापती कम्युनिटी सर्व्हिस फाउंडेशनने २०२४ मध्ये प्रजापती/कुम्हार/कुंभार/कुमावत/कुलाल इ. समुदायातील आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबातील शैक्षणिकदृष्ट्या गुणवंत विद्यार्थ्यांना समर्थन देण्याच्या उद्देशाने आपला आर्थिक सहाय्य कार्यक्रम सुरू केला. आजपर्यंत, फाउंडेशनने भारतातील १० राज्यांमधील ५० विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित शैक्षणिक संस्थांना थेट कॉलेज फी पाठवून सहाय्य प्रदान केले आहे. लाभार्थी मेडिकल, पॅरामेडिकल, इंजिनिअरिंग, लॉ, एमबीए, टीचिंग, पोस्ट ग्रॅज्युएशन, पी.एच.डी. आणि इतर विशेष प्रोफेशनल डिग्री घेत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार लक्षणीयरीत्या कमी झाला आहे, ज्यामुळे ते शैक्षणिक उत्कृष्टता आणि करिअर विकासावर लक्ष केंद्रित करू शकत आहेत. फाउंडेशन १,००० विद्यार्थ्यांना समर्थन देण्याच्या दीर्घकालीन दृष्टीकोनासह या कार्यक्रमाच्या विस्तारासाठी वचनबद्ध आहे, ज्यामुळे एक कुशल, स्वावलंबी आणि सशक्त पिढी निर्माण होण्यास हातभार लागेल.

राजेश प्रजापती पुढे म्हणाले, ''प्रजापती/कुम्हार समुदायाने सामाजिक सशक्तीकरणासाठी एक मजबूत आणि सक्रिय सहभाग घेण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणून, समुदायाने २०२७ मध्ये विधानसभा निवडणुकांसाठी निश्चित झालेल्या राज्यांमध्ये विविध राजकीय पक्षांकडून किमान २० उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही किमान ५ उमेदवार देखील तयार करत आहोत जे २०२९ मध्ये लोकसभा निवडणूक लढवतील.'' प्रजापती समुदाय, जो अनेक राज्यांमध्ये ओ.बी.सी. म्हणून मान्यताप्राप्त आहे तर मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यांमध्ये एस.सी. आणि बिहारमध्ये ई.बी.सी. म्हणून वर्गीकृत आहे, त्याने आता राजकीय नेतृत्वासाठी आपले प्रयत्न गांभीर्याने सुरू केले आहेत. समुदायाची अखिल भारतीय उपस्थिती, प्रत्येक गावात खोलवर रुजलेली सांस्कृतिक मूळे आणि कारागीर, शेतकरी आणि उद्योजकांच्या मजबूत नेटवर्कसह, समुदाय राजकीयदृष्ट्या कमी प्रतिनिधित्व असूनही मोठ्या प्रमाणावर सामाजिक कल्याण उपक्रमांचे नेतृत्व करण्याची सामूहिक शक्ती आणि संघटनात्मक क्षमता बाळगतो.

**प्रजापती कम्युनिटी सर्व्हिस फाउंडेशन बद्दल माहिती :**

प्रजापती कम्युनिटी सर्व्हिस फाउंडेशनची स्थापना १८ एप्रिल २०२४ रोजी झाली होती आणि ते कंपनी कायद्याच्या कलम ८ अंतर्गत एक धर्मादाय ट्रस्ट म्हणून नोंदणीकृत आहे. फाउंडेशनकडे ८० जी., १२ ए., सी.एस.आर.-१ आणि एल.ई.आय. प्रमाणपत्रे आहेत. फाउंडेशनचा दृष्टीकोन स्वावलंबी आणि समृद्ध प्रजापती/कुम्हार/कुंभार/कुमावत/कुलाल इ. समुदाय निर्माण करणे आहे जे केवळ सामंजस्याने एकमेकांना समर्थन देणार नाहीत तर राष्ट्राच्या प्रगतीचा कणा बनतील. गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य कार्यक्रम संपूर्ण भारतात सक्रिय आहे, ज्याने आजपर्यंत ५० विद्यार्थ्यांना सहाय्य पूर्ण केले आहे. शिक्षण, महिला सशक्तीकरण आणि बिझनेस नेटवर्किंगद्वारे सामाजिक उत्थानाचे कार्यही फाऊंडेशन मार्फत चालू आहे.

# पणजी येथे भारत प्रेरणा नॅशनल अवॉर्ड सतीशशेठ कुंकळेकर यांना प्रदान करण्यात आला

– कैलास उत्तुरकर, सचिव, गोवा कुंभार समाज महासंघ



सतीश कुंकळेकर



सौ. सुनिता व सतीश कुंकळेकर



दिप प्रज्वलन करताना सतीश कुंकळेकर व मान्यवर

पोर्तुगीजांच्या राजवटीत गोव्यातील कुंभार समाज संघटीत करणे अशक्य होते. तरीही सतीश कुंकळेकर यांचे मोठे काका स्वर्गीय महादेव बाबी कुंकळेकर यांनी ८ सप्टेंबर १९७४ रोजी कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी एक पत्रक काढून स्वतःच्या निवासस्थानी कुंभार समाजाची बैठक घेतली आणि गोमंतकात म्हणजे गोवा राज्यात कुंभार समाज कार्याला सुरुवात केली. आणि हीच परंपरा अखिल भारतीय कुंभार समाजाचे अध्यक्ष सतीश कुंकळेकर संपूर्ण देशात चालवत आहेत. अखिल भारतीय कुंभार समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश कुंकळेकर हे कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी आणि संघटनात्मक बळकटीसाठी कार्य करणारे एक दूरदृष्टी असलेले नेतृत्व आहे. त्यांच्या गौरवशाली इतिहासामुळे आणि समाजासाठी केलेल्या कार्यामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. कुंभार समाजाची परंपरा जपत आधुनिक समाजाला एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. चांगले काम करणाऱ्यांचे नेहमी कौतुक होत असते. सतीश कुंकळेकर यांचे मोठे काका कै. महादेव कुंकळेकर यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना गोमंतकीय म्हणजे गोवा राज्याने राष्ट्रपती विभूषीत गोमंतकीय शिल्पकार म्हणून १९६१ साली पद्मश्री पुरस्कार देऊन भव्यदिव्य सत्कार करून गौरविले होते. या शिल्पकार बांधवांनी अनेक कुंभार बांधवांना मूर्तीकलेचे शिक्षण देऊन नावारूपाला आणले. त्यांचे अनेक शिष्य वेगवेगळ्या ठिकाणी आजही काम करत आहेत. सिंधुदुर्गात राज्य पुरस्कार प्राप्त सावंतवाडीचे विलास मांजरेकर हेही त्यांचे शिष्य असून त्यांनीही मूर्तीकलेतून नावलौकीक प्राप्त केले आहे. ते सुद्धा कुंभार बांधवांना मूर्तीकलेचे शिक्षण आणि मार्गदर्शन करत आहेत.

अखिल भारतीय कुंभार संघटनेची एकत्रित पद्धत (Networking) मजबूत करण्यासाठी सतीश कुंकळेकर यांनी देशातील विविध राज्यांमध्ये संपर्क वाढवला. समाजातील प्रत्येक घटकाला जोडून एक सशक्त संघटना म्हणून काम करण्याचे त्यांचे ध्येय आहे. गोवा राज्यात त्यांनी संत गोरोबा उत्कर्ष मंडळाची स्थापना करून समाजाला एक नवीन दिशा दिली. अशावेळी त्यांना विष्णु कुंभार गुरुजी आणि नारायण चंदगडकर आणि सहकारी यांची चांगली साथ मिळाली. त्यामुळे कुंभार समाजाचे काम जोमाने सुरू झाले. आता तर गोवा राज्यात कुंभार समाज चांगल्या पद्धतीने संघटीत झाला असून या मंडळाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जात आहेत. गोवा कुंभार समाजाच्या संघटनेच्या सुरुवातीच्या काळात सतीश कुंकळेकर यांनी मोठे कष्ट घेतले. अनेक वर्षे त्यांनी गोवा राज्याच्या भौगोलिक स्थितीचा विचार करून प्रत्येक भागात कुंभार समाजाची ग्रामशाखा स्थापन करून २१ ठिकाणी कुंभार समाजाचे काम चालू केले. गोवा कुंभार समाजाचे काम चांगल्या पद्धतीने चालत असल्यामुळे त्यांनी गोव्यात अखिल गोवा कुंभार समाज महासंघाची योग्यवेळी स्थापना केली. त्यांचे हे कार्य गोव्यापुरते मर्यादित न राहता राष्ट्रीय पातळीवर त्यांनी प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ या भागात संपर्कात राहून चालू ठेवले.



मान्यवरांसमवेत सतीश कुंकळेकर व मान्यवर

अखिल भारतीय प्रजापती महासंघ दिल्ली या रजिस्टर संस्थेच्या कार्यकारिणीची बैठक ३० जून २०२४ रोजी इंदूर (मध्यप्रदेश) येथे संपन्न झाली. ही बैठक कोकण गोव्यासाठी ऐतिहासिक ठरली. या बैठकीत सतीश कुंकळेकर यांच्या कामाची दखल घेत त्यांना एक मताने राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जाहीर करण्यात आले. तसे नियुक्तीपत्रही देण्यात आले. संपूर्ण कोकण, गोवा, कारवार मधील कुंभार बांधवांसाठी ही भाग्याची गोष्ट आहे.

उद्योग क्षेत्रातही कुंकळेकर कुटुंबियांनी नावलौकीक प्राप्त केले आहे. समाजाचे काम करताना त्यांनी आपल्या उद्योग क्षेत्रात दुर्लक्ष केले नाही. या क्षेत्रातही त्यांनी प्रगतीचा आलेख वाढवतच ठेवला. त्यांचे आजही मडगाव मधे एम.बी. ट्रेडर्स, शांताप्रसाद होम इंडस्ट्रीज, हॉटेल गोवा लॅन्ड, मेसर्स कुंकळेकर ट्रेडींग कंपनी असे प्रसिद्ध उद्योग सुरू आहेत. त्यामुळे त्यांना समाजासाठी काम करताना समाजाच्या चांगल्यासाठी आर्थिक खर्च करता आला. त्यांच्या दानशूर वृत्तीची प्रचिती अनेक वेळा आली. शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य या समाजाच्या कामासाठी त्यांनी अनेक वेळा कुंभार बांधवांना मदत केली आहे. अखिल भारतीय कुंभार समाज महासंघाचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी महासंघाचे मुंबईत कार्यालय सुरू केले. कार्यालयासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले.

सतीश कुंकळेकर यांचे सामाजिक काम बघून त्यांना राजकारणात ओढण्याचाही प्रयत्न झाला. त्यावेळचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय मनोहर पर्रिकर हे भाजपतर्फे सतीश कुंकळेकरांसाठी आमदारकीचे तिकीट घेऊन आले होते. त्यावेळी त्यांनी मी समाजाचे काम करतो आणि माझे व्यवसाय आहेत त्यामुळे मी राजकारणात वेळ देऊ शकत नाही असे सांगून त्यांनी स्पष्ट नकार दिला. असा निस्वार्थी माणूस कुठेही शोधून सापडणार नाही. कुंभार समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य बांधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांचा विशेष प्रयत्न आहे. समाजातील शैक्षणिक आणि सामाजिक कामांची घोडदौड सुरू ठेवत त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि मदत केली आहे.

उद्योग क्षेत्रातील त्यांच्या मोठ्या अनुभवाचा समाजाला मोठा फायदा होत आहे. उद्योग क्षेत्रातील त्यांच्या अनुभवामुळे समाजातील युवकांना रोजगार आणि व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होत आहे. दूरदृष्टी आणि समाजाभिमुख नेतृत्वामुळे सतीश कुंकळेकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. समाजाची ताकद वाढवण्यासाठी जास्तीत जास्त सभासद करणे आणि संघटना मजबूत करणे हे त्यांचे प्रमुख ध्येय आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कुंभार समाज एकत्र येऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा या दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वामुळे अखिल भारतीय कुंभार समाजाला नवीन ओळख आणि बळ मिळाले असून भविष्यात समाजाच्या विकासासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरणार आहे.

***

# पंतप्रधानांच्या 'मन की बात' वर मूर्तिकार खूश



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मातीच्या मूर्ती' निर्णयाचे शहरातील पारंपरिक मूर्तिकारांनी असे जल्लोषात स्वागत केले.

**'मातीच्या मूर्ती' आवाहनाचे जल्लोषात स्वागत. पीओपीविरोधात पुकारू आंदोलन! संघटनेने स्पष्ट केले की, पीओपीमुळे जलप्रदूषण वाढते आणि स्थानिक कुंभार व मूर्तिकारांच्या उपजीविकेवर परिणाम होतो. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने मातीच्या मूर्तींना प्रोत्साहन देण्यासाठी ठोस धोरण आखावे; अन्यथा पुढील काळात व्यापक आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.**

**नागपूर :** गणेशोत्सवासह विविध सण अधिक पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करण्याचे आवाहन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १३४व्या भागात मातीच्या मूर्तीचे पूजन करण्यावर भर दिला. त्यानंतर विदर्भातील पारंपरिक मूर्तिकार आणि हस्तकला कारागिरांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. पंतप्रधानांच्या या भूमिकेचे स्वागत करत पारंपरिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघाने नागपुरात उत्साहाने प्रतिक्रिया व्यक्त केली.

संघटनेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात नगरसेवक राम आंबुलकर यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी पंतप्रधानांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जल्लोष केला. यावेळी पारंपरिक मातीच्या मूर्तीचे संवर्धन आणि स्थानिक कारागिरांच्या रोजगार संरक्षणाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाठक यांनी यावेळी राज्यातील काही राजकीय घटकांवर अप्रत्यक्ष टीका केली. 'देशाचे पंतप्रधान पर्यावरण संरक्षण, पारंपरिक कला आणि स्थानिक रोजगार टिकवण्यासाठी मातीच्या मूर्तीचा आग्रह धरत असताना महाराष्ट्रात काही ठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्ती उत्पादकांना प्रोत्साहन दिले जात आहे. एकीकडे देशाचे पंतप्रधान धर्म, कला, पर्यावरण आणि पारंपरिक रोजगाराच्या रक्षणासाठी मातीच्या मूर्तीचा आग्रह धरत आहेत; तर दुसरीकडे महाराष्ट्रात काही नेते व मंत्री पीओपी कारखानदारांचे संघटन करून पारंपरिक कुंभारांचा रोजगार उद्ध्वस्त करण्याचे षडयंत्र रचत आहेत. पंतप्रधानांच्या आवाहनामुळे आता खऱ्या आणि खोट्या संस्कृती रक्षकांमधील फरक जनतेसमोर आला आहे. यामुळे पिढ्यान्‌पिढ्या मातीच्या कलेशी जोडलेल्या कारागिरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे', असे ते म्हणाले.

पाठक यांनी सांगितले की, मातीच्या मूर्ती हा केवळ धार्मिक विषय नसून तो पर्यावरण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेशी जोडलेला प्रश्न आहे. पंतप्रधानांच्या आवाहनामुळे पारंपरिक कारागिरांचा आत्मविश्वास वाढला आहे. यामुळे पारंपरिक कुंभार, हस्तशिल्पकार आणि मूर्तिकारांच्या उपजीविकेला संरक्षण मिळणार आहे. येत्या काळात मातीच्या मूर्तींना अधिक प्राधान्य मिळावे यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. कार्यक्रमाला अनिल ठाकरे, नाना कोटांगळे, श्याम बुरबांदे, रामेश्वर चौधरी, संदीप चौधरी, भीमराव खांदारे आणि सुधाकर मराठे आदी उपस्थित होते.

# माती वाहतुकीतील अडथळ्यांविरोधात कुंभार समाज एकवटला

## पेसा क्षेत्र, आरक्षित जमिनी व शासन परिपत्रकातील त्रुटींवर नाशिक येथे सखोल चर्चा; सुधारित शासन निर्णयाची मागणी



**धुळे :** महाराष्ट्र राज्यातील कुंभार समाजातील वीटभट्टी व्यावसायिक व पारंपरिक माती व्यवसाय करणाऱ्या समाजबांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर नाशिक येथे आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्रात सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाने १० जून २०२६ रोजी जारी केलेल्या ७०० ब्रास माती वाहतुकी संदर्भातील जाचक अटी व शर्ती तातडीने रद्द करून त्यामध्ये सुधारणा करावी, तसेच डिजिटल ओळखपत्राचा लाभ कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांना मिळावा, अशी प्रमुख मागणी या बैठकीत करण्यात आली. या प्रश्नांबाबत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन निवेदन सादर करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

पिंपरी–चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सदस्य सतिषदादा दरेकर, ज्येष्ठ नेते मोहनराव जगदाळे, ज्ञानेश्वर भागवत, रमाकांत क्षीरसागर, गोकुळभाऊ कुंभार, रतीलाल कुंभार, रंगनाथ सूर्यवंशी, किशोर कुंभार, दिनेश वाघ, सोमनाथ शेठ सोनवणे (अभोना), पत्रकार अनिल चित्ते, विश्वास कुंभार, सोमनाथ सोनवणे (दिंडोरी) आणि सोशल मीडिया प्रतिनिधी जगदीश मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे चर्चासत्र पार पडले.

चर्चासत्रात उपस्थित वीटभट्टी व्यावसायिक आणि पारंपरिक कुंभार व्यवसायिकांनी शासनाच्या १० जून २०२६ रोजीच्या परिपत्रका–तील त्रुटींवर सविस्तर चर्चा केली. शासन निर्णयात आवश्यक असलेले संदर्भ, राजपत्र व शासन निर्णयांचा समावेश न करता इतर बाबींचा उल्लेख करण्यात आल्याने प्रत्यक्षात माती वाहतुकीस अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. विशेषतः ७०० ब्रास माती वाहतुकीवरील अटी, पेसा क्षेत्र व आरक्षित आराखड्यातील जमिनीतून माती वाहून नेण्यास येणाऱ्या अडचणी, तसेच प्रशासकीय प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे वीटभट्टी उद्योगाला मोठा फटका बसत असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. त्यामुळे शासनाने संबंधित नियमांमध्ये तातडीने सुधारणा करून कुंभार समाजाला सुलभ व पारदर्शक प्रक्रिया उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

बैठकीत शासनाच्या डिजिटल ओळखपत्र योजनेचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. सध्या या योजनेचा लाभ कुटुंबातील केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित असल्याने अनेक पात्र सदस्य वंचित राहत आहेत. त्यामुळे कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांना स्वतंत्र डिजिटल ओळखपत्र देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी मागणी समाजबांधवांनी केली. यावेळी अनेक व्यावसायिकांनी माती वाहतुकीदरम्यान येणाऱ्या स्थानिक अडचणींचाही उल्लेख केला. काही ठिकाणी तलाठी, ग्रामसेवक किंवा स्थानिक स्तरावर अनावश्यक अडथळे निर्माण होत असल्याने वीटभट्टी व्यवसायिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे शासनाने स्पष्ट व एकसमान कार्यपद्धती निश्चित करून अशा प्रकारचा त्रास थांबविण्यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. सतिषदादा दरेकर, मोहनराव जगदाळे आणि रमाकांत क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या चर्चासत्राला धुळे, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील वीटभट्टी व्यावसायिक व कुंभार समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजहिताच्या प्रश्नांवर सर्व गट–तट बाजूला ठेवून एकदिलाने भूमिका घेण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. शासनाने समाजाच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी सर्व उपस्थितांनी व्यक्त केली.

# वैदर्भीय मूर्तिकारांचा प. महाराष्ट्रात पर्यावरणपूरक उत्सव जनजागृती अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद
# कोल्हापूर शहर शाडूमाती मूर्तिकार संघ तर्फे वैदर्भीय मूर्तिकारांच्या संपर्क संवाद यात्रेचा निरोप समारंभ

**– सतीश वडणगेकर**




मार्गदर्शन करताना सुरेश पाठक



उपस्थित मान्यवर मुर्तिकार

**कोल्हापूर :** श्री संत गोरोबा कुंभार शाडू माती मूर्तिकार संघटना कोल्हापूरच्या वतीने प. महाराष्ट्रात पर्यावरणपूरक उत्सवाच्या जन–जागृतीसाठी आयोजित वैदर्भीय मूर्तिकारांच्या संपर्क–संवाद यात्रेचा निरोप समारंभ कोल्हापूर येथील श्री संत गोरोबा कुंभार मंडप येथे पारंपारिक कुंभार मूर्तिकार हस्तकला कारागीर संघ कोल्हापूर जिल्हाध्यक्ष श्रीकांत कुंभार यांचे अध्यक्षतेखाली व हलगी सम्राट अनिल वागवेकर, संघटनेचे पदाधिकारी, सतिश वडणगेकर, रणधीर वडणगेकर, दिनकर कुंभार, उमेश कुंभार, आनंदा वडणगेकर, महेश वडणगेकर, राजेंद्र निगवेकर, नितीन ब्रह्मपुरे या प्रमुख अतिथीच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला. करवीर नगरीच्या मूर्तिकारांच्या वतीने या अभिनव उपक्रमाचे कौतुक करीत पुष्प देऊन सर्व सहभागी वैदर्भीय मूर्तिकारांचे स्वागत करण्यात आले.

निरोप समारंभप्रसंगी माहिती देतांना यात्रा प्रमुख व पारंपरिक मूर्तिकार संघटनेचे प्रदेश अध्यक्ष सुरेश पाठक यांनी सांगितले की, धर्म, संस्कृती, कला, पर्यावरण व रोजगाराच्या संरक्षणासाठी पर्यावरणपूरक उत्सवात पारंपारिक मूर्तिकारांची महत्वपूर्ण भूमिका आहे.

पर्यावरणपूरक उत्सवाची संस्कृती संपूर्ण महाराष्ट्रात रुजावी या हेतूने पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघांचे वतीने दि. ८ ते १३ जानेवारीला गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, अमरावती, यवतमाळ येथील पारंपारिक मातीच्या मूर्तिकारांची संपर्क–संवाद यात्रा आयोजित करण्यात आली.

संवाद यात्रेच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण कलेसाठी प्रसिद्ध असलेल्या कलानगरीतील गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा व कलाकारांशी प्रत्यक्ष भेट, कोल्हापुरी कलेचे प्रकार, निर्मिती प्रक्रिया, मूर्तिकलेची मागणी, मूर्तिकारांचे जीवनमान व त्यांच्या समस्या कलाकारांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधून त्यांच्या कलागुणांना आत्मसात करण्यासाठी पारंपारिक मूर्तिकारांच्या समूहाने सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर कर्नाटकातील कोण्णूर, खानापूर, डुक्करवाडी येथे प्रत्यक्ष भेटून तेथील पारंपारिक मूर्तिकारांशी संपर्क साधून संघटनात्मक विषयावर सकारात्मक चर्चा केली व पर्यावरणपूरक मूर्ती निर्मिती व पर्यावरणपूरक उत्सव या राष्ट्रीय अभियानात प्रत्येकानी वैयक्तिक व सामूहिक सहभाग घ्यावा असे भावनिक आव्हान केले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी व रंग निर्मिती च्या क्षेत्रातील अनुभवी तज्ञ अरुण निगवेकर यांनी मूर्तिकारांना प्रमाणित पर्यावरणपूरक रंग निर्मिती व सहज उपलब्धते विषयी माहिती देत ग्राहकांना शंभर टक्के पर्यावरणपूरक मूर्ती उपलब्ध करून देण्याचे आव्हान केले. त्यामुळे गणेशभक्तांची मातीच्या मूर्तीवरील विश्वासार्हता वाढेल. असा विश्वास व्यक्त केला.

पारंपारिक मूर्तिकार संघटनेचे सह सचिव सुनील कोलूरवार यांनी संपूर्ण यात्रेत स्थानिक मूर्तिकारांचे स्नेह व आत्मीयता तसेच श्रीकांत कुंभार व सतीश वडनगेकर यांचे मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

निरोप समारंभाचे अध्यक्ष ज्येष्ठ मूर्तिकार श्रीकांत कुंभार यांनी वैदर्भीय मूर्तिकारांच्या या अभिनव उपक्रमाने परस्परातील संपर्क–संवादाने नावीन्यपूर्ण कला–कौशल्याचे आदान–प्रदान होण्याबरोबरच व्यावसायिक दृष्टी प्रगाढ होण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला.

समारंभाचे संचालन मूर्तिकार सतीश वडनगेकर यांनी केले तर आभार रणधीर वडणगेकर यांनी मानले. निरोप समारंभाला कोल्हापूर जिल्ह्यातील अवी निगवेकर, दिनकर कुंभार, उमेश कुंभार, आनंदा वडणगेकर, राजेंद्र निगवेकर, नितीन ब्राम्हपुरे सह बहुसंख्येने मूर्तिकार बंधू उपस्थित होते.

***

# देव-धर्माच्या नावावर सत्ता भोगणाऱ्या पिओपी समर्थकांच्या विरोधात संघटित शक्ती उभी करा.. रोहित जोशी

## राज्यस्तरीय पर्यावरणपूरक गणेश मूर्तिकला स्पर्धा व प्रदर्शनीचे बक्षीस वितरण व समारोप समारोह संपन्न







**मुंबई :** मुंबई महानगरपालिका–पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघतर्फे जागतिक पर्यावरण दिवसाचे अनुषंगाने पर्यावरण सप्ताह अंतर्गत दि. ५ ते ९ जूनपर्यंत आयोजित राज्यस्तरीय गणेश मूर्तिकला प्रदर्शनीचे बक्षीस वितरण व समारोप समारंभ थेऊर एनवारोन मेंटल सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष रोहित जोशी, प्रमुख अतिथी प्रसिद्ध मूर्तिकार विशाल शिंदे, पारंपारिक मूर्तिकार संघांचे मुंबई महानगर अध्यक्ष अशोक कडू, मूर्तिकार संजय चिरनेरकर यांचे प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनीमध्ये प्रदर्शित सर्वोत्कृष्ठ गणेशमूर्तीसाठी प्रथम पुरस्कार प्रशांत मेस्त्री सिंधुदुर्ग, हर्षल सुर्वे घाटकोपर, द्वितीय पुरस्कार मनीष नाक्ती रायगड, अजय कुंभार सातारा, तृतीय पुरस्कार यश चोरघे नालासोपारा, अनिल वाघेला मुंबई तसेच मूर्तिकलेचे प्रोत्साहन पुरस्कार अनिकेत सोनवणे पालकर चाळ धारावी, विनोद शिंदे धारावी, सुहास सुर्वे सिंधुदुर्ग, गिरीष रुद्रा वरळी, सिद्धिविनायक तेली सिंधुदुर्ग, योगेश वझे नागपूर, अभिजित मडवळ कनकवली, रावजी माजगावकर नागवे, गणेश दुसा लोअर परेल यांना अतिथीच्या हस्ते रोख बक्षीस, प्रमाणपत्र व कोकणातील नामांकित मूर्तिकार स्व. विष्णू अंबादास कडू यांचे स्मृती प्रित्यर्थ स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. प्रदर्शनीत सहभागी इतर सर्व मूर्तिकारांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाचे मुख्य अतिथी विशाल शिंदे यांनी उपस्थितीत उद्योनमुख व नवोदित मूर्तिकाराशी संवाद साधताना म्हणाले की कलेत कोणीही पूर्ण पारंगत नाही. मीही अजून शिकतो आहे. प्रत्येक मूर्तिकारात भिन्न व विशिष्ट गुणवत्ता आहे. म्हणूनच पहिला, दुसरा, तिसरा व प्रोत्साहन अशी श्रेणी आहे. दुसऱ्यातले चांगले घेणे, इतरांची कॉपी करण्यापेक्षा आपल्यातील त्रुट्या व विशिष्ट गुणांना ओळखून त्यांचे विकास करून स्वतःची कलाशैली समृद्ध करावी तेव्हा कला बहरेल व कलाकाराला प्रतिष्ठेसह प्रसिद्धीही प्राप्त होईल असा सल्ला दिला. अल्पावधीत आयोजकांच्या प्रथम उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादाबद्दल अभिनंदन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व पिओपी विरोधात न्यायालयीन लढ्याचे मुख्य याचिकाकर्ते रोहित जोशी म्हणाले राजकारणी व पुंजीपती हेतूपुरस्पर पारंपारिक मूर्तिकार व मूर्तिकलेला संपविण्याचा घाट घालीत असताना मूर्तिकार संघटितपणे प्रदर्शनीच्या रूपाने समाजात पर्यावरणपूरक उत्सवाची संस्कृती रुजविण्याचा प्रयत्नाचे कौतुक केले. पुढे म्हणाले की देशातील सर्व न्यायालयाचे निकाल पिओपी मूर्तीबंदीचे असताना सुद्धा महाराष्ट्र शासन संस्कृतीच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास व प्रदूषणाच्या गंभीर समस्येला कारणीभूत पिओपी मूर्तीला राजश्रय देण्याचा कुटील डाव खेळला जात आहे. देव–धर्माच्या नावावर सत्ता भोगणारे राजकीय पुढारी धार्मिक उत्सवात दरवर्षी धर्म, आस्था व विश्वास यांची होणारी हेळसांड मूग गिळून उघडया डोळ्यांनी पाहून मूर्ती विटंबनेला मूक संमती देतात. अश्या नास्तिक पुढाऱ्याच्या विरोधात संघटित शक्ती उभी होण्याची गरज आहे. सरकार काही करणार, न्यायालयाचे निर्णय काय येणार याची वाट पाहत बसण्यापेक्षा जेथे मूर्तिकार तेथे संघटन अशी व्यवस्था मातीच्या मूर्तिकारांनी निर्माण करून आपली कला व व्यवसाय वाचविण्यासाठी संघटित लढा उभारावा असे आव्हान केले. प्रदर्शनीचे मुख्य आयोजक अशोक कडू यांनी प्रस्ताविकात धर्म, कला, संस्कृती, पर्यावरण व रोजगार या पंच तत्वावर आधारित संघटनेची यशस्वी वाटचाल संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून प्रत्येक मूर्तिकाराने आपला योगदान व सहयोग द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रदर्शनीमध्ये विदर्भ, कोकण, प. महाराष्ट्र, सातारा व मुंबई च्या उपनगरातून ७५ मुर्तीकारांनी आपल्या गणेश मूर्तिसह सहभाग नोंदवला.

याप्रसंगी नागपूरच्या पर्यावरणप्रेमी अनुसया छाबराणी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघांचे प्रदेश अध्यक्ष सुरेश पाठक, आर्ट डायरेक्टर नानासाहेब शेंडकर, पारंपारिक मूर्तिकार संघांचे मुंबई महानगर अध्यक्ष अशोक कडू यांचे प्रमुख उपस्थितीत नगरसेवक सुरेश आवळे यांचे शुभहस्ते दिपप्रज्वलन व श्री गणेशाचे पूजन करून प्रदर्शनीचे शुभारंभ केले.

मूर्तिकला परीक्षकाची चमू श्री संकल्प अशोक कुंभार शिल्पकार सातारा, नानासाहेब शेंडकर आर्ट डायरेक्टर लालबाग, यांनी मूर्तिचे परीक्षण केले. मूर्तिकार नारायण राऊत पनवेल यांनी संचालन केले तर संजय चिरनेरकरने आभार मानले. कार्यक्रमाला प्रामुख्याने तरुण मूर्तिकाराची लक्षवेधी उल्लेखनीय उपस्थिती होती.

**– सुरेश पाठक, प्रदेश अध्यक्ष**
पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघ.

# रुद्राक्ष हॉस्पिटल व डेंटल केअर सेंटरचे उद्घाटन संपन्न

– उत्तमराव काळे सर, चाळीसगाव.




रुद्राक्ष हॉस्पिटलचे उद्घाटन करताना सौ. लता व उत्तमराव काळे, आमदार मोहिते–पाटील, श्री नामदेवरावव सौ पार्वतीबाई श्रीमंदिलकर, डॉ. योगेशराव श्रीमंदीलकर, सौ.डॉ. सुनीला श्रीमंदिलकर

मातृ देवो भाव! पितृ देवो भाव!

**पुणे :** राजगुरूनगर येथील प्रथितयश डॉ. योगेश श्रीमंदिलकर व डॉ. सुनिला श्रीमंदिलकर यांच्या नविन बांधलेल्या अत्याधुनिक रुद्राक्ष हॉस्पिटल व डेंटल केअर सेंटर आणि वरद मेडिकलचे दि.१३ मे रोजी उद्घाटन झाले. हॉस्पिटलचे उद्घाटन उभय डॉक्टरांचे आई, वडील श्री.सौ. पार्वतीदेवी नामदेवराव श्रीमंदिलकर व श्री.सौ. लता उत्तमराव काळे (चाळीसगाव) यांचे हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे मा. आमदार मोहिते पाटील, मा. खासदार, नगराध्यक्ष, बिल्डर घुमटकर. प्रमुख उपस्थिती पुणे येथून डॉ. दिलीप बोरसे, डॉ. सौ. रेखाताई बोरसे, विवेक खोपे, सौ. स्नेहल खोपे, मुंबईहून डॉ. सुरेश काळे, नाशिकहून प्रा. शांतीलाल काळे, युवराज काळे, चाळीसगावहून सेवानिवृत्त प्राचार्य उत्तमराव काळे, नारायण काळे. पुणे येथून विलास डेंगळे पारनेर येथून रवि श्रीमंदिलकर, राजगुरूनगर नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक, व्यापारी,उद्योजक, पंच क्रोशीतील डॉक्टर्स.

हॉस्पिटल २४ बेडचे, तीन मजली, सुसज्ज ऑपरेशन थेटर, डेंटल इम्प्लांट सह डेंटल केअर सेंटर, अत्याधुनिक लॅब, आय.सी.यू. सेंटर, डिजिटल एक्स रे, वरद मेडीकल, सह भव्य पार्किंग सुविधा असलेलं कुंभार समाजाचं डॉक्टर दाम्पत्य श्रीमंदिलकर यांनी राजगुरूनगर, पुणे येथे उभं केलं. महाराष्ट्र कुंभार समाजाला याचा अभिमान आहे. महाराष्ट्र कुंभार समाज व सतिशदादा दरेकर यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्यात. खेड परिसरातील नागरिकांचे आरोग्य निरामयी राहून रुद्राक्ष हॉस्पिटल ला भरभराटी येवो अशी शुभेच्छा मान्यवरांनी उभय डॉक्टरांना दिल्यात. डॉ. योगेश (M.B.B.S., M.D., D.N.B. मेडिसिन), डॉ. सुनिला (B.D.S.; M.D.S.) श्रीमंदिलकर परिवाराचे कुंभार समाजाच्या वतीनं अभिनंदन. डॉ. सुनिला ही उत्तमराव काळे यांची कन्या असून डॉ. योगेश हे जावई आहेत.



डॉ. सौ. सुनिला व डॉ. योगेश श्रीमंदिलकर यांचे अभिनंदन करताना सौ. लता व उत्तमराव काळे सर

# सौ. लता वसंत कुंभार यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान!



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोडशी ता.कराड जि.सातारा येथील उपशिक्षिका सौ. लता वसंत कुंभार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने शिर्डी येथे सन्मानित करण्यात आले. बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी, अहिल्यानगर, संस्थेच्या वतीने देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार पटकावत त्यांनी शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. आपल्या अध्यापनासोबतच विविध उपक्रम राबवत त्यांनी आपल्या कार्यक्षमतेची छाप निर्माण केली आहे.

सौ. लता वसंत कुंभार यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

***

# समाजाचे प्रश्न घेऊन महाराष्ट्र प्रदेश कुंभार समाज संघटना जि. प. अध्यक्षांच्या भेटीला



कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश वतीने कुंभार समाजातील विविध विकास योजना, समाजोपयोगी कामे तसेच संत गोरा कुंभार समाज भवन बांधकामासाठी सहकार्य मिळावे या उद्देशाने जिल्हा परिषद अध्यक्ष मा. प्रमोदजी कामत यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच समाजाच्या प्रलंबित मागण्या तातडीने मार्गी लावण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी अशी विनंती करण्यात आली.

या भेटीदरम्यान मा. प्रमोदजी कामत यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद हरकुळ सदस्य सन्माननीय मनोज राव राणे साहेब, प्रदेश उपाध्यक्ष यशवंत धोंडू शेदूलकर, प्रदेश सचिव विलास गुडेकर, माजी जिल्हा सचिव व बांधकाम कमिटी सचिव दिलीप हिदळेकर, माजी जिल्हा सचिवश्री बंडेराव कुंभार, विस्तार अधिकारीश्री पुरुषोत्तम हरमलकर तसेच माजी सचिव (कणकवली तालुका) सन्मानीय मुख्याध्यापक संतोष वावळिये सर उपस्थित होते. यावेळी कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने हरकुळ बुद्रुक येथील कुंभार बांधवांच्या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या प्रश्नाबाबत निवेदन सादर करण्यात आले. प्रदेश उपाध्यक्ष यशवंत शेडुलकर यांनी निवेदनाद्वारे सांगितले की, कणकवली तालुक्यातील हरकुळ बुद्रुक गावातील कुंभारवाडीत राहणारे चिंदरकर कुटुंबीय गेली अनेक वर्षे रस्त्याच्या सुविधेपासून वंचित आहेत. काही वर्षांपूर्वी कुंभारवाडीत रस्ता गेला असला तरी चिंदरकर कुटुंबियांच्या घरांपर्यंत अद्यापही योग्य रस्ता उपलब्ध झालेला नाही.

कुंभारवाडीपासून जंगमवाडी रस्त्यापर्यंत जाणारी एक पारंपरिक पांदण आजही अस्तित्वात असून या पांदणीचा वापर अनेक वर्षांपासून ग्रामस्थ करत आले आहेत. काही ठिकाणी या पांदणीचा उपयोग प्रत्यक्ष रस्ता म्हणूनही केला जात आहे. त्यामुळे या पारंपरिक पांदणीचे अधिकृत रस्त्यात रूपांतर झाल्यास चिंदरकर कुटुंबियांच्या रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो. ग्रामीण भागातील पांदण रस्ते हे ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनाचा आधार असतात. शेती, शिक्षण, आरोग्य तसेच आपत्कालीन सेवांसाठी या वाटांचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. सध्या रस्ता नसल्यामुळे चिंदरकर कुटुंबियांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास त्रास सहन करावा लागतो, तर आजारी व्यक्तींना वेळेत दवाखान्यात पोहोचवणे कठीण बनते. पावसाळ्यात ही परिस्थिती आणखी गंभीर होते. त्यामुळे हा प्रश्न केवळ रस्त्यापुरता मर्यादित नसून तो नागरिकांच्या सुरक्षितता, शिक्षण आणि मूलभूत सुविधांशी संबंधित आहे.

राज्य शासनाने सुरू केलेली ''मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना'' ग्रामीण भागासाठी आशादायी ठरत आहे. या योजनेमुळे पारंपरिक पांदण रस्त्यांना अधिकृत मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्यास हरकुळ बुद्रुक येथील या रस्त्याचा प्रश्न लवकरच सुटू शकतो, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. शेवटी, चिंदरकर कुटुंबियांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्या रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवावा तसेच ग्रामीण विकासाच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी अशी नम्र विनंती कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने करण्यात आली. आजच्या या निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे आपल्या सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा मनःपूर्वक धन्यवाद!

***

# दुबईत अडकलेले जाधव कुटुंब सुखरूप मायदेशी



**दुबई: इतर प्रवाशांसमवेत उद्योजक राजेंद्र जाधव व कुटुंबीय.**

**आळेफाटा :** इराण–इस्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर दुबईत अडकलेले जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील उद्योजक राजेंद्र जाधव यांच्यासह त्यांचे कुटुंब शुक्रवारी (ता. ६) सुखरूप मायदेशी परतले. विमानसेवा विस्कळित झाल्याने हे कुटुंब गेल्या काही दिवसांपासून तिथे अडकून पडले होते. आळेफाटा येथील उद्योजक राजेंद्र रमेश जाधव, पत्नी संगीता आणि मुलगी स्नेहल यांच्यासह २६ फेब्रुवारीला दुबई पर्यटनासाठी गेले होते. २८ फेब्रुवारीला युद्ध सुरू झाल्याने तणाव वाढला. बुर्ज खलिफा परिसरात असताना त्यांना मिसाईल हल्ल्याचा थरार प्रत्यक्ष अनुभवावा लागला. यामुळे घाबरलेल्या जाधव कुटुंबाने तातडीने हॉटेल गाठले. युद्धामुळे विमानसेवा ठप्प झाल्याने त्यांना मायदेशी परतण्यात अडचणी येत होत्या. या काळात माजी आमदार अतुल बेनके, अमित बेनके यांच्यासह इतरांनी त्यांना धीर दिला. प्रशासकीय स्तरावरील प्रयत्नांनंतर, गुरुवारी (ता. ५) ते दुबईहून निघाले आणि शुक्रवारी मध्यरात्री पुणे विमानतळावर सुखरूप पोहोचले. मायदेशी परतल्यानंतर जाधव कुटुंबाने सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

# डॉ. हेमंत कुंभार यांना पी.एच.डी. प्रदान

## गोपनीयता जपत कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे हृदयरोग ओळखण्याचे तंत्र विकसित





**डॉ. हेमंत कुंभार हे मुर्टी येथील रहिवाशी असून बारामती येथे कार्यरत आहेत. डॉ. हेमंत कुंभार हे दत्तात्रय कुंभार अध्यक्ष भोर तालुका कुंभार समाज भोर यांचे जावई आहेत.**

बारामती येथील संशोधक डॉ. हेमंत कुंभार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन पूर्ण करत पी.एच.डी. पदवी संपादन केली आहे.

त्यांच्या संशोधनाचा विषय होता – Privacy-Preserving Machine Learning Techniques through Homomorphic Encryption: Enhancing Security and Performance in Data-Driven Systems.

आजच्या डिजिटल युगात आरोग्यविषयक (Healthcare) माहिती अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय असते. रुग्णांचा वैद्यकीय डेटा सुरक्षित ठेवणे हे मोठे आव्हान आहे. अनेकदा Machine Learning वापरताना डेटा उघडा करावा लागतो, ज्यामुळे गोपनीयतेचा धोका निर्माण होतो. डॉ. कुंभार यांनी या समस्येवर उपाय म्हणून गोपनीयता जपणारे (Privacy-Preserving) आणि सुरक्षित Machine Learning अल्गोरिदम विकसित केले. त्यांनी Homomorphic Encryption तंत्रज्ञान वापरून असा मॉडेल तयार केला की:

- ❊ डेटा डिक्रिप्ट न करता देखील विश्लेषण करता येते.
- ❊ रुग्णांची माहिती पूर्णपणे सुरक्षित राहते.
- ❊ आणि परिणाम जलद मिळतात.

त्यांच्या LeKNet Machine Learning अल्गोरिदममुळे हृदयरोगा–सारख्या आजाराचे विश्लेषण अवघ्या ०.३४७ सेकंदात करता येते.

महत्त्वाचे म्हणजे, हे संशोधन रोग निदान करण्यासाठी डॉक्टर बनणे नाही, तर रुग्णांचा डेटा सुरक्षित ठेवून AI कसे वापरावे यासाठी तांत्रिक प्रणाली विकसित करणे हा मुख्य उद्देश आहे.

या संशोधनामुळे भविष्यात ❊ सुरक्षित हॉस्पिटल सिस्टीम

- ❊ गोपनीय मेडिकल डेटा विश्लेषण
- ❊ वेगवान आणि सुरक्षित AI आरोग्य सेवा
- ❊ बँकिंग व फायनान्समध्ये सुरक्षित डेटा प्रक्रिया
- ❊ शासकीय व नागरिक सेवा क्षेत्रात गोपनीय AI वापर
- ❊ वेगवान आणि सुरक्षित डिजिटल सेवा

यांना मोठी मदत होणार आहे. ही प्रणाली केवळ हॉस्पिटल किंवा हेल्थकेअर क्षेत्रापुरती मर्यादित नसून, ज्या ज्या ठिकाणी लोकांचा वैयक्तिक किंवा संवेदनशील डेटा वापरला जातो – जसे की बँकिंग, शिक्षण, शासकीय सेवा, विमा, संशोधन संस्था, ई–गव्हर्नन्स व उद्योग क्षेत्र – तेथे देखील सुरक्षित आणि गोपनीय Machine Learning वापरण्यासाठी ही तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे.

❊❊❊

# सामाजिक कार्यकर्ते गजानन चौलकर सर आणि चिरनेर कुंभार पाड्यातील सर्वांचे दादा



सरांचा प्रवास हा एखाद्या तपस्वी सारखा राहिला आहे. एक आदर्श शिक्षक म्हणून शाळेत विद्यार्थांना पुस्तकी धड्यांसोबत माणुसकीचे धडे दिले, पण सरांचे कार्य केवळ शाळेच्या चार भिंती पुरते मर्यादित राहिले नाही. एक सुप्रसिद्ध मूर्तीकार म्हणून या वयात ही आपली कला संस्कृती अखंड जोपासली आहे. मातीच्या गोळ्यातून सजीव मूर्ती साकारताना त्यांनी संयम व सृजनशीलता काय असते हे समाजाला दाखवून दिले. समाज कारणातही त्यांचे योगदान तितकेच मोठे आहे.

कुंभार सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून समाजाला संघटीत करणे असो किंवा विवाह निवारण समस्या समितीचे अध्यक्ष म्हणून अनेकांचे संसार साधण्याचे पवित्र कार्य असो, सरांनी प्रत्येक जबाबदारी कुशलतेने पार पाडली. महत्वाचे म्हणजे, हे सर्व करताना त्यांनी एक आदर्श पिता म्हणून आपल्या कुटुंबावर जे संस्कार केले त्याचे फल आज त्यांच्या मुलाच्या रुपाने दिसत आहेत.

अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला, त्यांच्या कष्टांचा, कलेचा आणि त्यांच्या निस्वार्थी सेवेचा गौरव म्हणून कुंभार समाज सामाजिक संस्था, रायगड जिल्हा यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार २०२६ ने गौरवण्यात आले. त्याबद्दल त्यांचे नवीमुंबई कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ सहयोगी प्राध्यापक दत्ता कोंडीबा रामरुले यांना प्रदान



**प्रा. दत्ता रामरुले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मान्यवरांचे हस्ते संपन्न**

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने दिला जाणारा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, डॉ. पंजाबराव देशमुख समाजरत्न पुरस्कार याचे वितरण नुकतेच व्ही जे हायस्कूल पनवेल येथे दिनांक ०५ जून २०२६ रोजी पार पडले. या कार्यक्रमामध्ये बीड जिल्ह्यातील प्राध्यापक दत्ता कोंडीबा रामरुले यांना सामाजिक व शैक्षणिक कार्याकरिता क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या एकूणच आजपर्यंतच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा विचारात घेत राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

या पुरस्कार सोहळ्यासाठी माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील, शिक्षक आमदार प्रवीण स्वामी, अनिल नाचपल्ले (अध्यक्ष, राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ), सर्व पदाधिकारी व संघटनेचे असंख्य सदस्य तथा मान्यवर उपस्थित होते.

या पुरस्कार प्राप्तीकरिता प्रा. दत्ता कोंडीबा रामरुले यांचे ते कार्यरत असलेल्या माऊली विद्यापीठ केजचे अध्यक्ष तथा माजी मंत्री अशोकराव पाटील, सचिव तथा माजी युवक प्रदेश काँग्रेस सचिव आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान ४ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास. डी. के. तथा कर्मचारी वृंद, ओबीसी शिक्षक संघटना, कुंभार समाज विकास समिती बीड, कुंभार समाज ता. अंबाजोगाई, कुंभ विकास मासिक, दै.महाराष्ट्र संकल्प भातकुली जि. अमरावती, कुंभश्री मासिक पुणे, साप्ताहिक समृद्ध व्यापार लातूर, ओबीसी संघटना अंबाजोगाई, संत गोरोबा काका प्रतिष्ठान, नागझरी मौजे शेपवाडी, संत शिरोमणी सेवाभावी संस्था, मौजे शेपवाडी यांनी कौतुक तथा अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुरस्कारांसाठी निवड केल्याबद्दल व शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याकरिता सातत्याने सहकार्य करणारे, पाठिंबा देणारे कार्यरत माऊली विद्यापीठ केज तथा प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनुर, सर्व सामाजिक शैक्षणिक संघटना व सहकारी यांचे ऋण व्यक्त केले व भविष्यातही कायम पाठिंबा, प्रोत्साहन व प्रेरणा मिळत राहील असा विश्वास व्यक्त करत या पुरस्काराने मिळालेल्या उर्जेने जोमाने सामाजिक व शैक्षणिक कार्य करण्याचा मानस सहयोगी प्रा. दत्ता कोंडीबा रामरुले यांनी व्यक्त केला.

***

## पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांचा स्वाभिमानी कुंभार समाज संस्थेकडून सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था शाखा छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आज शहरातील जवाहर नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान सामाजिक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली तसेच समाजहिताच्या विविध मुद्द्यांवर मनमोकळ्या गप्पा रंगल्या. यावेळी संस्थेच्या वतीने पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समाजासाठी पोलीस प्रशासनाची भूमिका आणि सामाजिक ऐक्य याबाबत सकारात्मक संवाद झाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटेशजी गोत्रम, प्रदेश कार्याध्यक्ष केरोजी आचार्य, राज्य युवक संपर्कप्रमुख श्रीरामजी तेलंग, अंबाजोगाई येथील प्राध्यापक दत्ता रामरुळे, ज्येष्ठ मार्गदर्शक जळबाजी येरमवार, शाखा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा उपाध्यक्ष उत्तमराव मल्हारे, जिल्हा सचिव बालाजी निरदोडे, संपर्कप्रमुख गंगाधर रामरुळे, जिल्हा संघटक गोरोबा राजरवाड, जिल्हा युवा कार्याध्यक्ष माधव निरदूडे, जिल्हा कोषाध्यक्ष दत्ता राजफोडे आदी मान्यवर उपस्थित होते. या भेटीमुळे समाज व पोलीस प्रशासन यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

***



अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.

# रायगड जिल्ह्यात घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांचा गुणगौरव





**रायगड :** कुंभार समाज सामाजिक संस्था तालुका खालापूर व कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगड संस्थेच्या वतीने १० वी,१२ वी व पदवीधर परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

तालुका तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गावात घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांचे कौतुक आणि सन्मान करण्यात आला. पालकांनी सुद्धा चांगल्या प्रकारे व गावातील समाज बांधवांनी सुद्धा कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला.

खालापूर तालुका अध्यक्ष राजेंद्र साळवी, युवक अध्यक्ष स्वप्नील नागावकर, महिला अध्यक्ष श्रीमती सविताताई मांडलेकर, सचिव अशोक खेडेकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला रायगड जिल्हा अध्यक्ष अनंत पांडुरंग महाडकर, जिल्हा सचिव दिलीप साळवी साहेब, जिल्हा युवक अध्यक्ष शरद कुंभार (सर), कार्यालय सचिव मधुकर कुंभार, जिल्हा सदस्य रामदास साळवी, खोपोली शहर कुमार समाज सचिव राजाराम कुंभार (सर), युवक अध्यक्ष सिद्धेश कुंभार, दिलपेश वाडेकर, जयेश पनवेलकर, सौ. पूजा हातनोलकर, सौ. रोहिणी हातनोलकर, खजिनदार रामचंद्र (दादा) मांगरुळकर आदी उपस्थित होते.

***

# संत गोरोबा काका पुण्यतिथी : पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक सोहळा संपन्न





संत श्रेष्ठ महामेरू श्री संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य मिरवणूक सोहळा अत्यंत भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कुंभार भट्टी येथून या मिरवणुकीला पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि गोरोबा काका महाराज की जय या घोषणांनी दिमाखदार सुरुवात झाली.

मिरवणूक गंगावेस, लाल चौक, गणेश पेठ, शिवाजी चौक या प्रमुख मार्गांवरून जात असताना सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नागरिकांनी फुलांची उधळण करून मिरवणुकीचे स्वागत केले. ढोल–ताशांचा गजर, टाळ–मृदुंगाच्या निनादात आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या सोहळ्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व वयोगटातील समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत तरुणांनी भगवे झेंडे हातात घेऊन मिरवणुकीची शोभा वाढवली.

संत गोरोबा काका यांच्या प्रतिमेची आकर्षक सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे मिरवणूक अधिकच देखणी दिसत होती. शेवटी ही भव्य मिरवणूक गोरोबा काका मंदिर येथे पोहोचली, जिथे भक्तिभावाने पूजा–अर्चा करून संतांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या पुण्यतिथी सोहळ्यामुळे समाजात एकात्मता, श्रद्धा आणि भक्तीचा संदेश अधिक दृढ झाला.

***

# गोरोबाकाका यांच्या राहत्या वाड्याचा १३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा




ह.भ.प. दत्ता महाराज आंबीकर व इतर मान्यवरांचा सत्कार करताना रामदास कुंभार व चनबस वायकर



गोरोबा काका वाड्यात काकांचे दर्शन घेताना शाम राजे, सवांदे, नंदूशेठ, दत्ता कुंभार, ज्ञानेश्वर भागवत, रंगनाथ सुर्यवंशी, गोरे व नागनाथ कुंभार




वारकऱ्यांचा सत्कार करताना अनिल शिर्के, सुर्यकांत घोडके, नागनाथ कुंभार व चनबस वायकर



गोरोबाकाकांच्या वाड्यासमोर भक्तीभावाने प्रवचन ऐकताना बंधूभगिनी

**तेर :** संत शिरोमणी संत गोरोबाकाका यांच्या रहात्या वाड्याच्या बांधकामाचा १३वा वर्धापन दिन अखिल महाराष्ट्र कुंभार समाज संस्थेच्या वतीने बुधवारी (दि.१०) भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागांतून कुंभार समाजाचे पदाधिकारी, वारकरी, भजनी मंडळे तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात ह.भ.प. दत्ता महाराज आंबीकर यांचे कीर्तन–प्रवचन संपन्न झाले. त्यांनी संत गोरोबाकाका यांच्या जीवनकार्याचा आणि वारकरी संप्रदायातील त्यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. वर्धापन दिनानिमित्त गोरोबाकाका यांच्या वाड्यापासून समाधी मंदिरापर्यंत टाळ, मृदंग आणि पताकांच्या गजरात दिंडी काढण्यात आली. महिला व पुरुष वारकऱ्यांनी हरिनामाचा अखंड गजर करत भक्तिभावाने सहभाग नोंदविला. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

या कार्यक्रमास कुंभार समाजाचे नागनाथ कुंभार, दत्ता धाडसकर, महादेव खटावकर, श्यामशेठ राजे, संजय राजे, रामदास कुंभार, चनबस वायकर, विश्वनाथ कोलमकर, विनायक राऊत, रंगनाथ सूर्यवंशी, महेश सायकर, पांडुरंग (तात्या) कुंभार, महेश इटकर, अर्जुन दळे, कैलास कुंभार, दीपक चित्रे, संजय गिरकर, प्रभू गोरे, शशिकला कुंभार, मळेवाडकर, भागवत (तात्या) कुंभार, ज्ञानेश्वर माऊली कुंभार, नामदेव कुंभार, नामदास सांगवेकर यांच्यासह महाराष्ट्रभरातील कुंभार समाजातील बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नडगावच्या प्रथमेशची इस्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड

– रविंद्र सोनावळे



**शेणवा :** जिल्हा परिषदेच्या शाळेतील पाचवी ते आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण विभागांतर्गत आयोजित मिशन भरारी स्पर्धा परीक्षेत जिल्ह्यात द्वितीय आलेल्या खडवली येथील नडगांव १ शाळेतील सहावीतील प्रथमेश गुरुनाथ सोनावळे यांची इस्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली. अंबरनाथ, शहापूर, कल्याण, मुरबाड, भिवंडी तालुक्यातील विद्यार्थ्यांची केंद्रस्तर, तालुका स्तरानंतर बिर्ला स्कूल येथे ३१ जानेवारीला जिल्हा स्तरावरावर स्पर्धा परीक्षा घेण्यात आल्या होत्या. जिल्हा स्तरावरील स्पर्धेतील गुणवत्ता धारक २७ मुले, ३२ मुली असे एकूण ५९ विद्यार्थी इस्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी विमानातून जाणार आहेत. २७ एप्रिल ते १ मे दरम्यान आयोजित पाच दिवसीय अभ्यास दौऱ्यासाठी विद्यार्थ्यांसोबत विस्तार अधिकारी संगीता माळी, प्रतिभा गढरी, नितीन पाटील, सुनीता ठुबे, वसुधा भोईर, सुधाकर पाटील या शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

# पुणे येथे कुंभार समाजाचा वधू-वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न



संत गोरोबाकाकांचे पुजन करताना दत्ताजी कुंभार, ज्योती शिंदे, शाम राजे, सतीश पाषाणकर व मान्यवर




संजयजी गाते यांचा सन्मान करताना विशाल शिंदे, बाबाजी कुंभार समवेत दत्ता कुंभार, सतिश दरेकर व मान्यवर

**पुणे :** पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय वधूवर परिचय मेळावा रविवार दि. ३१ मे २०२६ रोजी सावित्री गार्डन, धायरी, पुणे येथे राष्ट्रीय माती कला बोर्डाचे अध्यक्ष दत्ताजी डाळजकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे अध्यक्ष व वर्धा जिल्हा भाजपाचे अध्यक्ष संजयजी गाते विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. जिल्हा मंडळाचे अध्यक्ष बाबाजी कुंभार यांनी प्रास्ताविकेतून मेळावा आयोजित करण्याचा उद्देश स्पष्ट केला. कु. तनया झोजे हिने उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागतगीतातून स्वागत केले.

यावेळी महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे मा. सरचिटणीस रघुनाथ कुंभार, कुंभार समाज सामाजिक संस्थेचे संस्थापक व माजी अध्यक्ष सतिशदादा दरेकर, संजयजी गाते, दत्ताजी डाळजकर यांनी समाज बांधवाना मार्गदर्शन केले. या मेळाव्यात जवळपास तीनशे वधू-वरांनी नोंदणी करून मंचावर येऊन आपला परिचय करून देऊन आपल्या जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा व्यक्त केल्या. मध्यंतरीच्या कालावधीत यशदा संस्थेचे व्याख्याते विवेक गुरव यांनी वधू-वर व त्यांच्या पालकांचे आपल्या व्याख्यानातून समुपदेशन केले.

यावेळी व्यासपिठावर महासंघाचे मा. कार्याध्यक्ष तसेच समाजभूषण सतिश आण्णा पाषाणकर, अखिल महाविकास संस्थेचे अध्यक्ष शामशेठ राजे, विदर्भ कुंभार संघटनेचे अध्यक्ष चंदनजी प्रजापती, दिलीपजी राजे, विदर्भ संघटनेचे संतोष सरोदे, प्रशासकीय अधिकारी आनंद साळवी, जिल्हा अध्यक्ष बाबाजी कुंभार, कार्याध्यक्ष विशालशेठ शिंदे, सामाजिक संस्था जिल्हा अध्यक्ष सत्यवान वाळके, महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्षा कल्पनाताई शिंदे, कार्याध्यक्षा ज्योतीताई शिंदे, जिल्हा युवक अध्यक्ष रविंद्र कुंभार, समाजभूषण भगवानशेठ कुंभार, बाळासाहेब जेजुरीकर, शंकरराव वाव्हाळे, गजानन भागवत, प्रकाश रसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळावा यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय पांगारकर, किरण कुंभार (आणेबोटेकर), नितीन कुंभार, दत्तात्रय बावधनकर, विजय कुंभार, उद्धवशेठ कुंभार, शशिकांत शिर्के, संदीप कुंभार, संदीप कर्डेकर, राजेंद्र पाषाणकर, राजूशेठ सोमवंशी, महेश शिर्के, बंडू कुंभार, संतोष कुंभार, ऋषिकेश काशिद, अंकुश कुंभार, तानाजी दरेकर, अशोक कुंभार, जयप्रसाद शिनोलीकर, रामचंद्र हाडशीकर, अशोक भालेराव, डॉ. मंगेश कुंभार, हनुमंत कुंभार (धायरीकर), श्रीमती सुधाताई कुंभार, सौ. रेखाताई जाधव, सौ. धन्वंतरीताई उकिर्डे, उषाताई बेलसरकर, सौ. संजनाताई शिंदे, सौ. पल्लवी झोजे, सौ. रेणुकाताई सोमवंशी, सौ. उमाताई गाते, सौ. सुरेखाताई कुंभार, अभिजित कुंभार, मंगेश कुंभार आदींचे सहकार्य लाभले. मेळाव्यासाठी वधू-वर, त्यांचे पालक व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन मच्छिंद्र जगदाळे व कविताताई धानेपकर यांनी करून परसराम झोजे यांनी आभार व्यक्त केले.

***

# धुळ्यात जयहिंद कॉलनीतील प्रमुख रस्त्याला प.पू.ब.ना कुंभार गुरुजी यांचे नावं द्यावे.

\- अनिल चित्ते






पत्रकार - अनिल चित्ते

**धुळे :** धुळ्यात स्वातंत्र्य पूर्व काळातील लोकशिक्षक, दलितमित्र, सत्यशोधक, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, प.पू.कै.ब.ना. कुंभार गुरूजी यांचे नाव धुळे शहरातील जयहिंद कॉलनीतील एका प्रमुख रस्त्यास देण्यात यावे अशी मागणी पत्रकार अनिल चित्ते यांनी एका पत्रकान्वये केली आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाजात बदल घडवण्यासाठी साक्षरता हे एक परिणामकारक साधन आहे हे पोटतिडकीने पटवून देण्यासाठी पश्चिम खानदेशातील सन १९२४ ते सन १९८१ या कालावधीत शिक्षण प्रसार, समाजप्रबोधन, दलितोद्धार व

लोक साक्षरते–साठी खेडोपाडी फिरून शिक्षणाची ज्योत पेटवणारे, निस्वार्थपणे कार्य करणारे, प.पू.कै. बळीराम नागोजी कुंभार उर्फ ब.ना. कुंभार गुरूजी गावं बोदवड, जि.जळगांव पण धुळ्यालाच आपली कर्मभूमी मानणारे गुरुजी हे आपल्या धुळे जिल्ह्याचे एक प्रेरणास्थान होते. त्यांनी त्या काळात खान्देशात खेडोपाडी जाऊन कीर्तनाच्या माध्यमातून समाजात शिक्षणाची जनजागृती केली. स्वतःच्या स्वार्थाचा त्याग करून त्यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. त्याच्यात ब. ना. कुंभार गुरुजींचे प्रिय शिष्य व धुळ्यात जयहिंद शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ रोवणारे शिक्षण महर्षी झुलाल भिलाजीराव पाटील उर्फ झेड.बी.नाना पाटील होते. नानांनी त्यांच्या शाळेला म्हणजे जयहिंद बालमंदिरला त्यांचे गुरु प.पू.ब.ना. कुंभार गुरुजी हे नावं देऊन आपल्या गुरुंना एकप्रकारे गुरूदक्षिणाच दिली होती. तसेच खान्देशातील थोर स्वातंत्र्य सेनानी व्यंकटराव आण्णा रणधीर (धोबी) यांनी सुध्दा त्यांच्या वाघाडी ता. शिरपूर येथील शाळेला कै.ब.ना. कुंभार गुरुजी विद्यालय हे नावं दिले आहे. गुरुजींच्या या महान कार्याचा गौरव म्हणून त्याकाळी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शुभहस्ते दि. २६ मार्च १९६६ साली धुळे येथे या धवल मनाच्या थोर लोकशिक्षकाचा सदहृदय सत्कार करण्यात आला होता.

अशा या तपस्वी गुरुजींनी समाजाला शिक्षणाचा प्रकाश दिला, त्यांना धुळे शहराचा सन्मान मिळालाच पाहिजे. अशी भावना व्यक्त करत धुळे जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, शिक्षक, साहित्यिक, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी या मागणीस समर्थन दर्शविले असून त्यांच्या या महान कार्याचा सन्मान म्हणून धुळे शहरातील जयहिंद सोसायटीतील एका प्रमुख रस्त्यास ''प.पू. ब.ना. कुंभार गुरूजी मार्ग'' असे नाव देण्यात यावे, अशी जनभावना तयार झाली आहे. धुळे शहरातील शिक्षण प्रेमींनीही या अभियानाला समर्थन दिले असून धुळे शहर तसेच धुळे जिल्हा कुंभार समाजाच्या वतीने अध्यक्ष किशोरभाऊ कुंभार, उपाध्यक्ष दिनेशभाऊ वाघ, प्रदेश उपाध्यक्ष गोकुळभाऊ कुंभार, विभागीय अध्यक्ष रतीलालभाऊ कुंभार, प्रा. शेखर बागुल सर, तसेच ब.ना. कुंभार गुरुजी यांची कन्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या बालमैत्रीण शकुंतला अक्का बोरसे, गुरुजींचे नातू इंजि. आर्किटेक्ट चंद्रकांत बोरसे नाशिक, डॉ. दिलीप बोरसे पुणे, यांच्या प्रमुख उपस्थितीत लवकरच धुळे महानगरपालिकेकडे अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार अनिल चित्ते यांनी दिली आहे.

***

## प्राध्यापक वसंत चव्हाण लिखित पर्यावरण सार्वभौम या पुस्तकाचे अनोखे प्रकाशन संपन्न



आरोग्य, शिक्षण व पर्यावरण तज्ञ श्री सिद्धांत तथा प्रा. वसंत चव्हाण लिखित व वैशाली प्रकाशन, पुणे संपादित अवघ्या विश्वातील मानवाला पर्यावरण वाचविण्या–साठी जागे करून चिरंतन, शाश्वत सुखाचा सर्वंकष मार्गदर्शक जगातील पहिला ग्रंथ 'पर्यावरण: सार्वभौम अस्तित्वाचे सूत्र' याचा अनोखा प्रकाशन सोहळा साक्षात भगवान श्रीकृष्णाच्या हस्ते अर्थात श्रीमद्भागवतगीतेतील अध्याय १० मधील श्लोक २६ नुसार अमरत्व प्राप्त अश्वत्थ वृक्ष म्हणजे पिंपल जो भगवान श्रीकृष्णाचे रूप आहे त्या पिंपळ वृक्षाच्या फांदी सोबत. कारण पिंपळाच्या 'क्रॅसुलेसियन सिड मेटाबॉलिझम' प्रक्रियेमुळे ते दिवसा व रात्री निरंतर प्राणवायूचा पुरवठा करून सृष्टीतील सर्व सजीवांचा जीवनदाता अर्थात भगवान श्रीकृष्णाचे रूप आहे. इतर अनेक गुणधर्मांनी पिंपळ अहोरात्र पर्यावरण रक्षणाचा धर्म पळत आहे; हाच आदर्श घेऊन मानवाने पर्यावरण रक्षणासाठी त्याग समर्पणाने प्रयत्न करावेत व भविष्यातील जटील समस्या सोडविण्याचा मानवता धर्म व भूतदया धर्म पाळावा.

पुणे विद्यापीठाच्या बाहेरील पदपथावर पिंपळ वृक्षाच्या सोबत प्रकाशन सोहळा दि. ५ जून २०२६ शुक्रवारी पर्यावरण दिनी, पर्यावरण पूरक वेशातील लेखकाने पर्यावरण पूरक वेष्टनातील पुस्तकाचे पिंपळ वृक्षाच्या फांदीने वेष्टन फाडून पार पडला.

'पर्यावरण: सार्वभौम अस्तित्वाचे सूत्र' या शीर्षकांतर्गत पर्यावरण वाचविण्यासाठी जनतेला जागे करण्यासाठी लेखकाचे नैसर्गिक व पर्यावरण पूरक जीवनशैलीचे आहार व स्वच्छता इत्यादी रसायनमुक्त प्रयोग आपले आरोग्य व पर्यावरण वाचविण्यासाठी कसे यशस्वी आहेत; त्यानुसार पर्यावरणाच्या ऱ्हासास मानवाच्या किरकोळ कृतीसुद्धा किती घातक आहे हे स्पष्ट करणारे व समाजातील सर्व घटकातील जीवनशैली, प्रपंच, व्यापार, शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य, शेती, औषधे, कायदे, कर्मकांड, अंधश्रद्धा, पैसा कमावण्यासाठी पर्यावरणाला घातक उलाढाली, प्रगती व विकास याबाबत मानवाची अगतिक मानसिकता यावर आधारित व प्राचीन पर्यावरण आणि संस्कृतीशी संबंधित शाश्वत सुखाचे संदर्भ यावर आधारित एकूण १२६ प्रकरणातून जनतेला उद्याच्या मानवाचे भविष्य किती वाईट आहे हे पटवून दिले आहे. संपूर्ण लेखन हे मानवाने हजारो वर्षापासून पर्यावरण कसे बिघडवले आहे हे मानवाच्या इतिहासासह पटवून दिले आहे. अजूनही मानवाने पर्यावरणाच्या निर्मितीपासूनच्या कच्च्या आहाराचा पुरस्कार केला तर मानवाच्या आरोग्याच्या समस्या सुटतीलच शिवाय भावी पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने पर्यावरणातील शुद्ध हवा पाणी व अन्न वाचविणेही शक्य होईल आणि स्थिती बदलणे शक्य होईल असे प्रयोगासह वर्णन केले आहे. गीतेतील श्लोकाच्या संदर्भासह व तुकोबाच्या अभंगासह वास्तव पटवून देण्यासाठी वर्णन आहे. संपूर्ण लेखन समाजातील प्रत्येक वयोगटासाठी व प्रत्येक घटकासाठी उपयुक्त असे प्रबोधनात्मक असेच आहे.

विश्वातील प्रत्येक कुटुंबाच्या मार्गदर्शनासाठी जीवनाचे शाश्वत ज्ञान भांडार हा ग्रंथ आठवडाभरात सर्व पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध होईल. वाचकांना पुस्तक हवे असेल तर ते वैशाली प्रकाशन, पुणे यांच्याशी संपर्क करून पुस्तक मिळवू शकता.

(संपर्क क्र. ९८९०९३३७९०).

***



सदैव मदत करण्यास तयार राहा.

# श्रीसंत गोरा कुंभार व वाचन संस्कृती साहित्य पुरस्कार प्रेरणादायी ठरतील ह.भ.प. डॉ. पुरुषोत्तम महाराज कोळपकर



पुरस्कारार्थी मान्यवरांसमवेत प्रमुख पाहुणे



संत गोरोबाकाकांचे पुजन करताना उतस्थित मान्यवर

**श्रीरामपूर :** साहित्य ही जीवननिष्ठा मानून राज्यभरातील काही साहित्यिकांना श्रीसंत गोरा कुंभार व वाचन संस्कृती साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले, ते निरपेक्ष भक्ती, वाचन, लेखन कार्यासाठी सदैव प्रेरणादायी ठरतील असे मत श्रीसंत ज्ञानेश्वर सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष हभप डॉ. पुरुषोत्तम महाराज कोळपकर यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर जवळील शिरसगाव भागातील इंदिरानगर येथे श्रीसंत गोरा कुंभार प्रतिष्ठान व वाचन संस्कृती प्रतिष्ठान यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात हभप कोळपकर महाराज बोलत होते. प्रारंभी श्रीसंत गोरा कुंभार यांच्या ७०९ व्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात करून अभिवादन करण्यात आले. प्रा. विलासराव तुळे यांनी संत गोरोबा कविता सादर केली तर इयत्ता पाचवीतील निर्मिक गणेशानंद उपाध्ये याने श्रीसंत गोरा कुंभारविषयी भाषण केले. स्वागत, प्रास्ताविक करून डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपक्रम समिती अध्यक्षा प्रा. सौ.पल्लवी नंदकुमार सैंदोरे यांनी अध्यक्षीय सूचना मांडली तर उपाध्यक्ष नितीन प्रभाकर जोर्वेकर, कार्याध्यक्षा सौ. श्रद्धा चेतन तुळे यांनी अनुमोदन दिले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी टी.ई. शेळके, माळेवाडी येथील प्रगतीशील शेतकरी दत्तात्रय परभतदादा पा. औताडे, साहित्यिक सुखदेव सुकळे, हभप अशोकराव शिंदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. हभप भागवतराव पा. मुठे प्रा. एकनाथ औटी, आंतरभारती श्रीरामपूर शाखा अध्यक्ष प्राचार्य सुभाष लिंगायत, कुंभार समाजाचे नेते किसनदेव भागवत, ज्ञानेश्वर दुधाळे, माजी नायब तहसिलदार दत्तात्रय रायपल्ली, केंद्रप्रमुख किशोर गाढेगुरुजी, फकिरा वाघमारे, राजाराम वने, श्रीमती सुमन बाई मांढरे, सौ. सुनंदा वाघमारे, सौ. सुनीताताई पटारे, आसरा प्रकाशनच्या सौ. मोहिनी शिवाजी काळे, सौ. छायाताई सोनवणे, सौ. प्रमिलाताई वाबळे, धोबी, परिट समाज संगमनेर तालुकाध्यक्ष भारत गवळी, लहानू रहाणेसर, सौ. कुंदा तुळे, सौ. माधुरी जोर्वेकर, सौ. वैशाली गाढे, प्रा. शिवाजीराव बारगळ, डॉ. रामकृष्ण जगताप आदींची प्रमुख उपस्थिती लाभली.

हभप डॉ. पुरुषोत्तम महाराज कोळपकर यांनी प्रवचनरूपी भाषणातून श्रीसंत गोरा कुंभार म्हणजे तत्कालीन १३ व्या शतकातील सर्व संतांचे काका, संतपरीक्षक, मार्गदर्शक असल्याचे सांगून १२६७ ते १३१७ या ५० वर्षातील गोरोबा काकांचे भक्तिचरित्र आदर्शवत आहे, त्यांचे उपलब्ध २३ अभंग म्हणजे अभिजात मराठी भाषेचे भूषण असल्याचे सांगून उपक्रमाचे कौतुक केले. प्राचार्य शेळके यांनी तेर गावी मी बालपणी सतत जात असे. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील खुंटेगावजवळच तेर तीर्थस्थळ आहे, त्यांनी बालपणातील आठवणी सांगून असे कार्यक्रम करणारे डॉ.उपाध्ये, प्रा. तुळे, सैंदोरे, जोर्वेकर या परिवारास धन्यवाद दिले. प्रमुख पाहुणे प्रगतीशील शेतकरी दत्तात्रय पा. औताडे यांनी संतसेवा व साहित्यसेवा कार्यक्रमास प्रमुख पाहुणे होण्याचा मान मिळणे, मनोगत व्यक्त करणे हा दुर्मिळ क्षण आपल्या जीवनात आला, असेच उपक्रम हे खरे संतगुणी, माणुसकी संपन्न असल्याला अनुभव सांगितले. त्यांनी पुरस्कारार्थीचे अभिवंदन केले.

यावेळी प्रा. दिलीप सुखदेव सोनवणे, माजी मुख्याध्यापक द.सा. रसाळगुरुजी, शंकरराव जोर्वेकर यांना श्रीसंत गोरा कुंभार सर्वोत्कृष्ट ग्रंथनिर्मिती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. तर पत्रकार, ॲड. बाळासाहेब तनपुरे, माजी मुख्याध्यापक, ॲड. हरिश्चंद्र नाईक, सौ. वनिता राजाराम वने/शेटे, कवी, प्रा. पोपटराव पटारे, संतोष लेंभे, बाळासाहेब देशमुख यांना वाचन संस्कृती सर्वोत्कृष्ट ग्रंथनिर्मिती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सर्व पुरस्कारार्थींनी मनोगत व्यक्त केले. पुरस्कार समितीचे अध्यक्ष डॉ. शिवाजी काळे, कवयित्री संगीता फासाटे यांनी काम पाहिले. वनिता वने, राजाराम वने, रसाळगुरूजी तर्फे डॉ. उपाध्ये, डॉ. शिवाजी काळे यांचा सत्कार करण्यात आला. सौ. मंदाकिनी उपाध्ये, चेतन तुळे, ताराताई सैंदोरे, सौ. जयश्री जोर्वेकर, कृष्णा सैंदोरे, आराध्या सैंदोरे, सौ. रूपाली मोरे, सौ. मनिषा वाघमारे, सौ. विद्या वाघमारे, सविता जपे, ज्योत्स्ना राऊत, शालिनी निघुते, सुमन केदार, वैष्णवी जगदाळे, सिध्दी बोरुडे, प्रथमेश जोर्वेकर, आदिंनी नियोजनात भाग घेतला.

प्रा. विलासराव तुळे व प्रा. शिवाजीराव बारगळ यांनी सूत्रसंचालन केले तर संमोहनतज्ज्ञ डॉ. रामकृष्ण जगताप यांनी आभार मानले.

***

## क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांची 'अक्षय' विचारधारा सर्वात प्रभावी : डॉ.बाबुराव उपाध्ये



संत बसवेश्वर प्रतिमा पुजन करताना उपस्थित मान्यवर

**श्रीरामपूर :** क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वरांचा जन्म अक्षय तृतीयेला झाला. त्यांचे जीवन व कार्य (इ.स. ११०५ ते इ.स. ११६५) संपूर्ण मानवजातीला दिशादर्शक असून त्यांची अक्षय विचारधारा जपण्यातच मानवतेचे कल्याण असल्याचे मत वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर येथील बोरावके नगरमधील विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठान कार्यालयात क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबुराव उपाध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला डॉ. उपाध्ये यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सुखदेव सुकळे, संजय बुरकुले, सौ.सुरेखा बुरकुले, संकेत बुरकुले, सुयोग बुरकुले, सौ. वैष्णवी बुरकुले इत्यादींनी महात्मा बसवेश्वर व स्व. सौ. पुष्पाताई सुखदेव सुकळे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे संस्थापक, सचिव सुखदेव सुकळे यांनी डॉ. उपाध्ये यांना श्रमप्रतिष्ठा व प्रतिष्ठान कार्य पुस्तिका देऊन स्वागत केले. प्रास्ताविक मनोगतात सुकळे यांनी सांगितले की, गेल्या पाच वर्षापासून अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती एक समाजप्रबोधक उपक्रम म्हणून साजरी केली जाते. श्रीचक्रधर स्वामी, श्रीसंत ज्ञानेश्वर आणि संत परंपरेच्या आधी महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक समतेचा आणि स्त्रीपुरुष सन्मानाचे विचार मांडून क्रांतीविचार मांडले. ही विचारधारा आचरणात आणणे गरजेचे असल्याचे सांगून डॉ. उपाध्ये यांचा परिचय करून दिला. डॉ. उपाध्ये यांनी 'शोध: साहित्य बोध' हा ग्रंथ सुखदेव सुकळे यांना भेट देऊन या पुस्तकातील महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन, कार्यलेखाचा आढावा घेतला. डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. र.बा. मंचरकर, अ.मा. देशपांडे, सुधाकर मोगलवार यांच्या विचारांचे संदर्भ स्पष्ट करीत डॉ. उपाध्ये यांनी महात्मा बसवेश्वर ह्यांनी विश्वकल्याणाची केलेली मागणी यांचा ऊहापोह केला. त्यांच्या जीवनकाळाचे संदर्भ विविधतेने सांगितले जातात, परंतु १२ व्या शतकातील त्यांचे विचारधन हे अमृतधन असून ते कृतीत आणले पाहिजे, वीरशैव व लिंगायत असे भेद न मानता शुद्ध शिवभक्ती करावी आणि कर्मकांडाला दूर ठेवावे, हा त्यांचा विचार महत्वाचा असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन सुखदेव सुकळे यांनी केले तर सौ. सुरेखा बुरकुले यांनी आभार मानले.

---

## सिम्बॉयसिस दवाखाना लवळे येथे गरीब रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

सिंबायोसिस दवाखाना, भुगांव, लव्हळे तालुका मुळशी येथे आहे. खूप छान सुंदर दवाखाना आहे. Free and Paid असे दोन प्रकार आहेत. तुम्ही ठरवायचे आहे फ्री उपचार पद्धती करून घ्यायची आहे का पैसे देऊन. दोन्ही ठिकाणी डोक्याच्या केसांपासून पायाच्या नखापर्यंत कोणताही आजार असू दे उपचार होतात.

फ्री साठी सर्व काही मोफत व्यवस्था उपलब्ध आहे. दाखल झालेल्या रुग्णांना मोफत नाश्ता, चहा, दोन वेळा जेवण, दोन वेळा चहा, एक वेळ नाश्ता दिला जातो. रुग्णांच्या जवळ कोणालाही थांबायला परवानगी नाही. फक्त पासधारक सकाळी ११.०० ते १३.०० व संध्याकाळी १७.०० ते १९.०० या वेळी रुग्णांना भेटायला जाऊ शकतात. पण रुग्ण दाखल करण्यात येतो तेव्हा एकच पास मिळतो एका रुग्णाला. रुग्णांना बाहेरून खायला प्यायला देणे वगैरे साठी जाऊ देतात. पण ती वस्तू रुग्णांना देऊन पाच मिनिटे थांबता येते फक्त. सुमारे ७५० एकर जमीनवर हा सुसज्ज दवाखाना लव्हळे येथे आहे. तेथे 8 operation theatre आहेत. ती सुद्धा सर्व काही मोफत वैद्यकीय उपचार शस्त्रक्रिया.

मोफत वैद्यकीय शस्त्रक्रिया यासाठी जर रुग्णांना दाखल व्हायचे असेल तर १. आधार कार्ड, २. रेशन कार्ड, ३. उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर विवरण पत्र लागते. एकूण उत्पन्न ८,००,०००/- आठ लाख रुपये च्या आत लागते. पुण्यातील प्रसिद्ध व्यक्ती आदरणीय डॉ. शां. ब. मुजुमदार सर आणि डॉ. विद्या येरवडेकर हे दोघे याचे प्रमुख आहेत. सुमारे ७५० एकरवर, सुसज्ज आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दवाखाना उभारण्यात आला आहे. महाराष्ट्र नव्हे संपूर्ण भारतातून लोक येत असतात. मोफत वैद्यकीय उपचार करून घेण्यासाठी.

या दवाखाना शिवाय महिला वैद्यकीय महाविद्यालय, इंजिनियरिंग कॉलेज, MBA Courses वगैरे वगैरे खूप काही आहे.

Staff quarters, ladies hostels, nurses quarters, etc. खूप इमारती आहेत. शिवाय Symboisiss University ही Deemed University म्हणून शासनाची मान्यता मिळाली आहे. त्यामुळे त्याचे नाव Symboisiss University Hospital and Reaserch Centre असे आहे. 2D echo, ECG, MRI, CT Scan, Blood test, Sonography इत्यादी सर्व काही मोफत उपलब्ध आहे. तुम्ही ओपीडी मधे जाऊन मोफत वैद्यकीय उपचार घेऊ शकता. तसेच paid मधेही सर्व काही व्यवस्थित उपचार पद्धती आहे.

मी श्रीकांत कुलकर्णी माझा फोन नंबर +९१ ९०२१८ ३२४१७. अजून काही माहिती हवी असल्यास मला संपर्क साधावा.

***

# प्रेम, विश्वास आणि सेवाभावाचा गौरव; नामदेव रामलिंग कुंभार (उपव्यवस्थापक वित्त व लेखा) महावितरण यांचा सेवापूर्ती समारंभ उत्साहात संपन्न



मा. नामदेवराव कुंभार यांचा सपत्नीक सत्कार करताना उपस्थित मान्यवर

धाराशिव येथील स्वयंवर मंगल कार्यालयात मंगळवार दिनांक ३० जून २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता महावितरणचे अधिकारी नामदेव रामलिंग कुंभार उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला सत्कार समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार आणि भावनिक वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. नरेंद्र भागवत रडे (कार्यकारी अभियंता महावितरण विभागीय कार्यालय धाराशिव) हे असून, प्रमुख पाहुणे म्हणून मा. अरविंद बुलबुले (मुख्य अभियंता महावितरण परिमंडळ कार्यालय लातूर) हे असणार आहेत. तसेच या प्रसंगी मा. संजय आडे, (अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय धाराशिव) मा. नंदकुमार काळे, (कार्यकारी अभियंता विभाग तुळजापूर) सौ. निलांबरी कुलकर्णी, (कार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय धाराशिव) मा. जालिंदर मंगळवेढेकर, (वरिष्ठ व्यवस्थापक वि व ले) परिमंडळ कार्यालय लातूर) मा. राहुल पवार, (उपकार्यकारी अभियंता शहर उपविभाग धाराशिव) मा. प्रवीण बगाडे, (व्यवस्थापक वि व ले मंडळ कार्यालय धाराशिव) मा. स्वप्निल वाणी, (व्यवस्थापक मांस) मंडळ कार्यालय धाराशिव) अनंत कुंभार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद धाराशिव यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला. महावितरणमधील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी, मित्रपरिवार, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, आप्तस्वकीय यांच्या मोठ्या उपस्थितीमुळे समारंभाला विशेष शोभा प्राप्त झाली.

समारंभात अनेक मान्यवरांनी नामदेव रामलिंग कुंभार (उप–व्यवस्थापक वित्त व लेखा) यांच्या प्रेमळ, मनमिळावू आणि सर्वांना आपलेसे करणाऱ्या स्वभावाचा गौरव केला. गरज पडेल तेव्हा मदतीला तत्परतेने धावून जाणे, प्रत्येकाच्या सुख–दुःखात सहभागी होणे, सामाजिक कार्यात हिरिरीने सहभाग घेणे आणि जिव्हाळ्याने नाती जपणे, या गुणांमुळे त्यांनी समाजात आणि मित्रपरिवारात वेगळी ओळख निर्माण केल्याचे वक्त्यांनी सांगितले.

महावितरणमधील आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी सहकाऱ्यांशी जपलेले स्नेहपूर्ण संबंध, वरिष्ठांचा संपादन केलेला विश्वास, प्रामाणिक व कर्तव्यदक्ष कार्यपद्धती आणि संपूर्ण सेवाकाळातील निष्कलंक कारकीर्द याबद्दल उपस्थितांनी भरभरून गौरवोद्गार काढले. त्यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणारा हा समारंभ सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

यावेळी मा. नरेंद्र रडे (कार्यकारी अभियंता, महावितरण, धाराशिव) यांनी आपल्या भाषणात एक हृद्य प्रसंग सांगितला. त्यांनी सांगितले की, समारंभाच्या दिवशी सकाळी मा. अरविंदजी बुलबुले (मुख्य अभियंता, महावितरण परिमंडळ कार्यालय लातूर) यांचा त्यांना फोन आला. ''मी आज धाराशिवला येत आहे'', असे बुलबुले साहेबांनी सांगितल्यावर रडे साहेबांना वाटले की, ते विभागीय पाहणीसाठी (व्हिजिट) येत असावेत. त्यांनी भेटीचे ठिकाण विचारले असता बुलबुले साहेब म्हणाले, ''मी नामदेव कुंभार यांच्या सेवापूर्ती समारंभासाठी येत आहे.''

हा प्रसंग सांगताना रडे साहेब म्हणाले की, एवढ्या उच्च पदावरील अधिकारी एका कर्मचाऱ्याच्या सेवापूर्ती समारंभासाठी स्वतः उपस्थित राहणार, यावर क्षणभर विश्वासच बसला नाही. मात्र, ही उपस्थिती नामदेव रामलिंग कुंभार यांनी आपल्या प्रामाणिक कार्याने, नम्र स्वभावाने, कर्तव्यनिष्ठेने आणि जपलेल्या मानवी नात्यांमुळे वरिष्ठांच्या मनात निर्माण केलेल्या विश्वासाची आणि स्नेहाची जिवंत साक्ष होती. वरिष्ठांशी त्यांनी जपलेले आपुलकीचे नाते हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे वैशिष्ट्य असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले, तत्कालीन परिस्थितीची जान, शांत स्वभाव, कामावर निष्ठा, जन्मभूमीवर असलेले प्रेम, व सामाजिक, धार्मिक कार्यात असलेली आवड. यामुळेच ते अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे जिल्हा सचिव, विठ्ठल रुक्मिणी ट्रस्ट बेंबळीचे ट्रस्टी, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी स्टाफ को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे व्हाईस चेअरमन, गावातील १५ भूमिपुत्रांना एकत्रित करून बेंबळी ग्राम विकास ट्रस्टची स्थापना करून गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अशी ''संकल्प'' अभ्यासिका मोफत चालू केली. तसेच धाराशिव येथील सकल संत सेवा समितीमध्ये सदस्य म्हणून त्या मार्फत चालणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमात तन–मन–धनाने सहभाग.

समारंभाचे उत्कृष्ट नियोजन, स्वागत व्यवस्था आणि स्वादिष्ट भोजन यामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. प्रेम, मैत्री, सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा सेवापूर्ती समारंभ उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

***


विद्या हे माणसाचे सर्वात मोठे धन आहे.

# मुख्याध्यापक राजकुमार सेलूकर यांचा कुंभश्री तर्फे सत्कार



**मा. राजकुमार सेलूकर यांचा सत्कार करताना संजय राजे, अनिल शिर्के, सौ. सुनिता सेलूकर व डॉ. बालासाहेब सेलूकर**

**हिंगोली :** वसमत येथील आदर्श शिक्षक राजकुमार सेलूकर यांची वरिष्ठ मुख्याध्यापक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे समवेत आदर्श निवृत्त शिक्षक अनिल शिर्के सौ. सुनीता राजकुमार सेलुकर व सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉक्टर बालासाहेब सेलूकर.

राजकुमार सेलूकर यांचे अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, सरकारी अधिकारी व यशस्वी उद्योजक झाले आहेत. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या बरोबरच स्वतःच्या मुलांना सुद्धा उत्तम उच्च शिक्षण दिले आहे त्यांची मुलगी डॉ. सौ. रसिका सुरज कुंभार एमबीबीएस होऊन पुणे येथे एमडी करत आहे. त्यांचा जावई डॉक्टर सुरज शामराव कुंभार, सिल्वासा हे एमडी पॅथॉलॉजी मध्ये गोल्ड मेडलिस्ट आहेत. मुलगा डॉ. राम हा एमबीबीएस झाला असून त्याचे लग्न डॉक्टर ऐश्वर्या वैजनाथ कुंभार एमबीबीएस, सोलापूर हिच्याशी संपन्न होणार आहे. धाकटा मुलगा पृथ्वी हा यूएसए मध्ये एम एस कॉम्प्युटर सायन्स शेवटच्या वर्षाला शिकत आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो असं म्हटलं जातं त्याप्रमाणे पत्नी सौ. सुनीता यांच्या समर्थ साथीने त्यांनी मुलांना उत्तम संस्कार व शिक्षण दिले. राजकुमार यांचे भाऊ डॉक्टर बालासाहेब सेलूकर हे सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ आहेत त्यांची पत्नी सौ. ज्योती या फार्मासिस्ट आहेत उभयतांचे सर्व सोयींनी युक्त शिवम हॉस्पिटल वसमत मधील प्रसिद्ध अद्यावत असे हॉस्पिटल आहे.

या उभयतांना दोन मुले असून मुलगी कुमारी खुशी हिने इयत्ता दहावी सी.बी.एस.इ. बोर्ड मध्ये ९८ टक्के गुण मिळवले आहेत. पुढे तिला आयआयटी मधून इंजिनिअरिंग करायचे आहे, तर मुलगा अर्पित इयत्ता दुसरी ला शिकत आहे. सेलूकर कुटुंब अत्याधुनिक विचाराचे, उच्चशिक्षित, आदर्श एकत्र कुटुंब आहे.

दोन्ही भाऊ नोकरी आणि व्यवसाय सांभाळून प्रगतिशील यशस्वी शेतकरी म्हणून सुद्धा पंचक्रोशीत प्रसिद्ध आहेत. राजकुमार सेलूकर व सेलूकर परिवाराचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व भावी कार्यास शुभेच्छा!

***

# धाराशिव जिल्हा परिषद सदस्य जयवंत कुंभार यांचा कुंभश्री तर्फे सत्कार



**जयवंत कुंभार यांचा सत्कार करताना कुंभश्री संपादक संजय राजे व मान्यवर**

कळंब–नवनिर्वाचित धाराशिव जिल्हा परिषद सदस्य जयवंत कुंभार यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे समवेत डावीकडून बाबा कुंभार, अनिल शिर्के, कुंभार समाज महासंघाचे माजी युवा अध्यक्ष कल्याणराव कुंभार, कळंब तालुका कुंभार समाज अध्यक्ष बाळासाहेब कुंभार, संजय राजे, जयवंत कुंभार, महेश ईटकर, रमेश उलगे कुंभार, रोहन हरिचंद कुंभार व मान्यवर.

जयवंत कुंभार हे कुंभार समाज संघटनेचे धडाडीचे नेते आहेत, ते भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर मंगरूळ गटातून १००० पेक्षा जास्त मताधिक्याने निवडून आले.

त्यांचे शिक्षण डी फार्मसी असून कळंब बाजारपेठेमध्ये त्यांचे औषधाचे दुकान आहे तसेच ते प्रगतिशील शेतकरी आहेत. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती सदस्य आणि आता जिल्हा परिषद सदस्य असा त्यांचा अभिमानास्पद राजकीय प्रवास आहे.

जयवंतराव यांना दोन मुली एक मुलगा असून तिघेही उच्चशिक्षित आहेत, त्यांचे पाच भावांचे कुटुंब वारकरी सांप्रदायिक आहे. कळंब नगरीचे माजी नगराध्यक्ष कुंभार समाजाचे धडाडीचे नेते आदरणीय पांडुरंग तात्या कुंभार आणि जयवंतराव हे दोन राजकीय नेते कुंभार समाजाला योग्य दिशा देण्याचे काम करत आहेत.

याप्रसंगी कुंभार समाज व ओबीसी समाज बांधवांच्या अडीअडचणी संदर्भात साधक बाधक चर्चा करण्यात आली.

कळंब तालुका कुंभार समाज संघटनेच्या वतीने कुंभश्री संपादक संजय राजे आणि आदर्श निवृत्त शिक्षक अनिल शिर्के यांचा सत्कार करण्यात आला.

जयवंतराव त्यांचे कुटुंबीय आणि समस्त कळंब तालुका कुंभार समाजसंघटनेचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व भावी कार्यास शुभेच्छा!

***

## वै. विठ्ठलराव राऊत यांचे स्मृती प्रित्यर्थ गोरोबा काका पतसंस्थेच्या वतीने नागेश विद्यालयात वृक्षारोपण



**जामखेड :** सहकार सप्ताहानिमित्त वै विठ्ठलराव (अण्णा) राऊत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ जामखेड येथील श्री नागेश विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. नागेश विद्यालय स्कूल कमिटीचे सदस्य तथा श्री संत गोरोबाकाका कुंभार नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन विनायक राऊत यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पर्यावरण संवर्धनासह सहकार चळवळीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामखेडचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था दिलीपजी तिजोरे होते. तर रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग सल्लागार समिती सदस्य राजेंद्रजी कोठारी, पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. मधुकर राळेभात, नगरसेविका हिना सय्यद नगरसेवक मोहन पवार, स्कूल कमिटी सदस्य प्रकाश सदाफुले, सुरेश भोसले प्रा. शिवाजीराव ढाळे, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भोर मॅडम, प्रा. ज्ञानदेव कुंभार, अवधूत पवार, डॉ. सागर शिंदे, ॲड. अलताफ शेख, प्रदीप टापरे, वसीम शेख, अनिकेत पवार, विशाल वनवे, कॅ. भोरे, जितेंद्र बोरा, मुख्तार सय्यद, संतोष बारगजे, आनंद राजगुरू, महेश राऊत, संभाजी मुळे, नासीर सय्यद, बाबा चंदन, वनरक्षक किसनराव पवार, वनरक्षक सुधाकर घोडके, महादेव डोके, इमरान तांबोळी, अमोल बहिर, अशोक यादव, योगेश देशमुख, मच्छिंद्र गोरे, संतोष गिरी, अमोल सदाफुले, विकी पिंपळे, रामेश्वर सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील प्रतिमा पूजन करून प्राचार्य भगवान मडके यांनी प्रास्ताविकातून वृक्षसंवर्धनाची गरज आणि सहकार चळवळीचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय भाषणात दिलीप तिजोरे यांनी वाढती वृक्षतोड, बदलते हवामान आणि त्यातून निर्माण होणारे जागतिक संकट याविषयी चिंता व्यक्त केली. ''बिना सहकार नाही उद्धार'' या घोषवाक्याचा उल्लेख करत सहकाराच्या माध्यमातून दुर्बल घटकांचा विकास, संस्थांची प्रगती आणि समाजहित साध्य होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. यावेळी मधुकर राळेभात व राजेंद्र कोठारी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी श्री नागेश विद्यालयाच्या प्रांगणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. यामध्ये वड पिंपळ, जांभूळ, चिंच या झाडांना विशेष प्राधान्य देण्यात आले. पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेत कार्यक्रमात सहभागी नागरिक व विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंगळे सर यांनी केले, वृक्ष लागवडीसाठी एन सी सी ऑफिसर मयुर भोसले व एन.सी.सी कॅडेट टीमचे विशेष सहकार्य लाभले तर उपस्थितांचे आभार विनायक राऊत यांनी मानले. सहकार सप्ताहानिमित्त आयोजित या वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचला.

## भक्ती आणि सेवेचा त्रिवेणी संगम!

### संत गोरोबाकाका पुण्यतिथीनिमित्त बजाजनगरमध्ये कीर्तन व रक्तदान शिबीर

**- किशोर जाधव**





**खुलताबाद :** विठ्ठलाची निस्सिम भक्त म्हणून ओळखल्या जाणारे महाराष्ट्रातील थोर संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी चिंचबन कॉलनी, बजाज नगर येथील मंदिरात उत्साहात पार पडली, सकाळी साडेआठ वाजता गोरोबाकाकांच्या मूर्तीचा अभिषेक केला व त्यानंतर राम महाराज पांगरेकर यांच्या सुमधुर वाणीतून कीर्तनाचा सोहळा रंगला, संत गोरोबाकाकांच्या जीवन चरित्रावर अभ्यासपूर्ण संदर्भ देत गोरोबा काकांचा इतिहास भावपूर्ण वातावरणात कीर्तनातून मांडला, या कार्यक्रमासाठी परिसरातील व छत्रपती संभाजीनगर मधून हजारो भाविकांची उपस्थिती लाभली, याच कार्यक्रमाच्या औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, २० रक्तदात्यांनी रक्तदान केले, हा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी कुंभार समाजातील अनेक मान्यवरांचे मोलाचे योगदान असून पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात श्री संत गोरोबाकाकांचा पुण्यतिथी उत्सव बजाजनगर परिसरात पार पडला असून या कार्यक्रमाची सर्वत्र कुतूहलाने चर्चा होत आहे, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुंभार समाजातील ज्येष्ठ नागरिकासह तरुणांनी विशेष पुढाकार घेतला होता.

# शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभाला राष्ट्रीय पातळीवर गौरव
# प्रा. डॉ. वैजनाथ कानगुले यांना 'भारत गौरव प्रतिभा रत्न' पुरस्कार प्रदान



नावे

**नांदेड पॅटर्नचे जनक प्रा. गणेश चौगुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेत, गरीब आणि होतकरू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, या विचाराने डॉ. कानगुले यांनी शिक्षण क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली. स्पर्धा परीक्षांपासून शैक्षणिक प्रगतीपर्यंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे.**

**३० डिसेंबर २०२३ रोजी होसूर (तामिळनाडू) येथे एशिया इंटरनॅशनल कल्चरल रिसर्च युनिव्हर्सिटी, चेन्नई यांच्या वतीने त्यांना डी. लिट. ही मानद डॉक्टरेट बहाल करण्यात आली होती. तसेच २९ सप्टेंबर २०२४ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ, मथुरा यांच्या वतीने आयोजित भव्य दीक्षांत समारंभात त्यांना विद्यावाचस्पती ही दुसरी डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.**

**परळी वैजनाथ :** परळी वैजनाथच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या एका ऐतिहासिक क्षणात गेली तब्बल २७ वर्षे शिक्षण, समाजसेवा आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अहोरात्र झटणारे प्रा. डॉ. वैजनाथ कानगुले यांना दिल्ली येथे प्रतिष्ठेचा भारत गौरव प्रतिभा रत्न राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

२४ मे २०२६ रोजी दिल्ली इंटरनॅशनल अवॉर्ड कौन्सिल आयोजित भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मध्यप्रदेशचे राज्यमंत्री अशोक शर्मा, माजी आयएएस अधिकारी तन्वीर जफर अली, निवृत्त राज्य तांत्रिक प्रमुख विष्णू कंकणे आणि सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील मुकेश कुमार त्रिपाठी यांच्या हस्ते डॉ. कानगुले यांचा सन्मान करण्यात आला. या गौरवामुळे परळीसह संपूर्ण बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि परवडणारे शिक्षण मिळावे, या ध्येयाने प्रेरित होऊन डॉ. कानगुले यांनी २५ जून १९९९ रोजी ओम कोचिंग क्लासेसची स्थापना केली. अत्यल्प शुल्कात दर्जेदार शिक्षण देत त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. आज ओम कोचिंग क्लासेस हे केवळ शिक्षणसंस्था नसून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या यशाचे प्रेरणास्थान बनले आहे.

शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकीही जपणारे डॉ. कानगुले यांनी आतापर्यंत तब्बल २८ वेळा रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व्हावा आणि त्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने ते दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करतात. मराठी चित्रपटसृष्टीतील शरद पोंक्षे, अश्विनी एकबोटे, संजय मोने, किशोरी शहाणे, चिन्मय उदगीरकर, माधवी कुलकर्णी, तन्वी पालव यांसारख्या नामवंत कलाकारांनी या कार्यक्रमांना उपस्थिती लावली आहे. डॉ. कानगुले यांना यापूर्वीही सातारा येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, कोल्हापूर येथे नॅशनल युनिटी अवॉर्ड, ग्लोबल टीचर अवॉर्ड, बेळगाव येथे कर्नाटक गौरव रत्न, तसेच शिक्षणातील दीपस्तंभ यांसारख्या २१ प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

***

# तळेगावच्या प्रतिमाचे यश 'एव्हरेस्ट बेस कॅम्प'ची साहसी मोहीम फत्ते



**एव्हरेस्ट बेस कॅम्प मोहीम हा क्षण माझ्या आयुष्यातील अत्यंत अभिमानास्पद आणि अविस्मरणीय आहे. – प्रतिमा कुंभार**

**तळेगाव ढमढेरे :** तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील प्रतिमा विजय कुंभार यांनी खडतर समजली जाणारी 'एव्हरेस्ट बेस कॅम्प' मोहीम यशस्वी–रीत्या पूर्ण केली आहे. प्रतिमाने बी. टेक. शिक्षण पूर्ण केले असून, सध्या सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून त्या कार्यरत आहेत. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी ही साहसी मोहीम पूर्ण केली.

लहानपणापासूनच प्रतिमाला ट्रेकिंगचा छंद असून, शिवदुर्ग प्रेमी प्रतिष्ठान, गिरीप्रेमी ग्रुप आणि एस. एल. ॲडव्हेंचर या ग्रुपबरोबर दरमहा ट्रेक करते. 'एव्हरेस्ट बेस कॅम्प' मोहिमेपूर्वी कात्रज–सिंहगड नाईट ट्रेक, सिंहगड–राजगड–तोरणा दोन दिवसांचा नाईट ट्रेक तसेच हरिश्चंद्रगड नाईट ट्रेक अशा अनेक मोहिमा केल्या आहेत.

शुक्रवार (ता. १) ते शनिवार (ता. १६) दरम्यान पार पडलेल्या या मोहिमेची सुरुवात काठमांडू येथून झाली. लुकला, नामचे बाजार, डेंगबोचे आणि लोगोचे मार्गे एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंतचा प्रवास त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केला.

# गावातील आपल्या वाडी-वस्तीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मनोबल वाढवून त्यांना प्रोत्साहित करणारा... एक अनोखा उपक्रम आणि जाहीर आवाहन



पुणे कोकणस्थ कुंभार समाज पुणे समाजाचे संघटक संतोष चंद्रकांत साळवी (चिवेलकर) (मो.नं.९८५०५८४४५७) यांनी गावपातळीवरील विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे व त्याची ही सुरुवात त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील, तालुका दापोली येथील पालगड ''सोंडेघर कुंभार वाडी'' येथून केली. तेथील २०२६ या वर्षातील इ.१० वी पास कु. सिध्देश रूपेश कलमकर (८५.४०% मार्क्स), कु. स्नेहा प्रमोद कलमकर, कु. आर्यन कैलास कलमकर, कु. श्रेयस संदीप कासार तसेच इतर विद्यार्थीच्या घरी जाऊन यथोचित सत्कार केला त्याचप्रमाणे इतरांनीही या कार्याचे अनुकरण करावे असे जनमानसात त्यांनी आवाहन केले आहे.

नुकतेच इ.१० वी च्या परीक्षेचे निकाल लागले आणि सर्वत्र यशस्वी विद्यार्थ्यांच्या जल्लोषाचे वातावरण पसरले पण हा आनंद घरातील जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली वाकलेल्या खेड्यापाड्यातील, वाडी वस्तीमधील आपल्या विद्यार्थी मित्रांमध्ये जास्त काळ काही टिकताना दिसत नाही.

आपण अनेक वेळा आपल्या मुलांच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी किंवा इतर सणासुदीसाठी हजारो रूपये खर्च करून आपल्या गावी जात असतो त्या ठिकाणी राहत असणाऱ्या अनेक कुटुंबातील मुले अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. कष्टातून घरातील अनेक जबाबदाऱ्या पार पाडून जसे जमेल तसे आपली शैक्षणिक प्रगती करण्याचा प्रयत्न करीत असतात आणि कुटुंबातील कर्तेमंडळी त्यांना जमेल त्या प्रमाणात त्यांच्या प्राथमिक गरजा पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असतातच.

पण ज्याप्रमाणे सर्व सुखसोयी शहराच्या ठिकाणी उपलब्ध असतात तेवढ्या प्रमाणात त्यांना त्या मिळतातच असे नाही. संपूर्ण जीवनात शिक्षणात येणाऱ्या अनेक अडचणींना सामोरे जाऊन हेच विद्यार्थी त्यांच्या १०वी १२वी च्या परीक्षेत उत्तम गुण मिळवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असतात. मग त्यांच्यातील कर्तृत्वाची कोणीतरी दखल घेणे गरजेचे आहे. कोणतेही भेदभाव न ठेवता मग तो कोणी असो एक मानवतेच्या नात्याने त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण गरजेचं आहे. जेणे करून त्या सर्वांचे मध्ये एक नवी उमेद जागृत होऊन त्यांच्यातील शिक्षणाविषयीचा जोम आणि जोश अनंत पटीने वाढून त्यांना त्यांच्या जीवनात प्रोत्साहन मिळेल यासाठी मी पुणे, मुंबई येथील चाकरमान्यांना आवाहन करतो की मुलांच्या प्रयत्नांचे कौतुक करा. गुणांपेक्षा मुलांच्या शिकण्याच्या आणि मेहनतीचे कौतुक करा. यामुळे त्यांना अपयशाची भीती वाटणार नाही.

कोकणातील वाडीतील किंवा आपल्या गावातील १०वी १२वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या गावातील घरी जाऊन आपल्याला जी शक्य होईल ती शैक्षणिक मदत देऊन त्यांचा सत्कार करावा. आपण दिलेले १ पेन देखील त्या मुलांचे उज्वल भविष्य घडवायला निमित्त ठरू शकते व आपल्या एका प्रयत्नाने कोणाच्या तरी आयुष्याचे सोने होण्यासाठी आपण फक्त एक निमित्त ठरणार आहोत आणि तो एक क्षण तो विद्यार्थी कदापि विसरू शकणार नाही व त्या बरोबरच आपल्या स्वतःला ही या कार्यातून आत्मसमाधान लाभल्या शिवाय रहाणार नाही आणि म्हणूनच मी आपल्या सर्वांना पुन्हा एकदा मनःपूर्वक आवाहन करतो की आपण सर्वांनीच हे कार्य मनामधे घेऊन प्रामाणिकपणे सातत्य ठेवले तर आपापल्या गावातील विद्यार्थी मित्रांच्या जीवनात एक नवसंजीवनी भेटल्या शिवाय रहाणार नाही असे त्यांनी आपले मनोगत व आवाहन या लेखात केले आहे.

***

# 'अचिव्हर्स ऑफ द इयर'ने ऋतुजा कुंभार सन्मानित



**फुरसुंगी :** कल्याणीनगर येथील एक्सप्रेस आयटी मॅनपॉवर ग्रुप कंपनीच्या एच. आर. डिपार्टमेंटने जगभरात कुशल मनुष्यबळ कमीत कमी वेळात पुरवून हजारो तरुण–तरुणींना रोजगार उपलब्ध करून दिला.

या योगदानाबद्दल एक्सप्रेस आयटी मॅनपॉवरने ऋतुजा कुंभार यांचा अचिव्हर्स ऑफ द इयर या पुरस्काराने सन्मानित केले आहे. कल्याणीनगर येथील कंपनीने अनेक उच्चशिक्षित मुला–मुलींना आयटीमध्ये रोजगार मिळवून दिला आहे.

या कंपनीचा विस्तार जगभरातील सुमारे ५० देशांमध्ये आहे. ही कंपनी संपूर्ण जगभरात मनुष्यबळ पुरवते. या पुरस्काराचे यश केवळ माझे नसून ते आमच्या संपूर्ण टीमचे आहे, असे सांगत ऋतुजा कुंभार यांनी वरिष्ठांचे आभार व्यक्त केले.

***

## शेपवाडी येथे कुंभार समाजाच्या वतीने गुणवंत व आदर्श शिक्षकांचा गौरव

### शिक्षण आणि कौशल्याच्या जोरावरच समाजाची प्रगती शक्य : भागवत वैद्य



कुं. स. वतीने गुणवंत विद्यार्थी व आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

**अंबाजोगाई :** आजचे युग हे स्पर्धा आणि तंत्रज्ञानाचे आहे. अशा काळात कुंभार समाजाने केवळ पारंपारिक व्यवसायावर अवलंबून न राहता आधुनिक शिक्षण आणि कौशल्याची कास धरणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षण आणि कौशल्याच्या बळावरच समाजाची शाश्वत प्रगती शक्य आहे, असे प्रतिपादन कुंभार समाज विकास समितीचे कोषाध्यक्ष भागवत वैद्य यांनी केले.

शेपवाडी येथील गुणवंत सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अंबाजोगाई शहराजवळील शेपवाडी येथे कुंभार समाज उद्योगपुर्ती निधी लिमिटेड, संत शिरोमणी गोरोबाकाका सेवाभावी संस्था आणि गोरोबाकाका प्रतिष्ठान शेपवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ५ जुलै रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आणि विविध क्षेत्रातील यशवंतांचा बहुमान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समाजातील गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदितांना प्रेरणा देण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुंभार समाज विकास समिती बीडचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता कोंडीबा रामरुले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा कुंभार समाज विकास समिती बीडचे कोषाध्यक्ष भागवत वैद्य, खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथील मराठी विभागाचे प्रा. तावरे आणि संत गोरोबाकाका प्रतिष्ठान शेपवाडीचे विश्वस्त नारायण महाराज कोल्हापूरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

**शिक्षणामुळेच समाजाला नवी दिशा मिळेल.**

**आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. दत्ता कोंडीबा रामरुले म्हणाले की, शिक्षणाशिवाय समाजाचा उद्धार होऊ शकत नाही. गुणवंतांचा असा सत्कार केल्यामुळे इतर विद्यार्थ्यांनाही पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. संस्थेने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, ग्रामीण भागातील गुणवत्ता यामुळे मुख्य प्रवाहात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

याप्रसंगी सन २०२६ चा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्राप्त झाल्या–बद्दल प्रा. डॉ. रामरुले दत्ता कोंडीबा आणि सहशिक्षक दत्तात्रय रामभाऊ रेणापूरे यांचा संस्थेच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. तसेच मनीषा विठ्ठल परळकर (धावडी) आणि सचिन वैजनाथ तारळकर (सनगाव) यांची पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा फेटा बांधून व सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यासोबतच दहावी, बारावी आणि उच्च शिक्षणात घवघवीत यश संपादन केलेल्या कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी पुढे बोलताना भागवत वैद्य म्हणाले की, आपल्या मुलांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता उद्योग–व्यवसायातही नाव कमवावे. आज पोलिस पाटील पदी निवड झालेल्या तरुण–तरुणींनी आणि आदर्श शिक्षकांनी समाजाचा मान वाढवला आहे. विद्यार्थ्यांनी या यशवंतांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सनदी सेवा आणि इतर उच्च पदांवर पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावेत. समाज अशा गुणवंतांच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभा राहील असे ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा. तावरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नारायण महाराज कोल्हापूरे यांनी मानले. या कार्यक्रमाला शेपवाडी व परिसरातील कुंभार समाजातील नागरिक, महिला, युवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संत शिरोमणी गोरोबाकाका सेवाभावी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

---

## विकास संस्थेच्या प्रयत्नामुळे ५४ लाख रुपयांचा दंड माफ



**जळगाव :** संयम आणि एकनिष्ठपणा राखली की विजय हा नक्कीच होतो, असाच एक प्रकार जळगाव जिल्ह्यातील पाचोरा गाव भोजेचीच पुरे येथील प्रकाश कुंभार यांच्यासोबत घडला. प्रकाश कुंभार हे एक वीट उद्योजक आहेत. तीन–चार महिन्यापूर्वी पाचोरा तहसीलदाराने त्यांच्या वीट भट्टी वरती कारवाई करून त्यांच्या प्रॉपर्टी वरती ५४ लाख रुपये दंड स्वरूपात बोजा बसवला होता, पण ते म्हणतात ना, संयमी माणसाला कोणीही हलवू शकत नाही, हे प्रकरण झाल्यानंतर प्रकाश कुंभार यांनी मोहनराव जगदाळे साहेब व जळगाव अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था नाशिक विभागीय अध्यक्ष योगेशभाऊ हिवरकर, जळगाव जिल्हा अध्यक्ष पद्माकर भाऊ व समाधान भाऊ कुंभार यांच्याशी संपर्क साधला असता प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता तात्काळ पाचोरा तहसील धाव घेऊन, झाल्या प्रकरणाची विचारपूस करून, मोहनराव जगदाळे यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली व योगेशभाऊ हिवरकर, पद्माकर भाऊ शिरसाट, समाधानभाऊ कुंभार यांच्या प्रयत्नाने प्रकाश कुंभार यांच्या प्रॉपर्टी वरील बोजा हा कमी करण्यात आलेला आहे. विकास संस्थेचे पदाधिकारी यांचे अभिनंदन!

# कुंभार समाजातील कष्टकरी महिलेवरील अन्यायाविरोधात 'स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था' आक्रमक; महानगरपालिका सभापतींना दिले निवेदन

**छत्रपती संभाजीनगर :** कुंभार समाजातील कष्टकरी महिला सीताबाई पलये यांचा व्यवसायावर अतिक्रमण विभागाकडून करण्यात आलेल्या अन्यायाकारक कारवाईच्या निषेधार्थ 'स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थे'च्या वतीने महानगरपालिका सभापती अनिल भैंय्या मकरिये यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पीडित महिलेला तातडीने नुकसान भरपाई मिळवून देण्याची मागणी करण्यात आली.




> **संस्थेचा निर्धार : ''जोपर्यंत पीडित महिलेला योग्य न्याय आणि नुकसान भरपाई मिळत नाही, तोपर्यंत हे प्रकरण महानगर पालिकेत लावून धरले जाईल.''**
>
> **– श्रीराम तेलंग, राज्य युवक संपर्क प्रमुख**

**घटनेचा संक्षिप्त आढावा :** सीताबाई पलये या शहरातील कुंभार समाजातील एक गरीब कष्टकरी महिला असून, त्या माठ विक्री करून आपला उदरनिर्वाह करतात. नुकत्याच झालेल्या महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी मोहीमेदरम्यान, त्यांच्या व्यवसायावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत विक्रीसाठी असलेले मोठ्या प्रमाणावरील माठ फोडण्यात आले. ऐन उन्हाळ्यात प्रशासनाने केलेल्या या कृतीमुळे गरीब कुटुंबाचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे.

**सभापतींचा सकारात्मक प्रतिसाद :** या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि पीडित कुटुंबाने सभापती अनिल भैंय्य मकरिये यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या सविस्तर चर्चेनंतर, सभापतींनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी अतिक्रमण विभागाच्या सहाय्यक उपायुक्तांना तात्काळ सूचना देऊन पीडित महिलेला आवश्यक ती मदत करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

**उपस्थित मान्यवर :** श्रीराम तेलंग (राज्य युवक संपर्क प्रमुख), उत्तमराव मल्हारे (जिल्हा उपाध्यक्ष), बालाजीराव निंदाळे (जिल्हा सचिव), धीरजभैय्या सुरकुडे (जिल्हा कार्याध्यक्ष), प्रा. दता रामरळे सर (बीड जिल्हा उपाध्यक्ष), गोरवा राजरावठु (जिल्हा सहसचिव), भगवान बिजुते (जिल्हा युवा उपाध्यक्ष), विनोद हिवाळे (जिल्हा युवा संयोजक) आणि पीडित कुटुंब

**आमच्या प्रमुख मागण्या :** १) सीताबाई पलये यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीचा पंचनामा करून त्यांना तात्काळ भरपाई देण्यात यावी. २) भविष्यात गरीब कष्टकरी कुंभार समाजाच्या मालाची तोडफोड न करता, त्यांना पर्यायी जागेची व्यवस्था करून देण्यात यावी.

**इशारा :** प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संस्थेच्या वतीने देण्यात आला आहे.

***

# अतिक्रमणात झालेल्या नुकसानीची चौकशी करून भरपाई मिळवून देण्याचे किशोरदादा शितोळे यांचे आश्वासन; पीडित कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप





भाजपा शहरजिल्हा अध्यक्ष मा. किशोर दादा शितोळे आपण कुंभार समाजाच्या व्यवसायिकांना मनपा अतिक्रमण पथकाने ज्या मातीच्या माठांची व वस्तुचीं तोडफोड केली गेली त्या निगडीत अधिकारींशी फोनवर संपर्क करून तात्काळ चौकशी करून नुकसान भरपाई मिळुन देण्याचे आश्वासन दिले असता यावेळी मनपा सभागृह नेते मा. गोविंद केद्रें सर व सर्व सन्माननीय नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते व कर्तव्य म्हणुन आपण अन्न धान्य किट प्रत्येक कुटुबांना दिली, आपण जी आपुलकी, संवेदना दाखवली ते कौतुकास्पद आहेच त्या बद्दल आपले मन:पुर्वक धन्यवाद. या प्रसंगी कुंभार समाजाचे नेते संजय सुरेश जोरले (प्रदेश कार्याध्यक्ष) कुंभार समाज संघटना, महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते.

# मोहन जगदाळे यांची पुरंदर तहसीलदारांना भेट






पुरंदर तालुका कुंभार समाज वीट व्यवसायिक व मोहन जगदाळे यांनी मा. संदीप पाटील साहेब निवासी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पुरंदर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ७०० ब्रास माती उचलणेसाठी आपल्या कार्यालयाला महाराष्ट्र शासनाचे राजपत्र तसेच विभागीय आयुक्त कार्यालय पुणे तसेच जिल्हा अधिकारी कार्यालय पुणे यांचे लेखी आदेश असतानाही पुरंदर तहसीलदार कार्यालयाने ७०० ब्रास माती उत्खनन व वाहतूक करण्याची परवानगी दिली नसल्याचे सांगितले त्यावर नायब तहसीलदार साहेब यांनी पुढील काळात पुरंदर तालुक्यातील कुंभार समाज वीटभट्टी व्यावसायिकांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार ७०० ब्रास मातीवरील रॉयल्टी माफी व वाहतूक परवानगी दिली जाईल असे आश्वासन दिले. मोहनराव जगदाळे, बळवंत कुंभार फलटण, सुरेश कुंभार सासवड, हरी कुंभार जेजुरी, अशोकराव कुंभार काळेवाडी, हरिदास कुंभार सासवड, राजेंद्र कुंभार गुळुंचे, बाळासाहेब कुंभार गुळुंचे आणि सहकारी समाजबांधव यांनी मा. संदीप पाटील निवासी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. हरिदास कुंभार सासवडकर यांनी आभार मानले.

***

# शिरोमणी गोरोबा काकांच्या पुण्यतिथीनिमित्त खंडाळ्यात कीर्तन

## संत भरकटलेल्यांना चांगल्या मार्गाने घेऊन जातात : पल्लवी महाराज घोगरे



**भाविकांना मार्गदर्शन करताना पल्लवी महाराज.**

**खंडाळा :** समाजात अनेकांमध्ये सद्गुण असतात. अवगुणांचा त्याग झालेला नसतो. इतरांविषयी द्वेषभावना असेल तर तो पूर्ण सद्गुणी मानला जात नाही, असे प्रतिपादन भागवताचार्य पल्लवी महाराज घोगरे यांनी केले. वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथील संत गोरोबाकाका मंदिरात संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात त्या बोलत होत्या. संतांच्या मनात दुसऱ्यांविषयी आदर असतो. मदतीची भावना असते. भरकटलेल्या समाजातील प्रत्येकाला चांगल्या मार्गावर नेण्याचा हेतू असतो. त्यामुळे संत हे सद्गुणांचे महासागर आहेत, असे त्या म्हणाल्या. पुढे त्यांनी संत बहिणाबाईंचा अभंग सांगितला. तत्पूर्वी संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संत शिरोमणी गोरोबाकाका मंदिर संस्थान, समस्त गावकरी, भजनी मंडळ यांनी पुढाकार घेतला होता.

# रोटरी क्लब ऑफ आळेफाटाच्या अध्यक्षपदी राजेंद्र जाधव



**वडगाव आनंद :** जागतिक स्तरावर सामाजिक, शैक्षणिक व मानवसेवेसाठी कार्यरत असलेल्या रोटरी इंटरनॅशनलच्या रोटरी क्लब ऑफ आळेफाटा–मेन शाखेच्या सन २०२६–२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. यामधे क्लबच्या अध्यक्षपदी राजेंद्र जाधव यांची तर सचिवपदी शुभम ढमाले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. रोटरी क्लब ऑफ आळेफाटा–मेनने गेल्या काही वर्षांत विविध सामाजिक उपक्रम, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे घेवून परिसरात वेगळी ओळख निर्माण केली. अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी क्लबच्या सर्व सदस्यांचे आभार मानत, सामाजिक बांधिलकी जपत रोटरीच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. सचिवपदी निवड झालेल्या शुभम ढमाले यांनीही क्लबच्या कार्याला अधिक प्रभावी स्वरूप देण्यासाठी सर्व सदस्यांच्या सहकार्याने काम करण्याची ग्वाही दिली.

# कोकणवासीय युवकांनी मिळून धुमधडाक्यात संपन्न केले कोकण प्रीमियर लीगचे - ५ वे पर्व

– संतोष चंद्रकांत साळवी (चिवेलकर)






**पिंपरी चिंचवड :** कोकणातील चिपळूण तालुक्यातील कात्रोळी गावातील मुलांनी नोकरी व्यवसायात निमित्त पिंपरी चिंचवड पुणे शहरात आलेल्या मुलांसाठी क्रिकेटची स्पर्धा आयोजित केली होती, गेली ५ वर्ष ही स्पर्धा पिंपरी चिंचवड शहरात होत आहे. दरवर्षी या स्पर्धेचा प्रगतीचा आलेख चढता होतं चालला आहे त्यामुळे कोकणातील मुलं या स्पर्धेकडे क्रिकेट म्हणून नव्हे तर उत्सव म्हणून पाहत असतात आणि त्याचा मनमुराद आनंद सुद्धा घेत असतात.

या एकदिवसीय स्पर्धेत एकुण ८ संघांनी सहभाग घेतला होता त्यामध्ये संजय निवळकर यांचा जय हनुमान संघ ५ व्या पर्वातील विजयाचा मानकरी ठरला तर मंगेश साळवी यांचा अन्वी इलेव्हन संघ उपविजेता ठरला. कु. सौरभ म्हापदी यांचा कालिका माता ९ स्टार तृतीय तर मेतन बुरबाडकर यांचा प्रारंभ चॅम्पियन्स संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करत पालशेत गावचा राहुल पालकर हा मालिकावीर ठरला तर उत्कृष्ट फलंदाज सौरभ म्हापदी व उत्कृष्ट गोलंदाज राजेंद्र गावणंग हा ठरला.

या स्पर्धेसाठी टेरव गावचे आमचे मार्गदर्शक आणि आधारस्तंभ प्रकाशजी शिवणकर यांनी अपार मेहनत घेऊन सर्वोतोपरी योगदान देऊन कोकणी मुलांना एकत्रित आणण्याच्या संकल्पनेत मोलाचा वाटा उचलला. या स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवडचे राष्ट्रवादीचे विद्यमान नगरसेवक यश दत्ताकाका साने आणि भाजपचे विद्यमान नगरसेवक अनुपजी मोरे यांनी भेट देऊन सर्व मुलांना शुभेच्छा दिल्या व या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवडचे नगरसेवक सिद्धार्थ अण्णासाहेब बनसोडे, नगरसेवक राहुलभाऊ हनुमंतराव भोसले, नगरसेविका सौ. सारिकाताई मासुळकर, नगरसेविका डॉ.सौ. वैशालीताई घोडेकर यांनी बहुमूल्य असं योगदान दिले. त्याचबरोबर युवा उद्योजक मेतन बुरबाडकर यांनी देखील मोलाचं योगदान या स्पर्धेला दिले.

गजानन बागावडे, अमोल निवळकर, राजेंद्र निवळकर, संतोषजी कुंभार, दिपक बुरबाडकर, किरणदादा पवार यांनी आर्थिक स्वरूपात मदत करून या स्पर्धेला बळ दिले.

या स्पर्धेसाठी खास आमच्या आग्रहाखातर गावावरुन अनंतजी गुढेकर, लवूशेठ दहिवलकर उपस्थित राहिले, त्याचप्रमाणे कोकणस्थ कुंभार समाजाचे खजिनदार किरणदादा पवार, कार्याध्यक्ष संतोषजी कुंभार, युवा अध्यक्ष सुहासदादा शिरकर, उद्योजक संदिपभाऊ शिरकर, अजय साळवी, पालपेणे गावचे योगेश खैर तसेच आमच्या मुंबई पुणे मंडळातील विविध पदाधिकारी यांनी सदिच्छा भेट दिली व या स्पर्धेसाठी मेहनत घेणाऱ्या सर्व मुलांचे कौतुक देखील केले.

---

# राजश्री नांदेडकरचे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत यश



**नांदेड :** समाजसेवक तथा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विश्वासू प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर यांची मुलगी व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ एज्युकेशन बीएड ची विद्यार्थिनी कु. राजश्री शंकरराव नांदेडकर हिने केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा चांगल्या गुणांनी पास झाल्या बद्दल व या पूर्वी तिने टीईटी परीक्षा पास झाली आहे ह्या सीटीईटी टीईटी या दोन्ही ही अवघड अशा शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. राजश्री ने या यशाचे श्रेय तिचे आई–वडील व गुरुजनांना दिले आहे. कमी वयात तिने हे ध्येय गाठले आहे. सीटीईटी टीईटी या दोन्ही परीक्षा चा पूर्ण निकाल दोन तीन टक्के लागला आहे.

# रामभाऊ थोरावडे यांची ९४ वी जयंती साजरी




कोल्हापूर शहर जिल्हा व महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय चळवळीतील अग्रेसर रिक्षा युनियनचे ज्येष्ठ नेते कै. रामभाऊ भै. थोरावडे (बापू) यांची ९४ वी जयंती न्यू करवीर ऑटोरिक्षा युनियन, बिंदू चौक येथे पार पडली. डॉ. डी. वाय. पाटील ग्रुपचे विश्वस्त मा. सुर्यकांत तोडकर (सर), परिवहन समिती सदस्य प्रसाद जाधव, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना, उपाध्यक्ष मा. रघुनाथ कांबळे, शिवाजी विद्यापीठ निवृत्त अधिक्षक परीक्षा विभाग, रमेश गवळी (सर), राजेंद्र थोरावडे अध्यक्ष न्यु करवीर रिक्षा युनियन, सामाजिक कार्यकर्ते राजेश मांडवकर यांनी फोटोला पुष्पगुच्छ अर्पण करून फोटोपूजन केले.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अविनाश पाटील, गजानन विभूते, वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे सतिश दिवटे, किरण व्हणगुते, प्रसाद जाधव, सुर्यकांत तोडकर, राजेश मांडवकर, राम कारंडे, सतिश वडणगेकर यांनी बापूंची रिक्षा व्यावसायिकांच्या न्याय हक्कांसाठी अत्यंत चांगल्या प्रकारे न्याय मिळवून दिला. आपल्या एकूण जीवनकाळात प्रामाणिकपणा, सचोटी तसेच बेघरांना नाना पाटील नगर येथे घरे व रिक्षा चालकांना कळंबा येथे गृहनिर्माण संस्था तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये भाग घेऊन एक महिना कारावास भोगला होता. कोल्हापूरातील खराब रस्ता संदर्भात सन १९७९-८० महापौर निवडीवेळी महापालिकेला रिक्षासह पूर्ण घेराव घालण्यात आला होता व त्यावेळी कोल्हापूरातील नागरिकांनीही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. ते आंदोलन यशस्वी होऊन नगरसेवक व रिक्षाचालकांच्या बैठकीतून संपूर्ण रस्ते नव्याने करणेत आले व ते दर्जा चांगला असल्यामुळे ते रस्ते भरपूर वर्षे टिकून राहिले. या आंदोलनाचे नेतृत्त्व बापू यांनी केलेले होते. तसेच गरीब, कष्टकरी लोकांसाठी त्यांच्या न्यायहक्कासाठी व त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होण्यासाठी नेहमी झटत राहिले. सर्वांनी बापूंची कामाचे आठवण व वारसा जपण्यासाठी पुढच्या पिढीला एक त्यांचे मार्गदर्शन व्हावे म्हणून त्यांचे नावे एक मार्गदर्शन संस्था आपल्या सर्वांच्या सहभागाने व्हावी. अशा प्रकारचे भावना व्यक्त केल्या. सर्वानी कोल्हापूरात कै. बापूंचे स्मारक व्हावे अशीही इच्छा व्यक्त केली.

सदर प्रसंगी खालील मान्यवरांनी बापूंच्या फोटोला पुष्पगुच्छ अर्पण केले. प्रशांत आतकिरे, तुषार जामसांडेकर, बुधले, सुभाष सुर्वे, दिपक खांडेकर, चंद्रकांत सांळोखे, विनायक माजगांवकर, अनिल कुंभार, सचिन बिरंजे, संजय तळसकर, रमेश पाटील, सचिन थोरावडे, रमेशराव हावळ, रणजित चव्हाण, सागर श्री मारूती पोवार, साळोखे, निवास ब्रम्हपुरे, निलेश सावंत, अमित, चेतन प्रभु, राष्ट्रप्रेमी रिक्षा संघटना विनोद शिंदे, वाहतुक संघटना दिलिप बोंद्रे, अशोक राऊत, नामदेव कुंभार, साजन माजगांवकर, पिंटू पुरेकर, दिलीप थोरावडे, दिलिप कातवरे, मनोज थोरावडे, रविंद्र थोरावडे, सुभाष थोरावडे, अभिषेक खुपेरकर, सचिन बिडकर, सोनल वडगांवकर, कैलास मेघाणे, गजानन बावडेकर, शामराव देशमुख, मगरसाहेब, प्रकाश निगडे, दत्तात्रय जाधव, गौरव लांडगे, वैभवराजे, फिरोज शेख, कराळे, कांबळे, कोठावळे, रमेश दळवी, न्यु करवीर रिक्षा युनियन करवीर संघटना, ज्येष्ठ नागरिक संघटना, करवीर ऑटोरिक्षा गृहनिर्माण संघटना श्री दत्त महाराज तालीम मंडळ, स्वाभिमानी वृत्तपत्र संघटना, शिवाजी रोड व्यापारी संघटना, सिटीजन फोरम, कुंभार समाज, अनेक कार्यकर्ते व मान्यवर हजर होते.

***

---

# इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे चमकदार यश चिन्मय पाटणकर राज्यात द्वितीय



**मार्डी :** दहिवडी (ता. माण) येथील रयत इंग्लिश मीडियम स्कूलचा इयत्ता पहिलीचा विद्यार्थी चिन्मय अमोल पाटणकर याने राज्यस्तरीय भारतीय अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत १५० पैकी तब्बल १४६ गुण मिळवून राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. अत्यंत लहान वयात मिळवलेले हे यश दहिवडी परिसरासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. चिन्मयच्या या यशामागे शाळेचे प्राचार्य सौ. ज्योती सूर्यवंशी यांचे सक्षम नेतृत्व, वर्गशिक्षिका सौ. रेणुका वाघंबरे यांचे परिश्रम तसेच मार्गदर्शक शिक्षक स्वामी सर यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय पालकांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन व पाठबळही त्याला लाभले. नुकताच रहिमतपूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत चिन्मयचा ट्रॉफी, प्रमाणपत्र व शिष्यवृत्ती देऊन गौरव करण्यात आला. या सोहळ्यात त्याच्या उल्लेखनीय यशाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. दरम्यान, रयत इंग्लिश मीडियम स्कूल, दहिवडीच्या अनेक विद्यार्थ्यांनीही जिल्हा गुणवत्ता यादी व केंद्र गुणवत्ता यादीत घवघवीत यश मिळवले असून शाळेच्या शैक्षणिक दर्जाची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून चिन्मय पाटणकर, त्याचे पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन होत असून त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नितीन करडेकर यांच्या काव्यात सृजनशीलता : योगेश सोमण
# प्रा. डॉ. नितीन करडेकर लिखित 'कनिक' काव्यसंग्रहाचे प्रकाशन




**'कनिक' काव्यसंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी उपस्थित (डावीकडून) नारायण कुंभार, महेंद्र मोटे, डॉ. धनपाल कांबळे, डॉ. नितीन करडेकर, योगेश सोमण, डॉ. संगीता बर्वे, सुनील उंब्रजकर, मनोहर सोमवंशी व मान्यवर**

**पुणे :** काव्य म्हणजे संक्षिप्त शब्दसंचयातून संपूर्ण भावनेला उद्गारीत करणारे, वैश्विक आशय सांगणारे साहित्य होय. कवी आपल्या प्रतिभेतून, अभ्यासपूर्ण शैलीतून अंर्तनादाची निर्मिती करीत असतो. काव्याच्या माध्यमातून 'स्व'पासून समेष्टीपर्यंत विरघळत जात भावना संस्थापित करतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी केले.

प्रा. डॉ. नितीन करडेकर लिखित 'कनिक' काव्यसंग्रहाचे प्रकाशन आज (दि. ५) महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात योगेश सोमण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

वेदांतश्री प्रकाशनतर्फे काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. बालसाहित्यिका, कवयित्री डॉ. संगीता बर्वे, तंत्रशिक्षण संचालनालयाचे सहसंचालक डॉ. धनपाल कांबळे, प्रकाशक सुनील उंब्रजकर, टाटा मोटर्सचे उप महाव्यवस्थापक महेंद्र मोटे, नारायण कुंभार, मनोहर सोमवंशी मंचावर होते. लेखनाविषयी बोलताना प्रा. डॉ. नितीन करडेकर म्हणाले, मी तंत्रक्षेत्रात कार्यरत असूनही काव्यनिर्मिती करताना माझ्यातील अस्वस्थता, सर्जनशीलता, प्रत्येक विचारात दडलेला गर्भितार्थ काव्यनिर्मितीसाठी उपयुक्त ठरला. अभियंता ज्याप्रमाणे सातत्याने नवनिर्मितीसाठी कार्यरत असतो, त्याप्रमाणे साहित्यिक देखील शब्दभावनांसह निर्मितीसाठी प्रयत्नशील असतो.

योगेश सोमण म्हणाले, कवीच्या अस्वस्थतेमधून काव्याची निर्मिती होत असते. नितीन करडेकर यांच्या काव्यातून सृजनशीलता आणि अस्वस्थता जाणवते. ही सृजनशील अस्वस्थता त्यांनी कायम जपत रहावी. डॉ. संगीता बर्वे म्हणाल्या, प्रत्येक व्यक्तीने बालपणापासूनच वाचन, काव्य आणि रसिकतेचे बीज आपल्या आंतरआत्म्यात जपलेले असते. त्या बिजातून वृक्ष निर्मिती होण्यास योग्य तो कालावधी यावा लागतो. जीवनातील अनुभव, शब्दांची उर्जा यातून काव्याची निर्मिती होते. नितीन करडेकर यांच्या काव्यातून त्यांची सर्जनशीलता दिसून येते. मराठी भाषा जपण्यासाठी, ती प्रवाहित होण्यासाठी, पुढील पिढीत संक्रमित होण्यासाठी साहित्यनिर्मिती होणे गरजेचे वाटते. उदंड गवतासारखी काव्यनिर्मिती होत असली तरी बंजरभूमीपेक्षा हिरवळ पसरणे गरजेचे वाटते.

पुस्तकाच्या निर्मितीमागील भूमिका मांडताना सुनील उंब्रजकर म्हणाले, डॉ. नितीन करडेकर यांच्या काव्यात पूर्वकालीन आणि समकालीन कवींचे अनुकरण जाणवत नाही. तसेच नवखेपणाची खूणही आढळत नाही. डॉ. धनपाल कांबळे, महेंद्र मोटे यांन मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकपर स्वागत नारायण कुंभार यांनी केले. उपस्थितांचे स्वागत डॉ. नितीन करडेकर, डॉ. नीलम करडेकर, प्रशांत बनकर, नरेंद्र सोमवंशी, मनोहर सोमवंशी, नितेश सोमवंशी यांनी केले.

सूत्रसंचालन ऋचा कर्वे यांनी केले तर आभार मनोहर सोमवंशी यांनी मानले. सुरुवातीस अथर्व बोत्रे यांनी बासरीवर राग भटियार सादर केला.

---

# श्री संत गोरोबा काका कुंभार व श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी साजरी



**नावे**

**केळगाव :** निलंगा तालुक्यातील केळगाव येथे वैराग्याचा महामेरू श्री संत गोरोबा काका कुंभार व श्री स्वामी समर्थ महाराज यांची पुण्यतिथी कुंभार समाजाकडून साजरी १४/०४/२०२६ रोजी ह.भ.प. पूजाताई नरवटे बोरसुरीकर यांचा कीर्तन हरिजागराचा कार्यक्रम झाला व १५/०४/२०२६ रोजी गुलाल उधळण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी गावातील भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ व कुंभार समाज सामाजिक संस्था सोशल मीडिया निलंगा अध्यक्ष हरी राजारकर, भागवताचार्य संगमेश्वर महाराज पटवारी, ह.भ.प. शाम महाराज केळगावकर, आकाश जेकेकुरे, सुधाकर पाटील, बाबुराव राजारकर, गहिनीनाथ काळे, धोंडीराम माळी, तानाजी राजारकर, गोरोबा काका पाटील व समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते.

***

# धावपटू अनुष्काची कर सहाय्यकपदी निवड

## प्रेरणादायी प्रवास; गुणवंत खेळाडू कोट्यातून झाला आगळा सन्मान

– सुनील शेडगे

**नागठाणे :** प्रतिकूल परिस्थितीत अत्यंत जिद्दीने आपला लौकिक निर्माण करणाऱ्या धावपटू अनुष्का कुंभार हिची मुंबईतील मुख्य आयकर आयुक्त कार्यालयात कर सहाय्यकपदी निवड झाली आहे.

अभिमानास्पद बाब म्हणजे गुणवंत खेळाडू कोट्यातून तिला हा सन्मान प्राप्त झाला आहे. अनुष्का ही सातारा तालुक्यातील वर्णे गावची रहिवासी. तिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत यश संपादन केले आहे. तिचे वडील दत्तात्रय कुंभार हे शेती अन् स्वतःचा पारंपरिक व्यवसाय करतात. आई स्वाती या गृहिणी आहेत. या दांपत्याने अनुष्कासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. त्यातून ती आज देशातील अव्वल दर्जाची धावपटू म्हणून ओळखली जाते.

शालेय जीवनापासूनच आपल्या क्रीडा नैपुण्याची चमक दाखविणाऱ्या अनुष्काची कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे. प्राथमिक शाळेत असताना तिने यशवंतराव चव्हाण क्रीडा स्पर्धेतून सर्वांचे लक्ष वेधले. पुढे गावातील श्री काळभैरव विद्यालयात शिकत असतानाही तिने भरीव कामगिरी बजाविली.

**राष्ट्रीय स्पर्धांतून यश :** साताऱ्यातील ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक बळवंत बाबर यांनी अनुष्काच्या कर्तृत्वाला पैलू पाडले. कोलंबिया, कुवेत देशांत झालेल्या मैदानी स्पर्धांत तिने यशाला गवसणी घातली. त्याआधी तिने पुणे, गुवाहाटी, भोपाळ, चैन्नई, छत्तीसगड, नदीयाल येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांतूनही पदकांची कमाई केली.



**केवळ खेळाच्या बळावर शासकीय नोकरीत अधिकारीपदी झालेली अनुष्काची निवड अभिमानास्पद ठरणारी आहे. ग्रामीण भागातील मुलींना त्यातून नक्कीच प्रेरणा मिळेल.**
**– दत्तात्रय कुंभार, अनुष्काचे वडील**

**प्रतिकूल परिस्थितीत सराव :** अनुष्का ही ग्रामीण भागातील. फारशा सोयीसुविधा नसतानाही तिने आपल्या सरावात कधीच खंड पडू दिला नाही. वर्णेतील पंचाचा माळ असो वा वर्णे – अंगापूर रस्ता असो, या ठिकाणचा तिचा सराव कधीच चुकत नसे. तिचे वडील दत्तात्रय कुंभार यांची जिद्दही याकामी महत्त्वपूर्ण ठरली. वर्णेतून ते रोज दुचाकीवरून तिला साताऱ्याला सरावासाठी ने–आण करत.

---

# कुंभार समाजासाठी सात महिने माती उपशास परवानगी

## शासनाचा निर्णय; विशेष क्लस्टर उभारणार



बैठकीत डॉ. पंकज भोयर व अन्य

**वर्धा :** राज्यातील कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, पिढीजात कुंभार कुटुंबांना वर्षातील सात महिने मात उपसा करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष व्यावसायिक क्लस्टर उभारण्याचा निर्णय मंत्रालयात बुधवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाबद्दल कुंभार समाजाचे नेते संजय गाते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे आभार मानले.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, पिढीजात कुंभार कुटुंबांना विटा, कौले तसेच इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी वर्षाकाठी ७०० ब्रासपर्यंत माती विनामूल्य आणि कोणत्याही रॉयल्टीशिवाय उपसा करता येणार आहे. यासाठीचा परवाना दरवर्षी ९ नोव्हेंबर ते ३० मे या सात महिन्यांच्या कालावधीसाठी सलग स्वरूपात देण्यात येणार आहे. नदी, नाले किंवा सरकारी पडिक जमिनीमधून केवळ माती उपशाच्या उद्देशाने माती काढण्यात आल्यास ७०० ब्रासच्या मर्यादेपर्यंत कोणताही दंड आकारला जाणार नाही.

सकल कुंभार समाज विकास परिषदेचे अध्यक्ष संजय गाते यांनी समाजाच्या विविध मागण्यांसंदर्भात २१ फेब्रुवारी रोजी वर्धा येथे राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी महसूल व ऊर्जा विभागाशी संबंधित मागण्यांवर मंत्रालयात बैठक घेऊन सकारात्मक निर्णय करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. तसे पत्र पंकज भोयर यांनी २६ फेब्रुवारी रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिले. त्यानंतर डॉ. भोयर आणि संजय गाते यांच्या पाठपुराव्यामुळे मंत्रालयात बुधवारी विशेष बैठक आयोजित करण्यात आली. चर्चेनंतर या मागण्या मान्य करण्यात आल्या.

राज्यातील ज्या भागांत पिढीजात कुंभार समाज वास्तव्यास आहे, त्या ठिकाणी मडकी, मूर्ती व वीट व्यवसाय करणाऱ्या कुंभार परिवाराकरिता कुंभार खाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय, कुंभार समाजाला व्यवसायासाठी विशेष प्रमाणपत्र देऊन वीजदरात देण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर येथील वीज प्रकल्पांमधून निघणारा रिजेक्ट कोल व फ्लाय ॲश मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

## भक्तीमय वातावरणात श्री संत गोरोबा काकांची ७०९ वी पुण्यतिथी संपन्न; अमरावतीत भव्य पालखी व कीर्तन सोहळा. विदर्भ कुंभार सुधार समितीचा उपक्रम.

- डॉ. विलास नांदुरकर, प्रसिद्धी प्रमुख







**अमरावती :** कुंभार समाजाचे आराध्य दैवत श्री संत गोरोबा काका यांची ७०९ वी पुण्यतिथी अमरावती येथील शशी नगर, बडनेरा रोड स्थित 'श्री संत गोरोबा काका भवन' येथे नुकतीच अत्यंत भक्तीभावाने व उत्साहात संपन्न झाली. विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्याला कुंभार समाज बांधवांची मोठी उपस्थिती लाभली. विशेषत: महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**पालखी प्रदक्षिणा व भक्तीचा जागर :**

पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला गोरोबा काका भवनात कलश पूजन आणि तीर्थ स्थापनेसह माहुली जहांगीर येथील 'श्री संत गजानन महाराज महिला भजन मंडळ' व 'श्री नवदुर्गा महिला भजन मंडळ' यांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम पार पडला. बुधवारी पहाटे सूर्योदयाच्या साक्षीने गोरोबा काकांच्या मूर्तीला पंचामृत स्नान आणि दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर गोरोबा काकांच्या पादुकांची फुलांनी सजवलेल्या पालखीत स्थापना करून मंदिरातून भव्य पालखी प्रदक्षिणा काढण्यात आली. शशी नगर आणि बडनेरा रोड (समर्थ वाडी गेट) मार्गे निघालेल्या या प्रदक्षिणेत दिंड्या, पताका, भजनी मंडळे आणि महिलांच्या पावल्या-फुगड्यांनी परिसरात भक्तीचा रंग भरला. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

**ह.भ.प. सोपान महाराजांचे सुश्राव्य कीर्तन :**

पालखी मंदिरात दाखल झाल्यानंतर ह.भ.प. सोपान महाराज सरोदे यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. त्यांनी गोरोबा काकांचे जीवनचरित्र, रुपक आणि अभंगांचे दाखले देत भाविकांना मंत्रमुग्ध केले. या कीर्तनाला ह.भ.प. रमेश अंबुलकर, मारोती तांबट, वाटाने, बुरघाटे आणि राठोड यांच्या संचाने उत्तम संगीत साथ दिली. कीर्तनानंतर सामूहिक आरती, तीर्थ विसर्जन आणि गोपाळकाल्याच्या प्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

पुण्यतिथी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विदर्भ कुंभार समाज सुधार समितीचे अध्यक्ष सुधाकर शेंडोकार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणी सदस्य व पदाधिकारी उपाध्यक्ष ॲड. गजानन तांबटकर,



सचिव सुरेन्द्र सरोदे, सहसचिव मधुकर खांडेकर, कोषाध्यक्ष सतीश गावंडे, युवाध्यक्ष रमेश अंबुलकर, जिल्हाध्यक्ष सुनील भागवत, महिला मंडळ अध्यक्ष श्रीमती प्रभाताई भागवत, निर्मलाताई नांदुरकर, सर्वश्री विनायक तायडे, विनोद मेहरे, राजेंद्र भागवत, विलास धामणकर, दिनेश टेंबरे, विजय गुंजते, गजानन गुजरे, नंदकिशोर नांदुरकर, नंदकिशोर काकडे, नंदकिशोर काळकर, मोहन नांदूरकर, मारोती तांबट, सुनील काळकर, राजेंद्र मांगुळकर, अरुण पोहनकर महिला प्रतिनिधी श्रीमती सविता कोल्हे, सौ. सविता काकडे, सुषमा काळकर, सुषमा काकडे, नंदाताई पोहनकर, सचिव प्रा. वैशाली नांदुरकर, शोभा नांदुरकर, संगीता साळविकर, वैशाली सरोदे, वंदना काळकर, मंदाताई काळे व असंख्य समाज बंधु भगिनींनी अथक परिश्रम घेतले.

पुण्यतिथी कार्यक्रमाला देविदासजी, रमेशराव तांबट, ॲड. अजय इंगळे, समाजोन्नती समितीचे अध्यक्ष सुरेशराव नांदुरकर, सचिव डॉ. श्रीरामजी कोल्हे, गोरोबा काका पतसंस्थेचे अध्यक्ष भगवान जामकर, पंजाबराव काकडे, मोहनराव खोपे, डॉ. संजय साळविकर, पंडित जवळेकर, अरविंद चोंडके, राजेश धामणकर, डॉ. प्रभाकर मेहरे, दिनेश सरोदे, मधुकर काळकर, विजय शेळके, मुरलीधर चिल्लुरकर, राजेंद्र नांदुरकर, रमेश गावंडे, शंकर गावंडे यांचेसह कुंभार समाजातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***

# श्री गोरोबाकाका मंदिर प्राण प्रतिष्ठामुळे पिंपळनेर कुंभार वाड्यात नवचैतन्य संचारले!







**धुळे (दि. २ व ३ मे २०२६) :** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथील कुंभारवाड्यात संत शिरोमणी श्री गोरोबाकाका ह्यांच्या सुबक, लक्षवेधी मूर्तीची प्रचंड उत्साहात होमवहन, भजन कीर्तन, गांव सवाद्य मिरवणूक, विधी पूर्वक प्राणप्रतिष्ठा झाली. कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष सतिशदादा दरेकर, प्रदेश अध्यक्ष रमाकांतजी क्षिरसागर ह्यांच्यासह धुळे, पुणे, नंदुरबार, नाशिक, जळगांव जिल्ह्यातील राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पदाधिकारी सामाजिक नेते उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी पिंपळनेर येथे आमदार, नगराध्यक्ष, सर्वच पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी, पिंपळनेर, सामोडे गावातील सर्वच बाराबलुतेदार समाजाच्या प्रमुख मंडळींनी उपस्थिती लावली. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमास सासुरवाशीन मुली, जावई, व्याही-व्याहीन मंडळी मुक्कामी आले होते. कुंभारवाड्यातील सर्व नवीन आरसीसी घरांची रंगरंगोटी व पांझरा नदीकीनारी हवेशीर जागेत संत शिरोमणी श्री गोरोबा मंदिर यामुळे कुंभार वाड्याचे रूप पालटले.

दोन दिवसापासून काकांचे दर्शन घेणाऱ्या भाविकांची रिघ संध्याकाळ-रात्री पर्यंत सुरु होती. संध्याकाळी स्थानिक पिंपळनेर भाविक मंडळींनी गर्दी केली होती.

संत शिरोमणी श्री गोरोबाकाका मंदिर निर्माण मुळे पिंपळनेर येथील समाज बंधू भगिनी ह्यांचे १५ वर्षांपासूनचे स्वप्न पूर्ण झाल्याचे तेथील मंडळींचे चेहऱ्यावर दिसत होते. आम्हीही सहकुटुंब सहपरिवार काकांच्या चरणी माथा टेकून लग्न वाढदिवसानिमित्त काकांचे आशीर्वाद घेतले. आयोजन समिती पदाधीकाऱ्यांनी स्नेहवस्त्रे-श्रीफळ देऊन आमचा सन्मान केला. आम्ही ज्यांना काकांचे फोटो हवे, त्यांना फोटो आरती सप्रेम भेट दिली. त्यावेळी दरवर्षी काकांची पुण्यतिथी, पालखी मिरवणूक काढावी असे सौ. संगीता आणि इंजि. बबनराव जगदाळे व प्रा. बाळकृष्ण उत्तमराव मोरे सरांनी आयोजकांना सांगितले.

सर्व लहान थोर मंडळी येणाऱ्या भाविकांचे जय श्री गोरोबा म्हणून स्वागत करीत होती. प्रत्येक जण आपापल्या परीने कार्यक्रमासाठी योगदान देत होती. प्रसादी-अन्नदानाची जबाबदारी सेवानिवृत्त आदर्श शिक्षक, जेष्ठ मार्गदर्शक दादाजी खैरनार व त्यांच्या संजय सर व इंजि. पंकज ह्या दोघा सुपुत्रांनी घेतल्याचे सांगण्यात आले. स्थानिक नगरसेवकांनी मंदिरा समोरील कुंभारवाडा गल्लीतील रस्ता गल्ली काँक्रेटीकरण मध्ये घेणार असल्याचे सुतोवाच केले आहे.

सायंकाळी, आवर-सावर, साफसफाई प्रसंगी मंदिर ठिकाणी येथील प्राण प्रतिष्ठा उत्सव समितीतील बाळू गोटू सोनवणे, शेखर बागुल सर, शांतीलाल जगदाळे, उमेश खैरनार, दिलीप बागुल, सुनिल बोरसे, रामदास सोनवणे, योगेश सोनवणे, गणेश सोनवणे, भावेश सोनवणे, नरेश जगदाळे, लकी जगदाळे, दिलीप बागुल, नरेश जगदाळे, सौ.सुनंदा सोनवणे, सौ.लता सोनवणे, यशोधन बोरसे, रवी बोरसे, निलेश जगदाळे, राहुल बागुल, जगदीश बागुल, गोविंद जगदाळे, अक्षय जगदाळे, कु.मानसी जगदाळे, सुभाष जगदाळे, पवन जगदाळे, रोहीत सोनवणे आदि बाल-

युवक–युवती उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रचार प्रसार प्राणप्रतिष्ठा उत्सव आयोजन समितीने व्हाट्सअप पत्रिका, छापील पत्रिका व लाऊड स्पीकर रिक्षा द्वारे केला. अनिलभाई चित्ते छपाई माध्यमाद्वारे, सौ. संगीता आणि इंजि. बबनराव जगदाळे ह्यांनी कुंभार समाज माध्यमद्वारे चार ही राज्यात प्रचार प्रसार केला. युवा नेते, मुख्याध्यापक शेखर बागुल सरांनी महिन्याभरापासून राज्यस्तरावरील कुंभार समाज पदाधिकारी ह्यांच्याशी उत्तम प्रकारे सतत बोलसंपर्क ठेवला. धुळे जिल्हा नवनीयुक्त पदाधिकारी पिंपळनेरकरांच्या पाठीशी भक्कमपने उभे राहिले. पिंपळनेरकर जेष्ठ नेत्यांनी स्थानिक प्रशासन व राजकीय पदाधिकारी ह्यांच्याशी संपर्क ठेवल्यामुळे प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम मोठा धुम धडाक्यात पार पडला. श्री जय श्री गोरोबा!

**शब्दांकन – सौ. संगीता आणि इंजि. बबनराव जगदाळे, प्रदेश उपाध्यक्ष, कु.स.सा.सं. महाराष्ट्र राज्य**

***

## सौ. नंदा पंडित कुंभार यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शाळेस एक लाख रुपयाची देणगी प्रदान



**पुणे :** फुलगाव दि. १५, मार्च २०२६ एच यु धोत्रे फ्री स्कूल फुलगाव तालुका हवेली जिल्हा पुणे या शाळेचा १६७ वा वर्धापन दिन व विविध गुणदर्शन कार्यक्रम मा. संजयजी आनंदनाथ धोत्रे अध्यक्ष, नवनिर्वाचित जि.प. सदस्य पै. किरण साकोरे व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

हरी उद्धव धोत्रे यांनी १५, मार्च १९६० रोजी स्थापन केलेल्या ग्रामीण भागातील या शाळेने पाच पिढ्या ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. कै. शंकर हरी धोत्रे, कै. त्र्यंबक हरि धोत्रे, कै. आप्पासाहेब तथा आनंदनाथ त्र्यंबक धोत्रे, कै. मंदाकिनी धोत्रे बाई या सर्वांनी आपले बहुमूल्य योगदान या शाळेसाठी दिले. कै. आप्पासाहेब तथा आनंदनाथ त्र्यंबक धोत्रे यांना १९६९ साली राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. आप्पासाहेबांचे शिष्य कै. ना.वि. कुंभार गुरुजी यांनाही १९९२ साली राष्ट्रपती पदक पदक प्राप्त झाले होते.

ग्रामीण भागातील एक नावाजलेली शाळा म्हणून या शाळेची ख्याती आहे. अनेक नवनवीन शैक्षणिक प्रयोग या शाळेत झाले व होत आहेत. १६७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नंदा पंडित कुंभार व पंडित विठोबा कुंभार यांनी आपल्या माता पित्याच्या स्मरणार्थ शाळेस एक लाख रुपयाची देणगी दिली. याप्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी व नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य पैलवान किरण संपतराव साकोरे, उपाध्यक्ष नारायणराव खुळे, सरपंच राहुल वागस्कर, सरपंच कांताराम वागस्कर कुंभार सर यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

याप्रसंगी सरपंच मंदानानी साकोरे, आण्णा वागस्कर, आदर्श सरपंच सुनील वागस्कर, शारदाताई वागस्कर, श्रीमती सुशीला वागस्कर, आदिनाथ साकोरे, केकान सर, करपे सर, वामन खुळे, विठ्ठल खुळे, दत्तात्रय वागस्कर, गुलाब येवले, चंद्रकांत येवले, नवनाथ वागस्कर आदि मान्यवर, शाळेचे माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वाती पोटफोडे मॅडम यांनी केले, तर अश्विनी खंडे मॅडम यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ वागस्कर यांनी केले.

आदिनाथ साकोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान भोजन दिले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक चव्हाण सर, कांबळे सर, स्वाती पोटफोडे, अश्विनी खंडे, पुनम इंगळे, प्रणिता पाटील, ज्योती यनभर, दिपाली इंगळे, वैशाली खंडे मावशी परिश्रम घेतले.

***

## पुनर्वसन गावठाण गणेश नगर, कोळे येथे वृक्षारोपण व गाव विकास उपक्रम उत्साहात संपन्न



पुनर्वसन गावठाण गणेश नगर, कोळे (ता. कराड, जि. सातारा) येथे दि. ५ जुलै २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता गाव कमिटी व सर्व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमाची संकल्पना गावातील सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कुंभार यांनी दिनांक २१ जून २०२६ रोजी झालेल्या ग्रामसभेत मांडली.

या संकल्पनेला दीपक शिंदे यांच्यासह गाव कमिटीचे सदस्य सुभाष शिंदे, सुभाष शिंदे महाराज, धोंडीराम शेळके, मधुकर पवार, राम कुंभार, महादेव शिंदे, रविकांत शिंदे, दिनेश कुंभार, हनुमंत पवार, विजय गाडगे, प्रदीप, अधिक महाराज शिंदे तसेच प्रत्येक सामाजिक व गाव विकासाच्या कार्याला कायमस्वरूपी मोलाची साथ देणारे मा. जी. आर. शिंदे साहेब, शाखाप्रमुख, दि. सातारा सहकारी बँक लिमिटेड, मुंबई, शाखा कराड आणि उपस्थित सर्व ग्रामस्थांनी एकमुखाने पाठिंबा देत हा उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्याचा निर्णय घेतला.

विशेष म्हणजे ग्रामस्थांनी केवळ पाठिंबा व्यक्त न करता उदार अंतःकरणाने देणगी स्वरूपात ५००, १,०००, २,०००, ५,००० ते १०,००० पर्यंत आर्थिक सहकार्य करून या सामाजिक उपक्रमाला भक्कम आधार दिला. या सामाजिक कार्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.



शिस्त ही जीवनाचा पाया आहे.

## बुलढाण्यात संत गोरोबाकाकांचा पुण्यतिथी सोहळा






**बुलढाणा :** मातीकलेला मायेचा स्पर्श देऊन परब्रह्माचा साक्षात्कार घडविणारे 'संत शिरोमणी गोरोबाकाका' म्हणजे वारकरी संप्रदायातील श्रद्धेचा एक अभेद्य कलश. याच थोर संतांचा पुण्यतिथी सोहळा १५ एप्रिल रोजी बुलढाणा रोडवरील बोथा रोड येथील गोरोबा काका मंदिरात भक्तिमय वातावरणात पार पडला. भजन, पूजन आणि समाजहितैषी विचारांच्या मंथनाने हा परिसर अक्षरशः उजळून निघाला होता.

या सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले ते म्हणजे कुंभार समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर मिळालेला आश्वासक शब्द. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि शिवसेना (शिंदे गट) नगरपालिका गटनेते कुणाल गायकवाड यांनी समाजाच्या भावनांना साद घालत एक महत्त्वाचा संकल्प सोडला. गायकवाड म्हणाले, ज्या मातीने संतांना घडवलं, त्या मातीचे पांग फिटण्याची वेळ आता आली आहे. बुलढाणा शहरातील कुंभार समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोतच, पण समाजाची जी अस्मिता आहे, त्या 'संत गोरोबाकाका' यांचे भव्य स्मारक येत्या पुढच्या पुण्यतिथीपर्यंत बुलढाण्यात उभे राहिलेले दिसेल, ही माझी ग्वाही आहे. त्यांच्या या विधानाने समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश मंगळवेढे यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर बाराबलुतेदार महासंघाचे राज्य उपाध्यक्ष दामोदर काका बिडवे, शिवसेना तालुकाप्रमुख दांदडे, शिंदे साहेब, सरपंच सौ. अर्चना दिलीप आडवे, भिमसिंग शिरोळे, आत्माराम सोनुने, के. ओ. बावस्कर सर, नावकर सर, वच्छलाबाई सोनुने यांसह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गोरोबाकाकांच्या मूर्तीच्या विधिवत पूजनाने झाली. बाराबलुतेदार चळवळीचे मार्गदर्शक दामोदर काका बिडवे यांनी आपल्या मार्गदर्शनातून समाजाच्या एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच भीमसिंह शिरोळे, ॲड. मंगळवेढे आणि बावस्कर सर यांनीही संतांच्या विचारांची आजच्या काळात असलेली सुसंगतता आपल्या भाषणातून मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक के. ओ. बावस्कर यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी मंदिराचा इतिहास आणि समाजाच्या अपेक्षांचा आढावा घेतला. 'दैनिक बातमी जगत'चे संपादक कैलास राऊत यांनी आपल्या खास शैलीत कार्यक्रमाचे ओघवत्या भाषेत सूत्रसंचालन केले. तर आभार प्रदर्शनातून गणेश सोनुने यांनी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गणेश सोनुने, गजानन दसरकर यांच्यासह कुंभार समाज विकास संस्था व कुंभार समाजातील असंख्य तरुणांनी आणि समाजबांधवांनी अहोरात्र परिश्रम घेतले. विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन होणाऱ्या गोरोबाकाकांच्या स्मरणाने आणि एका नव्या विकास पर्वाच्या आश्वासनाने या सोहळ्याची सांगता झाली.

***

## मंचरमध्ये संत गोरोबाकाका पुण्यतिथी साजरी



**मंचर (ता.आंबेगाव)** येथे संत गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी गोरोबाकाका यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिषेक करून करण्यात आली. त्यानंतर ज्ञानेश्वरी पारायण वाचनाने वातावरण भक्तिमय झाले. दिवसभरात महाआरती पार पडली तसेच चौंडेश्वरी भजनी मंडळाने भजनरूपी सेवा सादर केली. स्वाध्याय परिवाराचे वतीने ताई आणि भाऊ यांची राम रक्षा स्तोत्र पठण केले.

प्रांजलताई सोमवंशी यांनी हरिकीर्तन सादर करून उपस्थितांना अध्यात्मिक संदेश दिला. मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा राजश्री

ताई गांजाळे, नगरसेविका वंदनाताई बाणखेले, रविकिरण आवळे, बबूशेठ मोरडे यांनी प्रांजलताई सोमवंशी यांचा सन्मान केला. या प्रसंगी कुंभार समाजातील जेष्ठ नेते आणि शेतमाल प्रक्रियेचे संचालक मनोहर सोमवंशी, सुरेश सोमवंशी, बंडू सोमवंशी, दिलीप सोमवंशी, दत्तात्रेय (दत्ता) नाना सोमवंशी, विवेक सोमवंशी, बाळासाहेब सोमवंशी, सुधीर सोमवंशी, गोविंद सोमवंशी, श्रीकांत सोमवंशी, गणेश सोमवंशी, शरद सोमवंशी, प्रकाश सोनवणे, सगुण जाधव, राजू निऱ्हाळी, रामदास जगदाळे, अनिल सोमवंशी, डॉ.भागुजी कांबळे, नंदकुमार जंगले, बाळू सोमवंशी, वसंत बनबेरू आदी मान्यवर उपस्थित होते. आभार मनोहर सोमवंशी आणि दत्ता सोमवंशी यांनी मानले.

***

## धुळे जिल्ह्यातील बोरकुंड कुंभारवाड्यातील जगतजननी माता मंदिराचा जीर्णोद्धार!

### भंडारा दिवशी श्री गोरोबाकाका फोटो वाटप!



इंजि. चि. नितीन बन्सीलाल सोनवणे (बोरकुंड- प्रोजेक्ट इंजिनियर-हैद्राबाद विमानतळ )

**धुळे :** जिल्ह्यातील एकसंध असा सर्वात मोठा कुंभारवाडा बोरकुंड येथे आहे. कुंभारवाड्यात जुन्या पिढीतील जगतजननी मातेचे पुरातन मंदिर होते. मंदिर-मूर्ती जीर्ण झाल्याने कुंभार समाज बंधू-भगिनी ह्यांनी एकत्र येत, गावातील दानशूरांच्या मदतीने मंदिराचे आर.सी.सी. बांधकाम करून जिर्णोद्धार केला. नवीन लाईट फिटिंग, रंगरंगोटी केली.

**होम हवन पूजा व भंडारा :** चैत्र पौर्णिमेच्या पावन मुहूर्तावर त्रिदिवसीय मूर्ती प्रतिष्ठापना, होमहवन व शेवटच्या दिवशी गांव जेवण भंडारा केला. भव्यदिव्य मंदिर, रंगरंगोटी, सजावट, कुंभार वाड्यातील घरांचे सार पोतार सह कुंभार वाड्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

**बाहेरगावी गेलेल्यांची उपस्थितीमुळे कुंभारवाडा गजबजला :** कार्यक्रमासाठी संदेश पाठवून सासरी गेलेल्या विवाहित मुली-जावई, बाहेर गेलेला व्यावसायिक, नोकरदार वर्ग, शिक्षणासाठी पुणे-मुंबई ला गेलेली मुले-मुली कुंभारवाड्यात एकवटल्याने कुंभारवाड्यात व गावात नवचैतन्य पसरले होते.

**गावकऱ्यांची साथ :**जीर्णोद्धार बांधकाम, पुजापाठ, गाव जेवणसाठी कुंभारवाड्यातील समाज बंधू भगिनी ह्यांना बोरकुंड-रतनपुरा येथील बारा बलुतेदार बहुजन समाजाने व गावागाडा कारभारी मंडळीने एकी दाखवत सर्वार्थाने साथ दिली. शेवटच्या दिवशी संपूर्ण बोरकुंड गावाला वरण-भात-बट्टी-शिरा-घुगरीचे गाव जेवण देण्यात आले.

**श्री गोरोबा फोटोवाटप साठी सांगावा :** सन २०१२ माहे एप्रिल मध्ये ह्या गावात श्री गोरोबाकाका फोटो व आरती वाटप घरोघरी केले होते. तब्बल १४ वर्षानंतर कुंभारवाड्यातील बाहेर नोकरी-रोजगार मुळे स्थलांतरित कुटुंब-घरे संख्या वाढलीत. जुने धाब्याची घरांची जागा नवीन आरसीसी घरांनी घेतली. आयोजकांनी, कुंभारवाड्यात नवीन घरांना व बाहेर नोकरीसाठी गेलेल्या मुला-मुलींना फोटो व आरतीपत्रक हवेत असे आयोजकांनी भटूभाऊ आधार सोनवणे ह्यांचे मार्फत सांगावा पाठवून कळविले.

**पुण्यतिथी व कुंभार समाज विवाहसंस्था मजबूत करणेचे आवाहन** अल्पावधी निरोप मिळाल्याबरोबर, आज मी जातीने बोरकुंड कुंभार वाड्यात उपस्थित राहिलो. जगतजननी माता मंदिरात समाज बंधू भगिनी, शिक्षण नोकरीसाठी बाहेरगांवी गेलेल्या युवक-युवती ह्यांना बोलवून आगामी १५ एप्रिलला संत शिरोमणी श्री गोरोबाकाका ह्यांची पुण्यतिथी पालखी मिरवणूक काढून साजरी करण्याचे आवाहन केले. कालगणना शककर्ता पैठणचे राजे शालीवाहन ह्यांची महती सांगितली. कुंभार समाजातील शाखा-पोटशाखा भेदाभेद टाळून कुंभार समाज विवाह संस्था मजबूत करण्यासह योग्य वयात मुला-मुलींचे विवाह नियोजन करण्याचे सांगितले.

फोटो व आरती पत्रक बोरकुंड येथील सर्वश्री सामाजिक नेते भटू आधार सोनवणे, शासकीय ठेकेदार तथा बागायतदार बन्सीलाल मांगू सोनवणे, वसंतराव जगन सोनवणे, रावसाहेब महादू सोनवणे, दिनेश अशोक सोनवणे, प्रशांत दिवाण सोनवणे, हेमंत अशोक सोनवणे, मुकुंदा अशोक सोनवणे, सुरेश नामदेव सोनवणे, कमलेश भटू सोनवणे, सौ. शोभाताई बन्सीलाल सोनवणे, सौ. प्रतिभा दिलीप सोनवणे, कु.दिव्या वाल्मिक सोनवणे, सौ.मिराबाई साहेबराव सोनवणे, सौ.सुनीता भटू सोनवणे, सौ.सुनंदा वसंत सोनवणे, सौ.लक्ष्मीबाई जगन सोनवणे, सौ.मंगलताई शांताराम सोनवणे, सौ.कमलताई महादू सोनवणे ह्यांच्यासह बाहेर गावाहून कार्यक्रमासाठी आलेल्या सौ. सुशिला मधुकर कुंभार (भातखंडे), सौ. मंगलबाई रघुनाथ महाले (नगर देवळा), सौ.सुनंदा राजेंद्र जगदाळे (मुकटी-नाशिक), सुभाष बुधाजी बोरसे व सौ. मंगल सुभाष बोरसे (कासोदा-फरकांडे), सौ.विमल बापू मोरे (धुळे), सौ.वंदना ज्ञानेश्वर मोरे (धुळे), ज्ञानेश्वर बापू मोरे (धुळे) आदि बंधू-भगिनी ह्यांना फोटो व आरती देण्यात आली. जय श्री गोरोबा!!

**निवेदक**

**सौ. संगिता आणि इंजि. बबनराव काशिराम जगदाळे**

***

# नवापूर येथे संत शिरोमणी श्री गोरोबाकांच्या ७०९ व्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न!





**नंदुरबार (चैत्र कृष्णपक्ष त्रयोदशी शके १९४८) :** नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर येथील कुंभारवाड्यात संत शिरोमणी श्री गोरोबाकाकांच्या ७०९ व्या पुण्यतिथी निमित्त पुष्पहार माल्यार्पण, आरती करून अभिवादन सह ''संत शिरोमणी श्री गोरोबाकाका की जय''चा जयघोष करण्यात आला. ह्यावेळी समाज बंधू भगिनी बाल गोपाल उपस्थित होते. तीर्थप्रसादीसह अल्पोहार चहापान करण्यात आले. लहान बाळमंडळीस चॉकलेट मिठाई देण्यात आली.

समाजाची शिल्लक रक्कम बँकेत एफडी ठेवून सुरक्षित कोषाध्यक्ष भास्करराव मोरे ह्यांनी समाजाची जुनी भांडी मोडतोड विक्रीतून प्राप्त रक्कम सह जमा शिल्लक रक्कम रु. २४०००/- (रु. चोवीस हजार फक्त) दादासाहेब रामराव पाटील बँकेत संदीप सोनवणे ह्यांच्या नांवे फिक्स डिपॉझिट ठेवण्यात आल्याची माहिती दिली.

समाजासाठी जागा व सभागृह कुंभार समाज सामाजिक संस्था प्रदेश उपाध्यक्ष इंजि. बबनराव जगदाळे ह्यांनी समाजाच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी नगर परिषद प्रशासनकडून जागा व सभागृह बांधकाम बाबत करीत असलेल्या प्रक्रियेची माहिती समाज बंधू भगिनी ह्यांना दिली. ह्यावेळी स्थानिक नवनिर्वाचित नगरसेवक शिरीषभाई प्रजापत ह्यांनी पुढील प्रक्रियेसाठी सल्ला मार्गदर्शन केले. ह्यासाठी लवकरच सर्वपक्षीय सन्माननीय लोकप्रतिनिधी पक्षप्रमुख, आमदार, नगराध्यक्ष-उपनगराध्यक्ष, नगरसेवक ह्यांना भेटून सर्व समाज बंधू भगिनी समवेत निवेदन देण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले. ह्यासाठी सेवानिवृत्त भूमिलेख अधीक्षक व जेष्ठ नेते आनंदा खंडेराव सोनवणे ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

नंदुरबारसह खान्देशचे इतिहास लेखन कोल्हापूरचे डॉ. प्रकाश कुंभार ह्यांच्या कुंभार समाज शोध बोध ग्रंथात, खान्देश व नंदुरबार जिल्ह्यातील आठ उपजातीसह सामाजिक चालीरीतीभाती, धार्मिक, भौगोलिक इतिहास मराठी, गुजराथी, इंग्लिश, अहिराणी, हिंदी अशा पाच भाषेत भाषेत लिहुन महत्वाचे फोटो सह डॉ. प्रकाशजी कुंभार ह्यांच्याकडे सुपूर्द केल्याचे लेखक व लेखिका सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे ह्यांनी सांगितले.

श्री गोरोबाकाका फोटो वाटप व पुण्यतिथी प्रचार नियोजन घर तेथे फोटो अभियान तहत सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे ह्यांनी गावोगावी, घरोघरी भक्तीफेरी करून फोटो व आरतीचे मोफत वाटप सन २०१२ मध्ये महाराष्ट्रसह-गुजरात-मध्यप्रदेश राज्यात केले होते. आताही ज्यांना हवे त्यांना फोटो व आरती ठिकठिकाणी दौरे करून मोफत वाटप केले. शहर, गांव, वस्ती, वाड्यावर पुण्यतिथी साजरी व्हावी म्हणून प्रत्यक्ष दौरे, भेटीगाठी करीत व समाज माध्यमातून प्रचार प्रसार केला. कार्यक्रम वर्गणी-देणगी घेण्यात आली नाही.

अभिवादन कार्यक्रम साठी पुजासाहित्य प्रसाद साठी तालुकाध्यक्ष पांडुरंग तानाजी सोनवणे ह्यांनी तर अल्पोहारसाठी इंजि. बबनराव जगदाळे ह्यांच्या आर्थिक सौजन्य मुळे कोणाकडूनही वर्गणी-देणगी घेण्यात-मागण्यात आली नाही.

बातमी लेखन सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे, नवापूर ''आपल्या सर्वांचे घर तेथे श्री गोरोबाकाका फोटो अभियान''

**फोटो- चि. दिपक ज्ञानेश्वर चव्हाण, अजय पांडुरंग सोनवणे**

***

# अण्णा शेठ कुंभार यांच्या षष्ठबदी पूर्ती निमित्त हार्दिक शुभेच्छा!



**धुळे :** ''वाढदिवस एका कर्तृत्वाचा.'' शिरुड, ता. जि. धुळे येथील समाजभूषण, समाजरत्न, उद्योगरत्न, उद्योगभूषण असे अनेक पुरस्कार, आपल्या कर्तृत्वानं प्राप्त झालेले, आणासेठ कुंभार यांचा ६० वा वाढदिवस. शिक्षण चौथी, पण आज ते आहेत, खान्देशातील प्रसिद्ध विट उद्योजक. ज्यांच्याकडे आज आहेत २५ आळे (वीट थापणारे), एक मॅनेजर, दोन सुपरवायझर, एक लेखनिक, आठ ट्रॅक्टर, आठ ड्रायव्हर, दोन कार, दोन मोठे ट्रक, एक हायवा ट्रक, एक जे.सी.बी. आणि तब्बल २०० कामगार. शिवाय बरंच काही.

पण हे कसं झालं?

वयाच्या विसाव्या वर्षी लग्न झालं. २२ व्या वर्षी वडील गेले, लहान



गेलेली वेळ आणि बोललेले शब्द कधीच परत येत नाहीत.

तीन भाऊ आणि आई, यांचे समवेत मडकी कामाची आणि गरीब संसाराची सुरुवात झाली. लवकरच वयाच्या ३० व्या वर्षी स्वतः विटा थापून एक लहानसा वीट व्यवसाय सुरू केला. जिद्द, मेहनत आणि मार्गदर्शन असेल तर यश निश्चित मिळते, या अनुभवातून आण्णासेठ आज वीट उद्योग क्षेत्रात उच्च आघाडीवर आहेत.

एक मुलगा फार्मा कंपनीत इंजिनिअर आहे, लहान मुलगा बांधकाम क्षेत्रात इंजिनिअर आणि बिल्डर आहे. मधला मुलगा आणि आण्णासेठ हा सर्व व्यवसाय सांभाळून समाजाला, गरजूंना अडले, नडलेल्यांना मदत ही करतात. रोजंदारी, मडके काम करणारी आई (वय ८० वर्ष), अजून हा कर्तृत्वाचा, आनंदाचा क्षण पाहत आहे. अण्णांचा एक भाऊ दमण येथे फार्मा कंपनीत चीफ मॅनेजर आहे. दोन लहान बंधू ही स्वतंत्र वीट व्यवसाय करत आहेत.

अशा या कष्टकरी, मेहनती, उद्योजकांन समाजाला एक संदेश दिला आहे की, शिक्षणामुळं कुटुंब, समाज सुधारतोच असं नाही तर शिकणं नसतानाही (not only but also) कर्तृत्व जिद्द आणि मेहनत घेण्याची तयारी असेल तर माणूस कुटुंब आणि समाज सुधारण्यासाठी नायक बनू शकतो. अशा या उद्योजकाचा छोटासा वाढदिवस साजरा करण्या निमित्त हा लेखणी प्रपंच. आण्णासेठ कुंभार यांना वाढदिवसाच्या निमित्त कोटी कोटी शुभेच्छा! श्री संत गोरोबा काका व परमेश्वर त्यांना निरामय आरोग्य द्यावं अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

– **उत्तमराव काळे सर** चाळीसगाव.

कुंभार समाज ब. विकास संस्था चाळीसगाव. जिल्हा जळगाव.

***

## सौ. मयुरी (पल्लवी) फार्मसी परीक्षेत विशेष प्राविण्यासह प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण...! हार्दिक अभिनंदन...!!



**सौ. संगिता, सौ. मयुरी व इंजि. बबनराव जगदाळे**

**नवापूर जि. नंदुरबार :** नुकत्याच लागलेल्या फार्मसी पदवीका परिक्षा निकालात, नामपूर ता. बागलाण येथील माहेर असलेल्या सौ.मयुरी उर्फ पल्लवी परेश जगदाळे ह्या पी.जी. कॉलेज ऑफ फार्मास्टिक्युल सायन्स आणि रिसर्च कॉलेज, चौपाले ता. जि. नंदुरबार मधुन ७६.५५% मार्क मिळवून प्रथम क्रमांकने उत्तीर्ण झाल्या आहेत. हे यश त्यांनी संसार सांभाळून, नवापूर येथून ये–जा करीत प्राप्त केले आहे. त्यांनी येथील पहिले वर्ष तसेच माहेरकडील सटाणा बागलाण येथील शालेय शिक्षण ते बीसीएस पदवी पर्यंत परीक्षेत गुणवत्तेत टॉपर म्हणून राहण्याची परंपरा कायम ठेवली आहे. तिचे कॉलेज प्रशासनाने यथोचित सत्कारसह अभिनंदन केले आहे.

सौ.मयुरी उर्फ पल्लवी ह्या बागलाण नामपूरचे सामाजिक नेते पांडुरंग आण्णा अहिरे ह्यांच्या नात, विवो मोबाईलचे एरिया मॅनेजर भूषण अहिरे ह्यांच्या भाची तसेच श्रीमती जयश्रीताई शामराव मोरे ह्यांच्या सुकन्या आहेत. बीसीएस पदवी नंतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी सौ.पल्लवी जगदाळे ह्यांना पती इंटेरियर एक्सपर्ट इंजि.परेश जगदाळे, सासू–सासरे सौ.संगीता आणि इंजि. बबनराव जगदाळे ह्यांनी सर्वार्थाने प्रोत्साहीत केले. फार्मासिस्ट सौ.मयुरी उर्फ पल्लवी परेश जगदाळे ह्यांचे हार्दिक अभिनंदन...!

सौ. मयुरी हिचे कुंभश्री मित्र परिवार व कुंभार समाजाकडून हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा.

***

## हातकणंगले येथे गुणगौरव समारंभ संपन्न



**कोल्हापूर :** हातकणंगले तालुका कुंभार समाजाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे सौ. अनुराधा कुंभार व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर बजरंग कुंभार उपस्थित होते तसेच सदर कार्यक्रमासाठी हातकणंगले तालुका कुंभार समाज बांधव भगिनी असंख्य संख्येने उपस्थित राहिले.

या कार्यक्रमासाठी पश्चिम महाराष्ट्र कुंभार समाजाचे अध्यक्ष लिंगायत कुंभार समाज संस्थेचे कार्याध्यक्ष सोमनाथ कुंभार, माजी अध्यक्ष किरण कुंभार, उपाध्यक्ष राहुल कुंभार, दत्ता कुंभार सर, अनिल कुंभार सर, प्रकाश कुंभार सर, लक्ष्मण कुंभार, शिरदवाड संतोष कुंभार या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे नियोजन अध्यक्ष सागर कुंभार, उपाध्यक्ष अर्जुन कुंभार तसेच सुशील कुंभार, आप्पासाहेब मामा, प्रदीप कुंभार, रमेश कुंभार हुपरी व सर्व संचालक सल्लागार कार्यकर्ते सर्वांचे खूप खूप अभिनंदन यशस्वी कार्यक्रम पार पाडला त्याबद्दल आपणा सर्वांचे कौतुक भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

आपल्या सर्व कार्यकर्त्यांच्या हातून समाज उपयोगी असेच अनेक उपक्रम कार्यरत व्हावे ही गणपती चरणी प्रार्थना.

## 'वय वंदना कार्ड' काढले का, सत्तरीपार ज्येष्ठांना १० लाखांचे आरोग्य कवच
## ज्येष्ठांना दिलासा : महागड्या शस्त्रक्रिया आणि गंभीर आजारांचाही योजनेमध्ये झाला समावेश

**यवतमाळ :** सामान्य आयुष्मान कार्डधारकांना वर्षाला ५ लाखांपर्यंत उपचार मोफत मिळतात. मात्र, ७० वर्षावरील ज्येष्ठांची वाढती आरोग्यविषयक गरज लक्षात घेता 'वय वंदना' या विशेष तरतुदीद्वारे १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. यामुळे ज्येष्ठांची आरोग्याची चिंताच मिटणार आहे. उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता सत्तरी पार केलेल्या प्रत्येक ज्येष्ठाला हक्काचे आरोग्य संरक्षण मिळणार आहे. यामुळे वय वंदना कार्ड काढून आरोग्याची चिंता मिटविता येणार आहे. आयुष्मान कार्ड आणि वय वंदन कार्ड या दोन विविध योजना सर्वसामान्यांसाठी खुल्या आहेत. आयुष्यमान कार्ड योजनेत पाच लाखांपर्यंत उपचार असणार आहेत. तर वय वंदन कार्डमध्ये ७० वर्षांवरील नागरिकांना दहा लाख रुपयांपर्यंतचा उपचार असणार आहे.

**महागड्या शस्त्रक्रिया, गंभीर आजाराचा समावेश :**

या कार्डच्या माध्यमातून हृदयाची शस्त्रक्रिया, बायपास, अँजिओप्लास्टी, गुडघे व सांधे प्रत्यारोपण, कर्करोग व किडनीचे आजार, मोतीबिंदू आणि मज्जासंस्थेशी निगडित गंभीर आजारांवर मोफत उपचार केले जातात. औषधी तपासणी आणि भरती होण्यापूर्वीचा खर्चही यात समाविष्ट आहे.

**येथेही काढता येते कार्ड :**

ज्यांना मोबाइलवर प्रक्रिया करणे जमत नाही, अशा ज्येष्ठांनी आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात किंवा सेतू केंद्रात जाऊन आधार कार्डच्या मदतीने हे कार्ड काढून घेता येते. सर्व ग्रामीण आणि जिल्हा रुग्णालयांतील आयुष्मान कक्षात ही सुविधा आहे.



**वय वंदना कार्ड योजनेत उत्पन्नाची अट नाही. या योजनेत ७० वर्षावरील लाभार्थ्यांना तातडीने आरोग्याच्या सुविधा मिळविता येतात. यामुळे आपतकालीन परिस्थितीत १० लाखांपर्यंत मोफत उपचार करता येतो.**

**– डॉ. सुरेन्द्र इरपनवार**, वरिष्ठ सहायक, जिल्हा समनवयक, यवतमाळ

**घरबसल्या असे बनवा 'वय वंदना कार्ड' :**

घरबसल्या आयुष्मान ॲप डाऊनलोड करा, बेनिफिशरी पर्याय निवडून मोबाइल नंबर टाकायचा आहे. यानंतर ओटीपी टाकून लॉगिन करावे लागणार आहे. यामध्ये ७० वर्षे वयाचा पर्याय निवडून आधार नंबर टाकायचा आहे. तो आधार नंबर सबमिट करावा लागणार आहे. यानंतर स्वताचा लाइव्ह फोटो काढून ई–केवायसी पूर्ण करता येणार आहे. यानंतर काही वेळातच वय वंदना कार्ड तयार होणार आहे. हे कार्ड रुग्णालयातील आरोग्य सेवकाकडूनही काढता येणार आहे.

**पूर्णपणे कॅशलेस व पेपरलेस प्रक्रिया :**

रुग्णालयात भरती होताना रुग्णाला एकही रुपया द्यावा लागत नाही. सर्व प्रक्रिया ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून पार पडते. केवळ वय वंदना कार्ड आणि आधारकार्ड दाखविल्यानंतर रुग्णालयाकडून उपचाराची प्रक्रिया सुरू होते.

***

## रुग्णाचा अर्ज रुग्णालयच भरणार; साहाय्यता निधीला ८ तासांत मंजुरी

**ठाणे :** गरजू रुग्णांसाठी मोठा दिलासा देणाऱ्या मुख्यमंत्री सहायता निधीची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल झाली आहे. रुग्णाऐवजी रुग्णालयातूनच अर्ज सादर होणार असून ३ ते ८ तासांत निधीला मंजुरी मिळणार आहे. त्यामुळे रुग्णांची धावपळ कमी होऊन पारदर्शकता वाढणार आहे. नवीन डिजिटल प्रक्रियेमुळे रुग्णांची कार्यालयीन धावपळ थांबणार आहे. एजंटांच्या हस्तक्षेपावरही मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे. गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक मदत देणारी ही राज्य शासनाची महत्त्वाची योजना आहे. ज्यांना इतर योजनांतून मदत मिळत नाही, अशा गरजू रुग्णांसाठी हा निधी 'जीवनदायिनी' ठरतो. हृदय, कर्करोग, किडनी, अपघात, डायलिसिस अशा सुमारे २० गंभीर आजारांसाठी मदत दिली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, पात्र रुग्णांना उपचारांसाठी मदत उपयोगी ठरते.

**अर्जानंतर ८ तासांत मंजुरी :** रुग्णालयाकडून ऑनलाइन अर्ज सादर झाल्यानंतर तातडीने तपासणी करून ३ ते ८ तासांत निर्णय घेतला जाईल. त्यामुळे वेळेत उपचार होणार आहे.

**३०% रक्कम तत्काळ :** मंजुरीनंतर निधीपैकी ३० टक्के रक्कम तत्काळ रुग्णालयाला दिली जाईल. उर्वरित रक्कम पुढील प्रक्रियेनुसार उपलब्ध होईल.

**आता अशी होईल ऑनलाइन प्रक्रिया :** रुग्णाऐवजी थेट रुग्णालयच ऑनलाइन पोर्टलवर अर्ज सादर करणार आहे. पेपरलेस प्रणालीमुळे कागदपत्रांची पडताळणी अधिक जलद आणि सोपी होणार आहे.

**नातेवाइकांवरील ताण कमी :** अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे व पाठपुराव्याची जबाबदारी रुग्णालयांवर असेल. यामुळे रुग्ण, नातेवाईकांवरील ताण आता कमी होणार आहे.

**२१.७४ कोटींची मदत :** जिल्ह्यात २०२५–२६ या कालावधीत २,५१४ रुग्णांना सुमारे २१.७४ कोटींची मदत दिली. डिजिटल व पारदर्शक प्रक्रियेमुळे अधिक गरजू रुग्णांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळत आहे.

**याप्रमाणे अन्यही अर्थिक वर्षांत ठाणे जिल्ह्यातील रुग्णांनी या मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ मोठ्या प्रमाणात घेतल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.**

***

# गावातील किंवा भावकीतील राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी आनंदाने एकत्र राहणे.

माझ्या प्रिय बंधु भगिनींनो हात जोडुन विनंती आहे की, सदर माहिती वाचायची इच्छा नसली तरी कृपया नक्कीच अवश्य वाचा आणि आवडले/मनाला पटले तर गांवातले/भावकीतले/मित्रातले राजकारण समजून दुरावा सोडून शांतता सांभाळून आनंदात रहा.

१) शरद पवार – प्रा. एन.डी. पाटील.

२) शंकरराव मोहिते – पाटील – बाळासाहेब देसाई.

३) दिलीपराव देशमुख (विलासराव देशमुखांचे बंधू) माजी राज्यमंत्री अजित घोरपडे हे परस्परांचे साडू–बंधू.

४) अजित पवार यांची पत्नी – सुनेत्रा पवार या खासदार पद्मसिंह पाटील यांची धाकटी बहीण आहे.

५) जयंत पाटील यांची बहीण – माजी आमदार अहमदनगर जिल्ह्यातील प्रसाद तनपुरे यांची पत्नी आहे (मेहुणे).

६) जयंत पाटील–शिराळ्याचे सत्यजीत देशमुख (परस्परांचे साडू–बंधू)

७) आमदार विलासराव शिंदे यांची बहीण – शिवाजीराव देशमुख (सभापती) यांची पत्नी आहे.

८) आमदार शिवाजीराव नाईक (शिराळा) यांची पत्नी – सांगलीचे मंत्री मदन पाटील यांच्या मातोश्री ह्या सख्ख्या बहिणी आहेत.

९) प्रमोद महाजन + गोपीनाथ मुंडे = मेहुणे.
(प्रमोद महाजनांची बहिण गोपीनाथ मुंडेंच्या सौ. आहे.)
शरद पवार + बाळासाहेब ठाकरे = व्याही.
(शरद पवारांची कन्या सुप्रिया सुळे ही बाळासाहेब ठाकरेंच्या सख्ख्या बहिणीची सूनबाई, भाचा सदानंद सुळे यांच्या सौभाग्यवती आहे.)

१०) सचिन पायलट + फारूक अब्दुल्ला = जावई. (केंद्रीय मंत्री सचिन पायलट जम्मू काश्मिरचे फारूक अब्दुल्ला यांचे जावई).

११) कलमाडी + निंबाळकर राजघराणे = व्याही. (निंबाळकर घराण्याची मुलगी सुरेश कलमाडी यांच्या घराच्या सुनबाई).

१२) शरद पवार + सुशीलकुमार शिंदे = साडू–बंधू
(शरद पवारांच्या सौ. प्रतिभा पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांच्या सौ. उज्ज्वला शिंदे ह्या सख्या बहिणी).

१३) स्व. विलासराव देशमुख + डिसुझा + भागनानी + हुसैन = व्याही. (विलासराव देशमुख यांच्या तीनही सुनबाई ३ वेगवेगळ्या धर्माच्या आहेत. जेनेलिया डिसुझा क्रिस्तिअन, एक सुनबाई मुस्लिम कम हिंदू आणि एक सुनबाई हिंदू मारवाडी फिल्म डिरेक्टर वासू भागनानी यांची मुलगी). मोहिते–पाटील हे घराणे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठे घराणे समजले जाते.

१४) विजयसिंह मोहिते–पाटलांची थोरली बहीण बाळासाहेब देसाईंच्या घरात दिल्याने शिवसेनेचे पाटणचे माजी आमदार शंभूराजे देसाई हे विजयसिंह यांचे भाचे आहेत.

१५) विजयसिंह यांच्या मामांची मुलगी ही शंभूराजेंची पत्नी, तर मोहित्यांच्या मामांची दुसरी मुलगी ही विलासकाका पाटील–उंडाळकर यांची सून.

१६) विलासकाका पाटील हे फलटणचे माजी आमदार चिमणराव कदम यांचे सासरे. (चिमणराव कदमांची मुलगी ही संभाजीराव काकडे यांची सून).

१७) पूर्वी पुणे जिल्ह्यात शरद पवार आणि संभाजीराव हे परस्परांचे मोठे विरोधक होते. त्या काकडेंचे भाऊ बाबालाल यांचीही मुलगी बाळासाहेब देसाई यांच्या घरात दिल्याने काकडे मोहिते यांचे नाते.

१८) शिवाय, विजयसिंहाची आत्या ती बाबालाल काकडे यांची पत्नी. इतकेच नव्हे तर विजयसिंहाची एक बहीण ॲड. विराज काकडे यांची पत्नी आहे.

१९) कोल्हापूरचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते दिग्विजय खानविलकर यांच्या मुलाला विजयसिंहांच्या भावाची मुलगी दिल्याने दोघेही सोयरे झाले.

२०) दिग्विजय खानविलकरांची मुलगी कोल्हापूरच्या शाहूराजेंच्या घरात दिली असून काँग्रेसचे माजी आमदार मालोजीराव यांची पत्नी.

२१) राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रामराजे नाईक–निंबाळकर यांची पत्नी आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची पत्नी या दोघी चुलत भगिनी.

२२) शरद पवार यांची एक मेहुणी ना.म. जोशींच्या घरात दिली असून त्याच घरात रामराजेंची बहीणही दिली आहे.

२३) पृथ्वीराज चव्हाणांची मावशी ही दादाराजे खर्डेकर यांची पत्नी. दादाराजे खर्डेकर यांची बहीण ही दिवंगत माजी मंत्री अभयसिंहराजे भोसले यांची पत्नी.

२४) दादाराजेंचे भाऊ बंटीराजे यांची मुलगी ही सातारचे शिवेंद्रराजे यांची पत्नी.

२५) कोल्हापूरचे सदाशिवराव मंडलिक याची बहीण चंदगडचे आमदार नरसिंग गुरुनाथ पाटील यांची पत्नी असल्याने दोघेही मेहुणे लागतात.

२६) कृषीमंत्री बाळासाहेब थोरात आणि काँग्रेसचे आमदार राजीव राजळे हे मामा–भाचे. (राजळे यांची आई ती थोरातांची बहीण).

२७) राजीव राजळे यांची बहीण ही यशवंतराव गडाखांची सून आणि नेवासे येथील राष्ट्रवादीचे शंकरराव गडाख यांची पत्नी.

२८) नाशिकचे राष्ट्रवादीचे नेते स्व. डॉ. वसंत पवार हे अहमदनगर जिल्ह्यातील माजी मंत्री शंकरराव कोल्हे यांचे जावई.

२९) अहमदनगर जिल्ह्यात आबासाहेब निंबाळकर हे माजी मंत्री काँग्रेसचे नेते होते. त्याची नात ही नारायण राणे पुत्र माजी खासदार निलेश राणे यांची पत्नी.

३०) कर्जत जामखेडचे काँग्रेसचे बापूसाहेब देशमुख व उद्योगमंत्री नारायण राणे हे दोघे व्याही.

३१) जालन्याचे अंकुशराव टोपे त्यांचे चिरंजीव व विद्यमान मंत्री राजेश टोपे आणि कर्जतचे निंबाळकर यांचे नातेसंबध असल्याने टोपे आणि राणे हेही सोयरे धायरे.

३०) भोकरदन भाजपा चे खा.रावसाहेब दानवे यांची मुलगी शिवसेना आ. हर्षवर्धन जाधव यांना दिलेली आहे.

हे सगळे एका ताटात जेवतात म्हणून कोणाकडेही सत्ता गेली तरी ती सत्ताधारी सारे एकच!

वरिल नातेसंबंध समजून घेऊन जनतेने आपला भाऊ/नातेवाईक/मित्र पहावा राजकारणासाठी एकामेकांवर लाठ्या काठ्या घेऊन डोकी फोडू नयेत. यांच्यासाठी आपापसात भांडू नये. हा संदेश संपूर्ण महाराष्ट्र व भारतभर फिरला पाहिजे की, जे माझे समाज बांधव आपल्या नेत्यासाठी भावाभावात, मित्रात, नात्यात वैमनस्य निर्माण करून नाती तोडतात व एकमेकांची डोकी फोडतात.

तेंव्हा राजकारण हे काय व कसं आहे हे आपणच ओळखावे.

जो हे शिकला... तोच टिकला.

***

# अकरावी सायन्सला विषय निवडीचे महत्त्व




अकरावी शास्त्र शाखेत पर्यावरण शिक्षण आणि जलसुरक्षा; तसेच आरोग्य आणि शारीरिक शिक्षण हे दोन विषय बंधनकारक आहेत. संशोधन, तंत्रज्ञान, वैद्यकीय क्षेत्र आणि नवनवीन शोधांमध्ये रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखा आदर्श आहे. अनिवार्य भाषा इंग्रजी आहे, त्याबरोबर मराठी / हिंदी / संस्कृत / जर्मन / फ्रेंच / जपानी यापैकी एक भाषा आणि बाकीचे कोणतेही चार विषय निवडता येतात.

अकरावी शास्त्र शाखेत संगणकशास्त्र (कम्प्युटर सायन्स– सीएस) व इलेक्ट्रॉनिक्स (इलेक्ट्रॉनिक्स) हे विषय 'बायफोकल व्होकेशनल' अभ्यासक्रमांतर्गत येतात. या पैकी एक विषय घेतला, तर इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित असे फक्त पाच विषय असतात. पीसीबी, पीसीएम, पीसीएमबी (फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स, बायोलॉजी) असे तीन ग्रुप आहेत. पीसीबी ग्रुप घेतला, तर मेडिकलला जाता येते व इंजिनीअरिंगला जाता येत नाही. पीसीएम हा ग्रुप घेतला, तर इंजिनीअरिंगला जाता येते व मेडिकलला जाता येत नाही. पीसीएमबी ग्रुप घेतला, तर मात्र इंजिनीअरिंग व मेडिकलला जाता येते.

भौतिकशास्त्रामुळे ऊर्जा, पदार्थ, गती आणि विश्वाच्या नियमांचा अभ्यास करता येतो. रसायनशास्त्रामुळे वेगवेगळ्या मूलद्रव्यांची रचना, रासायनिक अभिक्रिया आणि संयुगे यांचा अभ्यास करता येतो. जीवशास्त्रामुळे सजीव, वनस्पती, प्राणी आणि मानवी शरीराची रचना याविषयी सखोल माहिती मिळते. गणितामुळे तार्किक विचार आणि कठीण आकडेमोड करण्याची क्षमता विकसित करण्यास मदत होते. कम्प्युटर सायन्स किंवा इलेक्ट्रॉनिक्ससारखे तांत्रिक विषय घेतल्यास काही भाषा विषय वगळता येतात.

**तांत्रिक आणि वैद्यकीय करिअर :**

इंजिनीअरिंग (जीईई) किंवा मेडिकल (एनईईटी–नीट) क्षेत्रात जाण्यासाठी विज्ञान शाखा अनिवार्य आहे.

**संशोधनाच्या संधी :** इस्रो, डीआरडीओ किंवा इतर वैज्ञानिक संशोधन संस्थांमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम करण्याची संधी मिळते. अकरावी शास्त्र शाखेत जीवशास्त्र विषयांचे वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व असे आहे, की अकरावी शास्त्र शाखेत जीवशास्त्र हा अत्यंत महत्त्वाचा आणि स्कोअरिंग विषय मानला जातो.

वैद्यकीय क्षेत्रापासून ते निसर्गाच्या अभ्यासापर्यंत या विषयाचे करोनाकाळात अनन्यसाधारण महत्त्व कळले आहे.

**वैद्यकीय क्षेत्राचा पाया :** एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस आणि नर्सिंग यांसारख्या वैद्यकीय क्षेत्रातील करिअरसाठी अकरावीचा जीवशास्त्र विषय हा मुख्य पाया आहे.



**अकरावी शास्त्र शाखेची निवड केल्यानंतर विषयांच्या निवडीबाबत अनेकांना संभ्रम असतो. मात्र, आपला कला पाहून विषयांची निवड केल्यास भविष्यातील करिअरसाठी ते फायदेशीर ठरते.**
**– डॉ. डी.डी. कुंभार**

**प्रवेश परीक्षांसाठी आवश्यक :** नीट (नॅशनल एलिजिबिलिटी कम एंटरन्स टेस्ट) या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत पन्नास टक्के गुण एकट्या जीवशास्त्र विषयाला असतात; त्यामुळे अकरावीपासूनच याची तयारी करणे गरजेचे ठरते.

**मानवी शरीररचना आणि प्रक्रियांची समज :** या विषयात मानवी पचनसंस्था, श्वसनसंस्था, रक्ताभिसरण संस्था आणि उत्सर्जन संस्था यांसारख्या महत्त्वाच्या जीवनप्रक्रियांचा सखोल अभ्यास मिळतो.

**आरोग्याची समज :** शरीर कसे काम करते आणि आजार कसे होतात, याचे शास्त्रीय ज्ञान मिळाल्यामुळे आरोग्याविषयी जागरूकता वाढते.

**कृषी आणि संबंधित क्षेत्रांतील संधी :** ज्या विद्यार्थ्यांना मानवी वैद्यकीय क्षेत्रात जायचे नाही; त्यांच्यासाठी कृषी शास्त्र (बीएससी ॲग्रीकल्चर), फार्मसी (बीफार्म) आणि जैवतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी) हे मार्ग खुले होतात.

**वनस्पतींचे महत्त्व :** वनस्पतींचे वर्गीकरण आणि त्यांच्यातील अंतर्गत रचना समजून घेतल्याने शेती पूरक व्यवसायांमध्ये मोठी मदत होते.

**पर्यावरण आणि जैवविविधतेचे आकलन :** पृथ्वीवरील सजीव, त्यांचे वर्गीकरण, प्राण्यांचे जग आणि पर्यावरण संस्था यांचा अभ्यास या विषयात केला जातो.

**संरक्षणाची गरज :** जागतिक तापमानवाढ आणि प्रदूषण यांसारख्या समस्यांवर जीवशास्त्राच्या अभ्यासातून वैज्ञानिक दृष्टिकोन मिळतो.

**गुण मिळवण्यासाठी सोपा आणि स्कोअरिंग विषय :**

गणित किंवा भौतिकशास्त्रासारख्या क्लिष्ट संकल्पना किंवा मोठी समीकरणे यामध्ये नसतात. संकल्पना स्पष्ट असल्यास यात पैकीच्या पैकी गुण मिळवणे सोपे जाते.

**आकृत्यांचे महत्त्व :** चांगल्या आणि अचूक आकृत्या काढल्यास परीक्षेत गुण हमखास वाढतात.

**नवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास :** अकरावीमध्ये 'सेल बायोलॉजी' आणि 'बायोमॉलिक्युल्स'चा पाया रचला जातो. हाच पाया पुढे जाऊन जेनेटिक्स, मायक्रोबायोलॉजी आणि मॉलिक्युलर बायोलॉजी या आधुनिक क्षेत्रांमध्ये संशोधनासाठी उपयोगी पडतो.

(लेखक फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य आहेत.)

***



आयुष्य हे पुस्तकासारखे असते, प्रत्येक पान आपल्याला काहीतरी नवीन शिकवते.

# चरित्रे, आत्मचरित्रे प्रकाशन योजना



श्री. अनिल शिंदे



सौ. उषा शिंदे

राजकीय, साहित्य, सामाजिक, औद्योगिक, व्यापार, व्यावसायिक इ.
अथवा अन्य क्षेत्रात स्वत:चे नाव करणाऱ्या कुंभार समाजातील
यशस्वी मान्यवरांची चरित्रे, आत्मचरित्रे प्रकाशित करण्याची योजना

*मुलाखत, शब्दांकन, लेखन, संपादन, डी.टी.पी., मुद्रितशोधन, बांधणी*
*सर्व व्यावसायिक जबाबदारी उषा-अनिल प्रकाशन (पुणे) घेणार*

**ही प्रेरणादायी आत्मचरित्रे प्रकाशित**


































**पुढच्या पिढ्यांना आपल्या ज्ञान, अनुभवाचा वारसा देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाने संपर्क साधावा.**

**उषा-अनिल प्रकाशन**

संत गोरा कुंभार सोसायटी, प्लॉट क्र. १०९, साळुंके रस्ता,सहकारनगर क्र. २,
पर्वती, पुणे ४११ ००९. मो. क्र. ९८५०६६७४१६

रजि. नं. ४१३ कार्यक्षेत्र : कोल्हापूर जिल्हा स्थापना : २६/०५/१९४३

# कुमावत को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. कोल्हापूर

२३०, डी. गंगावेश रोड, कोल्हापूर, फोन नं. ०२३१-२५४१८४६



श्री. विलास सदाशिव कुंभार
(अध्यक्ष)



श्री. शहाजी नानू कुंभार
(उपाध्यक्ष)



श्री. महेश मोहन कुंभार
(व्यवस्थापक)

## ३१/०३/२०२४ अखेर संस्थेची सांपत्तिक स्थिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | वसुल भाग भांडवल | : १,१६,९६,९१५ | २) | राखीव व इतर निधी | : २,६४,४५,७५३ |
| ३) | ठेवी | : १९,४३,६१,९३४ | ४) | कर्जे | : १०,१६,५८,०२० |
| ५) | व्यवहार (उलाढाल) | : ४९,४०,३१,९८७ | ६) | खेळते भांडवल | : २४,५६,३६,०८५ |
| ७) | गुंतवणूक | : १३,४७,२०,३०७ | ८) | डिव्हीडंड | : १५% |
| ९) | निव्वळ नफा | : ३१,८७,८५४ | | | |

ऑडिट वर्ग 'अ'

### संचालक मंडळ

श्री. मारुतराव श्रीपतराव कातवरे
श्री. सुभाष सखाराम कुंभार
श्री. दिपराज मनोहर माजगांवकर (कुंभार)
श्री. सतिश सदाशिव कुंभार
श्री. नितीन श्रीकृष्ण ब्रम्हपूरे
श्री. जनार्दन आबाजी कांबळे
श्रीमती मिनाक्षी बाजीराव कुंभार
श्री. मारुती शंकर कुंभार
श्री. सागर आनंदा वडणगेकर
सौ. शोभा सुनिल माजगांवकर

# R. S. ENTERPRISES

Reaching out to Serve....

## Medical Equipment's & Devices

Following are the Companies & Products we mainly deal with,

- **Drager India Pvt. Ltd. -** ICU Ventilators, Transport Ventilators, Patient Monitors, Gas Lines, Anesthesia Work Stations, Baby Warmers & Many More
- **BBraun Medical India Pvt. Ltd. -** Aesculap (Neuro, Cardiac & General Surgery Instruments), All Transplant Instruments, Dialysis Machines, Syringe & Infusion Pump & Many More
- **Philips India Pvt. Ltd. -** Defibrillators, Monitors, BiPAP Machines & Many More
- **Godrej & Boyce Mfg. Co. Ltd. -** Hospital Furniture, ICU & Ward Beds
- **Johnson & Johnson Pvt. Ltd. -** Sutures, Plasma Sterilizers (ASP), Cautery's, Harmonic Machines, Surgery Equipment's
- **Remi India & Spire Automation -** ALL Lab related equipment's
- **BD/BARD India Pvt. Ltd. -** Onco Ports, Dialysis Permanent Catheters

**R. S. ENTERPRISES**

Off. No. 10, First Floor, Off. No. 9, Ground Floor, Ruturang Society,
Aranyeshwar Mandir Road, Parvati, Pune - 411009
**Mob.: 9371026632 / 9011093989**



SANTOSH RAJE

१९४७ पासुनचे पुण्यातील पहिले

# पाषाणकर गॅरेज

## PROFESSIONAL SPRAY AND BAKE BOOTH

**सर्व प्रकारच्या कार स्प्रे पेंटींग स्पेशालिस्ट**

ॲक्सिडेंट जॉब व इन्शुरन्स क्लेमची कामे खात्रीशीर व योग्य भावात करून मिळतील.

२५१/१, सदाशिव पेठ, भावे स्कुल समोर, पुणे - ३०.
फोन : ०२०-२४४७५७८८, ४०५८५५५.

✻ प्रोप्रायटर ✻

दत्तात्रय नानासाहेब पाषाणकर
मो. ९८२२०००५०३

सुरज सुरेश पाषाणकर
मो. ९८९००५९९९५

कै. बाळासाहेब उर्फ सुरेश नानासाहेब पाषाणकर

**खास वैशिष्ट : पेन्टींग रुम**





प्रेरणास्थान



बी. एम. धुमाळ



श्री. गणेश धुमाळ

# जय गणेश मेडिकल

अँड जनरल स्टोअर्स केमिस्ट अँड ड्रगिस्ट

## साई मेडिकल

**गंगाई चेंबर्स, पहिला मजला, मेन रोड, आकुर्डी, पुणे ४११ ०३९.**

## प्रोप्रा. गणेश बबनराव धुमाळ

कुंटे कॉम्प्लेक्स, मारुती मंदिराजवळ, मेनरोड, आकुर्डी, पुणे-३५. मो. 9011561919



# गणेश आर्टस्

**आमचेकडे सर्वांग सुंदर गणेशमुर्ती होलसेल भावात मिळतील**

# श्रीराम मंगल कार्यालय

**मु.पो. काशीळ, पुणे-बेंगलोर हायवे, ता. जि. सातारा.**



**जयवंत रामचंद्र कुंभार**

संचालक

मो. ९८२२०५६३२४

अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना सातारा



**वसंत रामचंद्र कुंभार**

मा. पंचायत समिती सदस्य सातारा

मो. ९८५०४१८२२५

TCAC



Adv. Abhay Raje
B.E. (Prod), MIE, MBA, LL.M.
Director

**Tubular Coupling And Auto-Comp Pvt. Ltd.**

Manufacturers of API Coupling & Auto Components

G-27, MIDC, Ahmednagar 414 111
Cell : + 91 9923284242 e-mail : abhaykraje@gmail.com
website : www.tcac.co.in

# ॲड. अभय राजे

सर्व प्रकारचा कायदेविषयक सल्ला

**८३३, बागडपट्टी, नेता सुभाष रोड, अहमदनगर ४१४ ००१**

फोन (०२४१) २३४५४०१ मोबा. ९९२३२८४२४२

# सर्वांगसुंदर गणेशमुर्तीचे उत्पादक



महेश (राजु) कुंभार
९४२२३५१४५८





जयश्री महेश कुंभार
९६३७८५४२४२

## चिंतामणी आर्ट

## जय आर्टस्

**आमच्याकडे सर्वांगसुंदर गणेशमुर्ती होलसेल भावात मिळतील**

दत्तवाडी, उरळी कांचन, पुणे ४१२ २०२

# त्रिस्कंध पंचकर्म चिकित्सालय

**सर्व प्रकारच्या रोगांवर आयुर्वेदिक उपचार**



वैद्य निलेश भागवत शिर्के
बी.ए.एम.एस.
7391955911



वैद्य सौ. गौरी निलेश शिर्के
बी.ए.एम.एस.

**चिंचवड** : फ्लॅट नं. १, बिल्डिंग नं. बी १०, राजपार्क, पोतदार शाळेजवळ, केशवनगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३.
सकाळी १० ते सायंकाळी ८

**खोपोली** : माहेर हॉस्पिटल, मुख्य बाजारपेठ, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड
**प्रत्येक महिन्याच्या १ व १५ तारखेस**
**सकाळी ९ ते सायं. ४**

Email : drnileshshirke@gmail.com

---

श्री



**Mob.:**
**9224805428**
**9702448280**

## संभाजी पा. कुंभार

## देवनार मेडिकल आणि जनरल स्टोअर्स
**DEONAR MEDICAL & GENERAL STORES**
**Chemist & Drugisst**

**"Human Care & Health Care"**

Shop No. 1 & 2, Aastha II, Opp. Lakme Co.,
Govandi Station Road, Govandi,
Mumbai - 400 088.
Tel. : 022 - 25550020
Email: mrunalipharmacydeo@gmail.com

***Free Home Delivery***

---

# श्री कुंभार एंटरप्रायजेस

**इले. व मेक. वजन काटे, मापे, मिल्क ॲनालायझर, फॅट मशिन इ. चे अधिकृत विक्रेते**



**अशोक धोंडीराम कुंभार**
Mo. : 9890368125

SKE
Shree Kumbhar Enterprises





**MILK ANALYSER**

**शासनमान्य**
वजन काटावाले

विक्री पश्चात
सेवेची हमी









**संचालक**



**सचिन अ. कुंभार**
Mo. + 91 9890169492
9970049494
Shop. 02162-233492

**Corp. Office**
Plot No. 49, Near Aditya Nagari,
Bombay Restaurant Chowk,
Satara 415 003
shreekumbharenterprises@gmail.com
www.shreekumbharenterprise.com

**१५५, कुंभारवाडा, केसरकर पेठ, नगरपालिकेजवळ, सातारा.**

---



# श्री आर्टस्

गणेश मुर्ती व गौरीचे

✻ होलसेल विक्रेते ✻

मु. पो. दत्तवाडी, ऊरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे - ४११ २०२



**पंकज ह. कुंभार**
मो. ९९२३१९४३९४



**चरण ह. कुंभार**
मो. ९९२३०६२७०६



**वर्तमानकाळ हा भविष्यकाळ विकत घेत असतो.**

## RAJE SURGICALS



**Sanjay Y. Raje**
D.P.O.E. (Mumbai)
Prosthetist & Orthotist
9822969535



**Anjali S. Raje**
B.Sc.DMLT
9922580296

- Prostheses (Artificial Limb)
- Orthoses
- Rehabilitation Aid & Equipments
- Orthopaedic Appliances
- Surgical & Scientific Instruments
- Hosptial Equipments & Furniture

**POLIO CLINIC & REHAB CENTRE**

'Manas', Bhosale Nagar, New Radhika Road, Near Hotel Rajtara, Satara.
Ph.: (02162) 236629
● Email Id : rajesurgicals@gmail.com ● sanjayragepcrc@gmail.com

---



## पंकज आर्टस्

आमच्याकडे प्लॉस्टर व शाडू मातीच्या सुबक व रेखीव गणपती मुर्ती होलसेल भावात मिळतील.



**श्री. बाळासाहेब धोंडिबा कुंभार**
मो. ९४२३२१२१८४



**पंकज बाळासाहेब कुंभार**
G.D. Arts



**श्री. विठ्ठल धोंडिबा कुंभार**
मो. ९६७३१३२३६५

मु. भवरापुर, पो. उरळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०२.

---

आमचे प्रेरणास्थान



स्व. सौ. अनुसया



स्व. निवृत्ती शिर्के



प्रोप्रा. सुरेश निवृत्ती शिर्के
सिव्हिल इंजिनिअर

## शिर्के कंस्ट्रक्शन

सर्व प्रकारचे बंगले व स्किमची कामे योग्य दरात करुन मिळतील.

मु. पो. नांदलापूर, ता. कराड, जि. सातारा.
फोन : (नि) ०२१६४/२४२०४६ मो. : ०९७६२५२१०८३

---

## बालाजी

ऑटोमोबाईल्स



प्रोप्रा. ज्ञानेश्वर शांताराम शिंदे
Mob. : 9860159519



मनोज ज्ञानेश्वर शिंदे
सिव्हिल इंजिनियर व गव्हेंमेंट कॉन्ट्रॅक्टर
Mob. 9822011156
9890453147

टाटा व महेंद्रा गाडीचे ओरिजनल सुट्या भागांचे विक्रेते

आळेफाटा, ओतुर कल्याण रोड, ता. जुन्नर, जि. पुणे.

---

## राजश्री टिंबर मर्चन्ट व जितेंद्र ट्रेडर्स

जनरल कॉन्ट्रॅक्टर अॅन्ड सप्लायर्स

आमचे प्रेरणास्थान



अशोकराव ब. हर्णसकर
मो. 9850402010

जितेंद्र अशोकराव हर्णसकर
मो. 9850833695



सचिन अशोकराव हर्णसकर
नगराध्यक्ष भोर नगरपालिका
मो. 9850243030

सागवानी व इमारतीच्या जंगली, लालटीक, बेलपण, पीळकोटा, मंगलोरी, कौल, वासे, शहाबादी फारशीचे व्यापारी
मु. पो. ता. भोर, जि. पुणे.फोन. ऑफिस : ०२११३ - २२३९७३

---



## विट कारखाना

प्रोप्रा. : धनंजय रमेश हर्णसकर
५०३, नागोबा आळी, भोर, पुणे ४११ २०६.
फोन : निवास - (०२११३) २२२७७३
मोबाईल - ९८२२२७२४७३

**प्रेरणास्थान : रमेश बाबुराव हर्णसकर**



## श्री गणेश मेडिकल अँण्ड जनरल स्टोअर्स

*प्रोप्रा. : गणेश रमेश हर्णसकर*
मोबाईल - ९८२२४२६२७३
सम्राट चौक, भोर, जि. पुणे. फोन : (०२११३) २२२०८४



# गणराज हार्डवेअर

डिलर

उदय एच.डी.पी.ई.पाईप



**श्री. हेमराज बोराराम प्रजापति** | **श्री. गोपाल हेमराज प्रजापति**

फिनोलेक्स पाईप, पी. व्ही. सी. पाईप फिटींग, जी. आय. पाईप फिटींग, रस्सी, ताडपत्रीचे व सर्व प्रकारचे मोटर होलसेल आणि रिटेल विक्रेते.

**उत्तम प्रकारच्या सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.**

**श्री छत्रपती शिवाजी मार्केट, गाळा नं. ४३, सासवड, पुणे. मो. ९०११४९२९४३.**

---

**Akhilesh K. Prajapati**
9881407087



# JAY SHRI RAM
## INDUSTRIES



JOB WORK : Lathe Work, Center less Grinding & Thread Rolling

Dynamic Co.-op. Society, F9/9, MIDC, Ambad, Nashik - 10.
Tel. : 0253-6603136

---



# आहेर ब्रिक्स

## बिल्डिंग मटेरियल
## ॲण्ड सप्लायर्स



**श्री. राजेंद्र रंगनाथ आहेर**
अध्यक्ष निफाड तालुका कुंभार समाज सामाजिक संस्था
अध्यक्ष कुंभार समाजोन्नती मंडळ
ओझर शहर बारा बलुतेदार महासंघ

**चि. ज्ञानेश्वर राजेंद्र आहेर**
डिप्लोमा इन ॲग्रीकल्चर

**M. : 9422249690/9405888687/7588212624**

बाणगंगा, मारुती मंदिराजवळ, विटभट्टी, ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक 422 206. **Mob.: 9423972947**



**सौ. सुनंदा रा. आहेर**

---



# दत्तकृपा कोल सप्लायर्स

इंपोर्टेड कोळसा व राख ठोक व किरकोळ भावात मिळेल

## श्री दत्तकृपा वीट कारखाना

उत्तम प्रतीचे वीटा होलसेल भावात मिळतील.

**सुहास उर्फ**
**सतिश चंद्रकांत कुंभार**
मो. **9922234552**

## विट कारखानदार व मुर्तीकार

**सर्वांगसुंदर गणेशमूर्ती मिळतील.**



**चि. श्रीनिवास चंद्रकांत कुंभार**
मो. **9822472552**

निवास : मु.पो. ओझर्डे, ता. वाई, जि. सातारा.

---



# श्री साईनाथ एंटरप्रायजेस

*Expert Profile Cutters and Dealers in Iron Goods.*



**किशोर गुडेकर**
**Mo. : 96650 65826**
**98226 45832**

**सौ. कांचन कि. गुडेकर**
**Mo. : 9766690922**
**8624067149**

**प्लॉट नं. २६, सेक्टर नं. ७, पी.सी.एन.टी.डी.ए., भोसरी, पुणे ४११ ०२६.**

**फोन : (०२०) ६५१११८६०, ६५११६७८०**

*CNC Profile Cutting Machine*

---



# प्रणव एन्टरप्रायझेस

## प्रणव वॉटर सप्लायर्स

६५/७, निवृत्तीनगर, हडपसर, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे ४११ ०२८.

ऑफिस

**प्रोप्रा. सुधीर निवृत्ती कुंभार**

१६५/क, माळवाडी, हडपसर, पुणे ४११ ०२८.

फोन नं. २६९९९२४२

---



**सर्व कुंभार समाज बांधव व कुंभश्री परिवारास गोरे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!**

**श्री. बाळाजी भिमाजी गोरे**
ज्येष्ठ सत्यशोधक व
कुंभश्री प्रतिनिधी
Mo. 9673862392



**कै. सौ. अन्नपुर्णा बाळाजी गोरे**
दे. राजा, जि. बुलढाणा



**सुरेश बाळाजी गोरे**
दे. राजा, जि. बुलढाणा
Mo. 9673145938



**रमेश बाळाजी गोरे (पोलीस)**
दे. राजा, जि. बुलढाणा Mo. 9923273071

---

**सर्व कुंभार समाज बांधव व कुंभश्री परिवारास शेवाळे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!**

**श्री. पांडुरंग नामदेव शेवाळे**
औषधी निर्माण अधिकारी चिखली, जि. बुलडाणा
Mo. 8888854655



**सौ. प्रमिला पांडुरंग शेवाळे**
Mo. 9764328620



**श्री. संदीप पांडुरंग शेवाळे ME Ph. D**
(Chemical Engineering) प्राध्यापक
MIT आळंदी Mo. 9823272765



**चि. प्रदिप पांडुरंग शेवाळे ME**
**(Comp. Sci & Engg.) प्राध्यापक**
D.Y. Patil College of Engineering, Pimpri) Mo. 9860363240

# सत्यशोधक कुंभार गुरुजी

**– प्रा. डॉ. मुकुंद तांबे**

स्वातंत्र्यपूर्व काळात विशेषतः १९२० च्या आसपास महाराष्ट्रामध्ये समाज प्रबोधनाची फार मोठी चळवळ आकार घेत होती. धर्माचा प्रचंड पगडा असलेल्या रुढीप्रिय समाजाला जागरूक करण्यासाठी अनेक विचारवंतांनी योगदान दिलेले आहे. या विचारवंतांमध्ये महात्मा फुले यांनी आपल्या विचारांनी आणि कार्यानी समाजाला खडबडून जागे केले. अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षण, विधवा आणि परित्यक्तांसाठी आधार या आपल्या कार्यातून सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली.




आपल्या अवतीभवती चालणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय चळवळीचा योग्य तो अर्थ समजून घेऊन त्या कार्यात स्वत:ला झोकून देऊन काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली. अनेक कार्यकर्त्यांनी समाजासाठी आवश्यक असणाऱ्या विविध प्रकारच्या चळवळीपैकी एखाद्या चळवळीची स्वत:ला जोडून त्यात आयुष्यभर काम केले. मात्र काही व्यक्तींनी समाजासाठी आवश्यक असणाऱ्या बहुविध कार्यांमध्ये स्वत:ला झोकून देऊन आयुष्यभर अत्यंत निष्ठेने, कष्टाची आणि विरोधाची तमा न बाळगता कार्य केले. अशा अनेक क्षेत्रात मूलगामी स्वरूपाचे काम करणाऱ्या कृतीशील कार्यकर्त्यांमध्ये कुंभार गुरुजी यांचा समावेश मोठ्या आदराने करावा लागेल.

कुंभार गुरुजी म्हणजेच बळीराम नागो कारभारी यांचा जन्म बोदवड येथे १८९८ मध्ये शेतकरी कुटुंबात झाला. वडील शेतीकाम करायचे. घरात शिक्षणाचे वातावरण नव्हते. मात्र आपल्या मुलांनी शिकावे अशी वडिलांची इच्छा होती. त्यानुसार आपल्या मुलाला त्यांनी मोठ्या कष्टाने शिकवले. १९१६ साली हा मुलगा व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा पास झाला. त्या काळात एवढे शिक्षणही पुष्कळ होते. त्यामुळे तलाठ्याची नोकरी मिळाली. पण शुभयोग असा, की लवकरच पाचोरा तालुक्यात पिंपळगांव हरेश्वर येथे असिस्टंट टीचरची नोकरी मिळाली. नंतर त्यांची १९२० मध्ये चाळीसगाव तालुक्यातील बहाळ येथे बदली झाली.

वर उल्लेख केल्याप्रमाणे १९२० मध्ये महाराष्ट्रात ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळ, स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ, अस्पृश्यता निवारणाची चळवळ आणि महात्मा ज्योतिबा फुलेंची सत्यशोधक चळवळ यांचा फार मोठा प्रभाव होता. कुंभार गुरुजींनी शिक्षणप्रसार यात स्वतःला झोकून देण्याचे ठरवले.

१९२१ मध्ये त्यांची जळगावच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणासाठी निवड झाली. तिथे पहिल्या वर्षी प्रथम क्रमांक मिळाला, नंतर ते धुळ्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये आले आणि उत्तम गुणांनी परीक्षा उत्तीर्ण केली. जेव्हा यशस्वी विद्यार्थ्यांचा ग्रुप फोटो काढला, तेव्हा काही उच्चवर्णीय विद्यार्थ्यांनी हरिजन विद्यार्थ्यांचे फोटो खरवडून काढले. त्या विषयात त्यांनी जेव्हा कुंभार गुरुजींकडे तक्रार केली तेव्हा गुरुजींनी सांगितले, ''ज्या विद्यार्थ्यांनी असे केले आहे त्यांच्या फोटोला तुम्ही कवड्या बांधा आणि मला आणून द्या.' आणि तो फोटो सर्वांना दिसेल असा लावला. प्रकरण चिघळल्यावर मुख्याध्यापकांना मध्यस्ती करावी लागली. त्याच सुमारास कुंभार गुरुजींनी बोर्डिंगमधील हरीजन मुलांची वेगळी पंगत बसत असे, त्याला विरोध करून सणाच्या दिवशी सगळ्यांची एकत्र पंगत बसवली.

१९२४ मध्ये धुळ्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली. त्या वेळी ते उत्तम शिक्षक म्हणून ओळखले जाऊ लागले. मात्र ते ब्राह्मण शिक्षक नाहीत म्हणून त्यांच्याविरुद्ध तक्रारी केल्या जाऊ लागल्या. प्राचार्यांनी या तक्रार करणाऱ्यांना कठोर उत्तर दिले.

कुंभार गुरुजींनी धुळ्यात १५ वर्षे उत्तम काम केले. त्या वेळी त्यांनी धुळ्यातील हरिजन सेवक संघाचे काम करणाऱ्या काकासाहेब बर्वे, मराठा समाज शिक्षण प्रसारक संस्थेचे दादासाहेब घोगरे, ना. भि. चव्हाण, विश्वासराव देवरे ह्यांच्या कामात भरपूर मदत केली. १९३८ मध्ये नाशिकच्या काकासाहेब वाघ ह्यांच्या संस्थेच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये उपप्राचार्य म्हणून रुजू झाले आणि तेथेही भरपूर काम केले. नाशिक जवळच्या ११ गावांमध्ये शाळा सुरू केल्या. नंतर त्यांची भुसावळला लोकशिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक झाली. व पदावर काम करताना त्यांनी लोकशिक्षणासाठी लोककलेचा वापर करून अनेक कार्यक्रम बसवले. त्यांनी काही अत्यंत उपयुक्त पुस्तिका लिहिल्या आणि त्याचा प्रसार केला. आपल्या नोकरीच्या शेवटच्या दिवसात बोदवडला शिक्षक म्हणून निवृत्त झाले. त्यांना खरे म्हणजे निवृत्त होऊन शेती करायची होती. परंतु दादासाहेब घोगऱ्यांनी त्यांना आपल्या संस्थेच्या कामासाठी बोलावून घेतले. त्यामुळे ते परत धुळ्याला आले. आणि मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या आद्याव ट्रेनिंग कॉलेज, मराठा बोर्डिंग अशा अनेक संस्थांच्या कामात लक्ष देऊन संस्थेची उत्तम सेवा केली.

कुंभार गुरुजींनी सद्विचारांचा प्रसार, गरीब, दीनदुबळे ह्यांना मदत करून त्यांचे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी मार्गदर्शन केले. कॉलेज आणि बोर्डिंग मधल्या अशा अनेक विद्यार्थ्यांचे ते पालक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य विद्यार्थी जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण करून पुढे नावारूपाला आले.

कुंभार गुरुजींनी मराठी बोर्डिंगचे काम ज्या आत्मीयतेने सांभाळले त्यामुळे त्यांची एक वेगळीच प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली. संस्था चालकांनादेखील त्यांच्या कामाबद्दल विशेष आदर होता. कुंभार गुरुजी बोर्डिंगचे काम बघत असताना गाडगे महाराज बोर्डिंगमध्ये आले होते आणि बोर्डिंगमधल्या काही त्रुटी आणि कमतरता लक्षात आल्यावर गाडगे महाराजांनी स्वतः बोर्डिंगला भांडीकुंडी भेट दिली.

कुंभार गुरुजींनी शिक्षक म्हणून विविध क्षेत्रात लोकांना जागृत करण्याचे व्रत स्वीकारले होते. विद्यार्थीवर्ग, शेतकरी, शिक्षकवृंद आणि सर्वसामान्य समाज यांच्यासाठी व्याख्याने, पुस्तकलेखन, कीर्तन, पथनाट्य अशा विविध मार्गांनी त्यांनी आपले व्रत चालू ठेवले. विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी त्यांनी गणितावरची पुस्तके लिहिली. त्याचप्रमाणे शुद्धलेखन आणि व्याकरण या दोन्ही बाबतीत एकूणच जी उदासीनता होती ती घालवण्यासाठी अत्यंत पोटतिडिकीने काम केले. १९५८ मध्ये तीन शुद्धलेखन सप्ताह साजरे केले. शाळाशाळांमध्ये जाऊन शुद्धलेखन आणि व्याकरण यावर भाषणे देऊन जागृती निर्माण केली आणि प्रशिक्षण दिले. व्याकरणाचे २० तक्ते बनवून सर्वत्र त्याच्या आधारे प्रशिक्षण देत असत.

भारतातल्या शेतीविषयक प्रश्नांची त्यांना विलक्षण जाण होती. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारायची असेल तर शेतीचे तंत्रज्ञान सुधारले पाहिजे. त्यासाठी लोखंडी नांगर, ट्रॅक्टर, खते यावर भर दिला पाहिजे असे ते आग्रहाने सांगत. धान्यव्यवहारात दलाल कशाला, शेतकरी संस्थांनी व्यवहार पाहिले पाहिजेत असे ते आग्रहाने मांडत. खानदेशात भुईमुगाची शेंगा आणि तेलबिया मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असल्यामुळे तेल गिरण्या शेतकऱ्यांच्या असल्या पाहिजेत असे सांगत. आपल्या शेतीतला कुठलाही भाग न वापरता राहू नये याची शेतकऱ्यांनी काळजी घेऊन जास्तीत जास्त उत्पादन घेतले पाहिजे असे सतत सांगत असत. शेतकरी कुटुंबातील लग्नाचा अनाठायी खर्च, मानपान यावर ते कठोर टीका करत. व्यसनाधीनतेबद्दल दमड्याचा संसार म्हणजे सत्यानाश ही नाटिका लिहिली. आपल्या कीर्तनातून हे लोकांच्या मनावर सतत ठसवत राहिले.

किर्तनाच्या बाबतीत गाडगे महाराज हे त्यांचे आदर्श होते आणि कीर्तनाची प्रेरणा काकासाहेब बर्वे यांच्याकडून मिळाली. पहिले कीर्तन त्यांनी थाळनेर येथे केले. कीर्तनाची जी परीक्षा झाली त्यात अवघे तीन विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी गुरुजी अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे किर्तन हे जनसंपर्काचे आणि जनशिक्षणाचे माध्यम आहे हे मनोमनी पटल्यामुळे त्यांनी असंख्य किर्तने केली आणि त्यातून मिळालेले पैसे सामाजिक कार्याला दिले. स्वतःसाठी एक पैसाही ठेवला नाही.

गुरुजींनी एकूण २० लहानमोठी पुस्तके लिहिली. त्यातील विषयांची विविधता थक्क करणारी आहे. अंकगणित, आपले अशुद्ध लेखन शुद्ध कसे करावे, व्यावहारिक व्याकरण आणि सुलभ शुद्धलेखन याव्यतिरिक्त वनसंरक्षण, पिशाच्चबाधा, अधिक धान्य पिकवा, शूर राजपूतांचा परिचय अशी पुस्तके आहेत.

कुंभार गुरुजींच्या स्मरणार्थ धुळ्याच्या जयहिंद प्राथमिक शाळेला त्यांचे नाव दिले आहे. हरिजन सेवक संघटनेने विद्यानगरी भागातील बालमंदिराला त्यांचे नाव दिले आहे. शिरपूरच्या किसान विद्या प्रसारक संस्थेने वाघोडे येथील शाळेला गुरुजींचे नाव दिले आहे आणि त्यांचा पुतळा उभारलेला आहे. या पुतळ्याचे अनावरण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हस्ते झाले.

मार्च १९६६ मध्ये एस.एस.व्ही.पी.एस. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त झालेल्या कार्यक्रमात तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते कुंभार गुरुजींचा सत्कार करण्यात आला होता. या कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण, मधुकरराव चौधरी उपस्थित होते.

सद्विचारांचा प्रसारक, लेखन, भाषण, किर्तन वर्गातील अध्यापन या विविध माध्यमातून धुळे, जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी व समाज यांना 'शहाणे करून सोडावे सकळजन' यावर अविचल निष्ठा असणाऱ्या कुंभार गुरुजींचे १६ नोव्हेंबर १९८१ मध्ये निधन झाले.

(हा लेख प्रा. डॉ. मु. ब. शहा यांनी लिहिलेल्या 'सत्यशोधक श्री कुंभार गुरुजी' या पुस्तकावर आधारित आहे.)

***

---

## एक तुकाराम हवा!




विषमय झाले अन्न, जिवघेणा झाला दवा
प्राण वाचविण्या फक्त एक तुकाराम हवा!

दुधामध्येही भेसळ, पनीरही बनावट
ओळखण्या खोटा खवा, एक तुकाराम हवा!

पैसा मिळावा रगड, लोकांचाही जीव जावा
अशा दैत्यांसाठी फक्त एक तुकाराम हवा!

जे जे उच्च पदांवर, भेसळीचे ठेकेदार
त्यांच्या निर्दालनासाठी एक तुकाराम हवा!

जे जे खाते आले हाती, स्वच्छ कर्तव्याची ख्याती
कामचोर लोकांसाठी, एक तुकाराम हवा!

नको शिस्त, नको काम, हवा हरामाचा दाम
अशा लाचखोरांसाठी, एक तुकाराम हवा!

जरी नियत चांगली, तरी होतसे बदली
अशा निर्भयतेसाठी, एक तुकाराम हवा!

असे दमदार काम, व्यापाऱ्यांना फुटे घाम
अशा दहशतीसाठी, एक तुकाराम हवा !

रयतेच्या हितासाठी झुंजणारा एकटाच
असा निर्भय, निश्चयी, एक तुकाराम हवा!

जेव्हा आदेशावरती, होते पल्लेदार सही
देण्या सुरक्षेची ग्वाही, एक तुकाराम हवा!

# कुंभार/प्रजापतिचा इतिहास

मित्रांनो, आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की कुंभारांनी देशालाच नाही तर संपूर्ण जगाला काय दिले आहे.

१) दक्ष प्रजापती हा जगातील पहिला राजा बनला ज्याची राजधानी आजही कंखल (हरिद्वार) येथे आहे. पुरावा आहे. पौराणिक कथेनुसार, दक्ष प्रजापती हा ब्रह्मदेवाचा पुत्र आणि माता सतीचा पिता होता आणि सतीचा पिता असल्याने ते भगवान शिवाचे सासरेही होते.

२) शककर्ता राजा शालीवाहन पैठण, महाराष्ट्र हा सम्राट कुंभार होता म्हणूनच कुंभारांना राजे असे म्हणतात.

३) आई श्रीयादेवी माता यांनी प्रल्हादाला अग्निपासून बचावाचा मंत्र दिला होता.

४) संत शिरोमणी गोरा कुंभार यांनी आपल्या भक्तीने आपल्या मृत मुलाला आपल्या निस्सीम भक्तीने जीवनदान मिळवले.

५) पंडीत धोंडिराम कुंभार महात्मा ज्योतीराव फुले यांचे शिष्य त्यांनी काशी येथे जाऊन वेदशास्त्राचा अभ्यास केला आणि खुद्द शंकराचार्यांशी वाद विवाद करून त्यांना हरविले त्या वेळेपासून त्यांना पंडीत पदवी देण्यात आली.

६) कुंभारांनी मेसोपोटेमियामध्ये खडूचा वापर करून, संपूर्ण जगाला अन्न कसे खावे आणि पाणी कसे प्यावे हे शिकवले गेले.

७) कुंभारानी विटा बनवून घर आणि वाडे बांधायला शिकवले. टाइल्सपासून छप्पर बनवले.

८) सर्व सभ्यतेचा जनक कुंभार आहे. पीटर, पॉटर किंवा पोप हे सर्व कुंभार आहेत.

९) राजा हरिश्चंद्र हा एक कुंभार होता ज्याचा इतिहास मोठे दाता या नावाने ओळखला जातो.

१०) सत्यवान हा कुंभार होता ज्याच्या पत्नीचे नाव सती सावित्री होते. सावित्रीने यमाकडून तिच्या पतीचे प्राण परत आणले तेव्हापासून वडाला पुजतात. वटसावित्रीचा सण.

११) सती अनुसुईया एक कुंभार होती जिची पवित्रता कोणीही तोडू शकत नाही.

१२) स्वातंत्र्य सेनानी, डॉ. पद्मश्री रत्नाप्पा आण्णा सर हे कुंभार होते ज्यांनी संविधानाच्या अंतिम मसुद्यावर स्वाक्षरी केली.

१३) शाहीद रामचंद्र विद्यार्थी हे कुंभार होते जे वयाच्या १२ व्या वर्षी जॅक युनियनचा ध्वज उतरवताना आणि तिरंगा फडकवताना ब्रिटीशांच्या गोळ्यांनी शहीद झाले.

१४) छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मराठा कुंभार भरपूर होते. महाराजांच्या आग्र्याहून सुटकेच्या वेळी सावळाराम कुंभार यांनी फार मोठी महत्त्वाची भूमिका बजावली होती. महाराष्ट्रात परतल्यानंतर त्यांना विश्वासराव असा किताब शिवाजी महाराजांनी दिला.

१५) जोला गावात शेतकऱ्यांची थकबाकी (कर्ज) भरणारे कुंभार होते, ज्यांचे राजपत्र आजही सरकारी तिजोरीत आहे.

१६) राणी रामपाल ही कुंभार भारतातील नंबर १ हॉकी खेळाडू होती तिने भारताच्या टीमची कॅप्टनशिप सुद्धा केली होती.

१७) सुप्रसिद्ध हॉकी खेळाडू सरदारा सिंग हे कुंभार आहेत.

१८) जगातील सर्वात छोटी महिला कु.ज्योती आमगे, नागपूर ही कुंभार आहे.

१९) म्हैसूरचा राजा बाज बहादूर वाडियार हा एक शूर कुंभार होता.

२०) राजा भर्त्री शुद्ध नाव भृत्री हरी हा एक कुंभार होता ज्याची कथा जग गाते.

२१) शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आवाज उठवणाराही कुंभार आहे, गुगलवर सर्च केला तरी चालेल.

२२) गांडेनवाडे गावात इंग्रज सैनिकाला मारहाण करणारा मुलचंद हा देखील कुंभार होता.

२३) अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांना वडीलधाऱ्यांनी मारहाण केली आणि बाकीचे (कर) कुंभार भरत असत.

२४) सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते विनोद मेहरा फिल्मिस्तानमध्ये कुंभार होते.

२५) गौतम बुद्धांचे पालनपोषणही त्यांची मावशी गौतमी प्रजापती यांनी केले, म्हणजेच गौतम बुद्धही प्रजापतीच होते.

२६) गुरु नानक हे देखील शीख कुंभार होते.

२७) सुप्रसिद्ध विचारवंत संत राम बीए यांनी जाती-पाती तोडो मंडळ निर्माण केले, ते कुंभार होते.

२८) चंद्रावर जाणारा पहिला मानव नील आर्म स्ट्रॉंग पॉटर जातीत जन्मला ते सुद्धा कुंभार होते.

२९) सुप्रसिद्ध इंग्रजी चित्रपट हॅरी पॉटर म्हणजे कुंभराच्या मुलावर चित्रित झाला आहे.

३०) कुठलीही सभ्यता असली तरी कुंभाराचे नाव नक्कीच आहे. हडप्पा संस्कृती असो वा मोहेंजोदरो, जगाच्या कानाकोपऱ्यात समृद्ध संस्कृती असलेल्या कुंभारांचे पुरावे आहेत.

३१) होमिओपॅथिक औषधांचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन हे कुंभार होते.

मित्रांनो, जगात सर्वप्रथम सभ्यता कोणी आणली असेल तर तो कुंभार होता ज्याला आपण आज प्रजापति या नावाने ओळखतो. जय संत गोरोबा काका! राजा दक्ष प्रजापतीचा जयजयकार!

***

# सुप्रसिद्ध कॅन्सर स्पेशालिस्ट डॉ. प्रकाश देवडे यांचे आत्मकथन



मी डॉ. प्रकाश नारायणराव देवडे, एमबीबीएस, एमडी (मेडिसिन), डीएम (मेडिकल ऑन्कोलॉजी). ही सर्व पदवी मी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतून पूर्ण केली आहे. मला अभिमान आहे की मराठवाडा विभागातील मी पहिला डीएम मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट आहे. २०१३ पासून मी छत्रपती संभाजीनगर येथे वैद्यकीय ऑन्कोलॉजिस्ट म्हणून कार्यरत असून सध्या एमओसी कॅन्सर केअर सेंटरचा मेडिकल डायरेक्टर आहे.

२०१६ मध्ये मला ''बेस्ट कन्सल्टंट ऑन्कोलॉजिस्ट इन महाराष्ट्र'' हा राष्ट्रीय आरोग्य उत्कृष्टता पुरस्कार मिळाला. मी एमएमसी मान्यताप्राप्त वक्ता असून इंडियन सोसायटी ऑफ ऑन्कोलॉजी, एशियन सोसायटी ऑफ न्यूट्रिशन आणि आयापेन इंडिया असोसिएशन फॉर एंटरल अँड पॅरेंटरल न्यूट्रिशनचा सदस्य आहे. मी औरंगाबाद कॅन्सर सोसायटीचा संस्थापक सदस्य असून २०२३ पासून मानद सचिव म्हणून काम करत आहे.

मी शाळा, बँका, उद्योग, गृहनिर्माण संस्था, मंदिरे तसेच रेडिओ, दूरदर्शन, सोशल मीडिया आणि वेबिनारच्या माध्यमातून कॅन्सर जनजागृती केली आहे. वृत्तपत्रे व आरोग्य मासिकांमध्ये लेखन केले आहे आणि टीव्ही व एफएम रेडिओवर मुलाखती दिल्या आहेत.

मी Online Advanced Management of Oncological Diseases हा अभ्यासक्रम हार्वर्ड मेडिकल स्कूल, बोस्टन २०२४ मध्ये पूर्ण केला आहे. आजपर्यंत मी ७० राष्ट्रीय व ८ आंतरराष्ट्रीय कॅन्सर परिषदांना हजेरी लावली आहे. दोन राष्ट्रीय परिषदांमध्ये शास्त्रीय समितीचे अध्यक्षपद भूषवले असून एका परिषदेत संयुक्त आयोजन सचिव म्हणून काम केले आहे. अलीकडेच मी भारतीय इम्युनोथेरपीवरील माहिती ईएसएमओ इम्युनो-ऑन्कोलॉजी परिषदेत (लंडन, डिसेंबर २०२५) सादर केली.

**माझी वैयक्तिक कहाणी :** माझा जन्म आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबात एका दुर्गम गावात झाला. त्या वेळी गावात चौथीपर्यंत शाळा होती, पोस्ट ऑफिस नव्हते. माझी आई निरक्षर होती आणि वडील मोडी लिपीत चौथीपर्यंत शिकलेले; ते शेतकरी होते. लहानपणी आम्हाला शेतमजुरी करावी लागे. लहानपणापासूनच मला शिक्षणाची आवड होती. दोन मोठ्या भावांकडून प्रेरणा घेऊन मी अभ्यासाचा आनंद घेतला. चौथीपर्यंत मी जिल्हा परिषद शाळेत शिकलो. एकाच खोलीत सर्व वर्गांना एकच शिक्षक शिकवत असे. कधी कधी झाडाखाली वर्ग भरत असे, ज्याला आम्ही ''शांती निकेतन वर्ग'' म्हणत असू.

मी शिक्षकांचा लाडका विद्यार्थी होतो. एकदा पायाच्या भेगांमुळे चालता येत नसल्याने शिक्षकांनी मला खांद्यावर बसवून शाळेत नेले होते, ही आठवण आजही माझ्या मनात आहे. अभ्यासाविषयीची प्रचंड आवड असल्याने पालकांना मला अभ्यास सांगावा लागला नाही; उलट कधी कधी जेवणासाठी अभ्यास सोडावा असे सांगावे लागे. इतर मुले खेळत असताना मी अभ्यासात रममाण असायचो. तिसरी ते पाचवीपर्यंत मी दररोज पारायण ऐकत असे व पोथी वाचत असे. चौथीनंतर मी आजीच्या गावी गेलो, तिथे पाचवी शिकून नवोदय प्रवेश परीक्षा दिली. ती उत्तीर्ण होणे हा माझ्या आयुष्यातील सुवर्णक्षण ठरला.

माझा जीवनमंत्र आहे – ''अभ्यासाचा आनंद घ्या आणि जीवनाचा आनंद घ्या.''

मी नेहमी प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केले, निकालाकडे फारसे लक्ष दिले नाही. दीर्घकालीन ध्येयांवर विश्वास न ठेवता वर्तमानात सर्वोत्तम देण्यावर भर दिला. अभ्यासात संकल्पनात्मक दृष्टिकोन ठेवून प्रत्येक विषय पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय पुढे जात नव्हतो.

नवोदय विद्यालयाने मला सर्वांगीण विकासाची संधी दिली – वाचनालय, संगीत, खेळ इत्यादी. माझे आवडते शिक्षक रवींद्र नरसाई सर हे बहुगुणी होते; त्यांनी शैक्षणिक विषयांसोबत जीवनमूल्येही शिकवली.

दहावीनंतर मी नवोदय सोडले कारण वैद्यकीय प्रवेशासाठी जास्त टक्केवारी आवश्यक होती, जी राज्य मंडळात सोपी होती. नवोदयमध्ये विज्ञान शाखा उपलब्ध नसल्याने मी राज्य मंडळ निवडले. नवोदयच्या अर्ध-इंग्रजी माध्यमामुळे माझे इंग्रजी भक्कम झाले व विज्ञान शाखेत सहज जुळवून घेतले.

मी कधीही कोचिंग किंवा ट्युशन घेतले नाही. फक्त स्व-अभ्यास केला. बारावीनंतर मला शासकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी निवड झाली. एमबीबीएसमध्ये कमी गुण मिळाले तरी मी विषय सखोलपणे अभ्यासले, ज्यामुळे एमडी मेडिसिनमध्ये प्रवेश मिळाला. नंतर अभ्यासावरील प्रेमामुळे मी डीएम मेडिकल ऑन्कोलॉजी पूर्ण केली आणि अशा प्रकारे माझा व्यावसायिक प्रवास सुरू झाला.

***

## डॉ. कुंभार यांच्या पुस्तकाला पुरस्कार



**नागठाणे :** डॉ. शुभांगी तानाजी कुंभार यांनी लिहिलेल्या ''विचारदीपः निबंधमाला'' या पुस्तकाला यंदाचा सत्यशोधक डॉ. अण्णा भाऊ साठे उत्कृष्ट ग्रामीण साहित्य राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. कुंभार या वेचले (ता. सातारा) येथील असून, सध्या त्या हुमगाव (ता. जावळी) येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये कार्यरत आहेत. विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

# मधुमेह उपचारातील 'नवा अध्याय'

# इन्सुलिन आयकोडेक: आता वर्षातून ३६५ नव्हे, तर फक्त ५२ इंजेक्शन्स!

**– डॉ. अभिलाष विलास नांदुरकर (एम.डी. मेडिसिन अंतिम वर्ष) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर**



मधुमेह (Diabetes Mellitus) हा आजच्या काळातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या असंसर्गजन्य आजारांपैकी एक आहे. विशेषतः 'टाइप-२ मधुमेह' हा जगभरातील सुमारे ९० टक्के रुग्णांमध्ये आढळतो. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या (ICMR) ताज्या आकडेवारीनुसार, भारतात सुमारे १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने प्रभावित आहेत, तर १३.६ कोटी लोक प्री-डायबिटीजच्या (मधुमेहाच्या उंबरठ्यावर) टप्प्यात आहेत. याच कारणामुळे भारताला 'मधुमेहाची जागतिक राजधानी' असेही संबोधले जाते.

बदलती जीवनशैली, अयोग्य आहार, लठ्ठपणा, मानसिक ताणतणाव आणि शारीरिक श्रमांचा अभाव ही या आजाराची प्रमुख कारणे आहेत. मधुमेह नियंत्रणासाठी आहार, व्यायाम आणि तोंडी औषधोपचार उपयुक्त ठरतात; परंतु आजार वाढल्यानंतर अनेक रुग्णांना इन्सुलिन घेण्याचा सल्ला दिला जातो. नेमका हाच टप्पा रुग्णांसाठी मानसिकदृष्ट्या कठीण ठरतो. दररोज सुई टोचून घेण्याची भीती, प्रवासात इन्सुलिन सांभाळण्याचा त्रास किंवा डोस घेण्यातील अनियमितता यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे कठीण जाते.

या पार्श्वभूमीवर, मधुमेह उपचारात एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी बदल घडला आहे. आठवड्यातून केवळ एकदाच दिले जाणारे जगातील पहिले बेसल इन्सुलिन म्हणजेच 'इन्सुलिन आयकोडेक' (Insulin Icodec) आता भारतीय बाजारपेठेत अधिकृतपणे दाखल झाले आहे.

**एन.पी.एच. ते आयकोडेक : इन्सुलिनचा आधुनिक प्रवास**

१९४६ मध्ये 'एन.पी.एच.' (NPH) इन्सुलिनच्या शोधापासून आधुनिक इन्सुलिनचा प्रवास सुरू झाला. त्यानंतर विज्ञानाने प्रगती करत ग्लॅरगाईन, डिटेमिर आणि डिग्लुडेक यांसारखी २४ तास काम करणारी दीर्घकालीन (Long-acting) इन्सुलिन विकसित केली. परंतु, रुग्णाला तरीही रोज एक इंजेक्शन घ्यावेच लागत होते. आता या उपचारात थेट 'आठवड्यातून एकदाच' घेण्याच्या इन्सुलिन पर्वाचा उदय झाला असून, यामुळे रुग्णांना वर्षातील ३६५ इंजेक्शन्स ऐवजी फक्त ५२ इंजेक्शन्स घ्यावी लागणार आहेत.

**'इन्सुलिन आयकोडेक' नेमके काय आहे आणि ते कसे काम करते?**

हे मानवी बेसल इन्सुलिनचे अत्याधुनिक 'अनालॉग' असून ते 'रिकॉम्बीनन्ट डी.एन.ए.' (rDNA) तंत्रज्ञानाद्वारे तयार केले जाते. सध्या बाजारात उपलब्ध असणाऱ्या 'डिक्लुडेक' किंवा 'ग्लार्जिन'पेक्षा याचे वैशिष्ट्य म्हणजे याचे अर्धायुष्य (Half-life) अत्यंत दीर्घ आहे. याच्या रचनेत तीन अमिनो आम्लांमध्ये बदल करण्यात आला असून त्याला 'C20 फॅटी डाय-सिड' जोडले आहे. यामुळे हे इन्सुलिन रक्तात गेल्यानंतर तिथल्या 'अल्ब्युमिन' (Albumin) नावाच्या प्रथिनाशी घट्ट जोडले जाते. यामुळे शरीरात इन्सुलिनचा एक सुरक्षित साठा तयार होतो आणि संपूर्ण आठवडाभर शरीराच्या गरजेनुसार अत्यंत संथ गतीने आणि स्थिर प्रमाणात सक्रिय इन्सुलिन मुक्त होत राहते. परिणामी, रक्तातील साखरेचे चढ-उतार कमी होतात आणि उपाशीपोटी असणारी साखर (Fasting Sugar) उत्तम नियंत्रित राहते.

**कोणासाठी ठरणार वरदान?**

हा नवा पर्याय प्रामुख्याने खालील रुग्णांसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल: ज्यांना नव्यानेच इन्सुलिन सुरू करायचे आहे असे 'टाइप-२' चे रुग्ण. रोज सुई टोचून घेण्याचा कंटाळा किंवा मानसिक भीती असणारे नागरिक. नियमित नोकरी-व्यवसायानिमित्त किंवा पर्यटनासाठी वारंवार प्रवास करणारे लोक. वृद्ध रुग्ण, ज्यांना रोज वेळेवर डोस घेण्याचे लक्षात राहत नाही (स्मरणशक्तीचे आजार).

**भारतात उपलब्धता आणि किमतीचे गणित**

भारतीय बाजारपेठेत हे इन्सुलिन 'ॲविकली' (Awiqli) या ब्रँड नावाने उपलब्ध झाले आहे. हे औषध 700 U/mL या अत्यंत तीव्र घनतेच्या प्री-फिल्ड पेन (Prefilled Pen) स्वरूपात उपलब्ध आहे. जागतिक औषध कंपनी 'नोव्हो नॉर्डिस्क'ने भारतीय रुग्णांची क्रयशक्ती लक्षात घेऊन याची किंमत सध्याच्या रोजच्या इन्सुलिनच्या तुलनेत जवळपास समान ठेवली आहे. पॅक प्रकार (Volume) एकूण इन्सुलिन युनिट्स कमाल किरकोळ किंमत (MRP)1 मिली पेन (1 ml Pen) 700 युनिट्स Rs. 2,611/-. 3 मिली पेन (3 ml Pen) 2100 युनिट्स Rs. 7,833/-.

**डोस चुकल्यास काय करावे?**

इन्सुलिन आयकोडेक आठवड्यातून एकदाच एका निश्चित दिवशी (उदा. दर रविवारी) घ्यायचे असते. चार दिवसांच्या आत आठवण आल्यास: समजा तुम्ही रविवारी डोस घ्यायला विसरलात आणि बुधवारी (४ दिवसांच्या आत) आठवण आली, तर त्वरित तो डोस घ्यावा आणि पुढील डोस नेहमीप्रमाणे रविवारीच घ्यावा. चार दिवसांनंतर आठवण आल्यास: जर चार दिवसांपेक्षा जास्त उशीर झाला असेल, तर तो चुकलेला डोस पूर्णपणे सोडून द्यावा. थेट पुढच्या रविवारीच नवीन डोस घ्यावा. या दरम्यान रक्तातील साखरेची वारंवार तपासणी करणे आवश्यक आहे.

**मर्यादा आणि दुष्परिणाम :**

वैद्यकीय क्षेत्रात कोणतेही नवीन औषध पूर्णपणे निर्दोष नसते. या इन्सुलिनच्याही काही मर्यादा आहेत. दीर्घकालीन हायपोग्लायसेमियाचा धोका: जर रुग्णाचा डोस चुकून जास्त झाला आणि रक्तातील साखर अचानक खालावली (Hypoglycemia), तर या इन्सुलिनचा परिणाम शरीरात आठवडाभर राहणार असल्यामुळे साखरेची पातळी कमी राहण्याचा त्रास दीर्घकाळ टिकू शकतो. अशा वेळी रुग्णाला तात्काळ वैद्यकीय निरीक्षणात ठेवणे गरजेचे असते.

**इतर सामान्य दुष्परिणाम :** नेहमीच्या इन्सुलिनप्रमाणेच इंजेक्शनच्या जागी लालसरपणा येणे, सूज येणे, लिपोहायपरट्रॉफी (त्वचेखाली चरबीची गाठ येणे) किंवा काही प्रमाणात वजन वाढणे असे किरकोळ त्रास होऊ शकतात.

**मर्यादा :** सध्या गरोदर महिला, स्तनपान करणाऱ्या माता आणि लहान मुलांमध्ये याचा वापर करण्यासाठी पुरेशी वैद्यकीय आकडेवारी उपलब्ध नसल्याने तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय याचा वापर टाळावा.

**निष्कर्ष :** इन्सुलिन आयकोडेक (ॲविकली) हे भारतासारख्या अवाढव्य लोकसंख्या असलेल्या देशातील मधुमेह व्यवस्थापनात एक मैलाचा दगड ठरणार आहे. यामुळे रुग्णांचा उपचारावरील विश्वास वाढेल आणि त्यांचे जीवनमान सुधारेल. परंतु, हे औषध घेण्यापूर्वी 'स्वतःच्या मनाने उपचार (Self-Medication) करणे' पूर्णपणे टाळावे. तुमच्या शरीराची गरज, सध्या सुरू असलेली इतर औषधे आणि मधुमेहाची तीव्रता तपासून तुमचे तज्ज्ञ डॉक्टरच याचा योग्य डोस निश्चित करू शकतात, हे रुग्णांनी कायम लक्षात ठेवावे.

***

## मातीचा सुगंध सातासमुद्रपार दरवळवणाऱ्या पार्श्वगायिका मधुरा कुंभार यांचा सहृदय सत्कार



**सुप्रसिद्ध पार्श्वगायिका मधुरा कुंभार यांचा सत्कार करताना सुरेश पाठक व नागपुरचे कुंभार समाज बंधू-भगिनी**

**नागपूर :** सुप्रसिद्ध पार्श्वगायिका मधुरा कुंभार यांचे महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्राच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त नागपूर येथे आगमन झाल्याप्रसंगी पारंपारिक मूर्तिकार व हस्तकला कारागीर संघाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सहृदय सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पारंपारिक मूर्तिकार संघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाठक यांनी मधुरा कुंभार यांना शुभेच्छा देताना सांगितले की, मुळातच कला-कौशल्याची दैवी देणगी लाभलेल्या कुंभार समाजात मधुरा कुंभार यांनी संगीत व गायन क्षेत्रात केलेल्या अथक तपश्चर्येमुळे कुंभारांच्या मातीचा माधुर्यपूर्ण सुगंध देश-विदेशात पोहोचवून समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. याचा संपूर्ण समाजाला अभिमान आहे. भविष्यातील वाटचालीत गायकीच्या क्षेत्रातील सर्व उच्च शिखरे त्यांनी सर करावीत, त्यांच्या कलेचा गौरव अधिकाधिक वाढावा व त्यांच्या स्वरांची जादू रसिकांच्या मनावर अशीच अधिराज्य गाजवत राहो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी पारंपारिक मूर्तिकार संघाचे पदाधिकारी गजानन बुरबाडे, महेश ठाकरे, रामदास मार्कंडवार, नरेंद्र पोडल्लीवार, धनराज वझे, गोविंदा कपाट, रामेश्वर चौधरी, सौ. मीना चौधरी, सौ. ज्योती पाठक, सौ. सविता ठाकरे तसेच कुंभार समाजातील विविध संस्थांचे पदाधिकारी व समाजबंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***

## साक्षी मधुकर कुंभार हिचे उच्च शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियाला प्रयान...!



ऑस्ट्रेलिया देशातील मेलबोर्नसिटी येथील प्रसिद्ध रॉयल मेलबोर्न इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या युनिव्हर्सिटीत मास्टर इन आर्टिफिशल इनटॅलीजन्स अशा उच्च शैक्षणिक पदवीसाठी शनिवार दिनांक ११ जुलै २०२६ रोजी दाबोली विमानतळ येथून कुमारी साक्षी हिने प्रयाण केले.

शैक्षणिक क्षेत्रात एक अनपेक्षित घटना म्हणून सामाजिक स्तरावर याची नोंद होत आहे. कु.साक्षी हिने (फर्मागुडी) येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधून इलेक्ट्रिशन अँड टेलिकॉमिनिकेशन मध्ये बी ई, उच्च पदवी संपादन केली आहे.

आपल्या कुशाग्र बुद्धीनुसार तिने खोर्ली गोवा येथील डेक्कन केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत ॲटोमेशन इंजिनियर म्हणून वेगवेगळे प्रोजेक्ट उत्तमरीत्या हाताळले. कुमारी साक्षी हिच्या या सर्व शैक्षणिक कार्यासाठी तसेच लहान भाऊ कुमार ओंकार कुंभार (मेकॅनिकल इंजिनियर) यांच्या शैक्षणिक कार्यासाठी आई सौ. अर्चना आणि वडील मधुकर परशुराम कुंभार (डेक्कन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेडचे एन्व्हायरमेंट सीनियर मॅनेजर) यांचे परिपूर्ण आणि उत्तम योगदान लाभले आहे. कु.साक्षी हिस मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!

***

# अनुष्का आहेर - रुईकर : भावना, संवाद आणि समतोलाची नवी उकल...

**सौ. अनुजा डोईफोडे, नांदेड**



अनुष्का आहेर–रुईकर

एक दहा–बारा वर्षांचा मुलगा डोळ्यांत राग वागण्यात अस्थिरता आणि मनात न सांगता येणारा गोंधळ, शाळेत तो खोडकर म्हणून ओळखला जायचा. तर घरी ऐकत नाही असा शिक्का बसला होता.

पण समुपदेशनाच्या प्रक्रियेत जेव्हा त्याच्या मनाचा दरवाजा अलगद उघडला, तेव्हा लक्षात आले तो राग नव्हता, ती एक मदतीची हाक होती. न समजून घेतल्याची वेदना, सततच्या अपेक्षांचा ताण आणि व्यक्त होण्याची अपुरी संधीचा सगळ्यांचा तो उद्रेक होता. जेव्हा त्याला ऐकून घेणारा आणि समजून घेणारा सहवास मिळाला, तेव्हा त्याच मुलाच्या वागण्यात शांतता आणि आत्मविश्वास उमलू लागला.

नांदेड शहरातील युवा मनाच्या डॉक्टर अर्थात मानसोपचार तज्ञ म्हणून अल्पावधीत नावलौकिक मिळविलेल्या सौ. अनुष्का आहेर–रुईकर यांच्या कार्याचा गाभा हाच आहे. मन समजून घेण्याचा आणि त्याला योग्य दिशा देण्याचा. वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी अनेक मुलांच्या, किशोरवयिनांच्या आणि पालकांच्या मनातील गुंतागुंती उलगडल्या आहेत. त्यांच्या अनुभवांतून स्पष्ट जाणवतं की, प्रत्येक अस्थिर वर्तनामागे एक न ऐकलेली गोष्ट, एक दडलेली भावना असते. रागाने भरलेलं मूल हळूहळू स्वतःच्या भावनांना शब्द देऊ लागतं, भीतीने गप्प बसलेली मुलगी धैर्याने स्वतःचा अनुभव मांडते हे क्षण त्यांच्या कार्याला अर्थ देणारे ठरतात.

महाविद्यालयीन काळात माझे वडील माझे खरे मार्गदर्शक होते. ’स्काय इज द लिमिट’ म्हणत मोठी स्वप्नं पाहायला त्यांनी शिकविले. आई आणि बहिणी कडून सतत प्रोत्साहन, प्रेम व आधार मिळाला. अनुष्का यांनी त्यांचे सासरे ॲड. संजय रुईकर, पती ओम रुईकर तसेच संपूर्ण कुटुंबीयांच्या सहकार्यामुळे व पाठिंब्याने पुनर्वसन मानसशास्त्रातील पदव्युत्तर पदविका (Post Graduate Diploma in Rehabilitation Psychology) यशस्वीरित्या पूर्ण केली. सध्या त्या मान्यताप्राप्त मानसशास्त्रज्ञ होण्याच्या ध्येयाच्या दिशेने सातत्याने प्रयत्नशील आहेत.

मुलांसोबत कार्य करणे हे त्यांच्यासाठी केवळ व्यावसायिक जबाबदारी नसून एक अंतर्मुख करणारा अनुभव आहे. उपचार प्रक्रियेद्वारे त्यांच्या वर्तनात व शिक्षणात घडणारे सकारात्मक परिवर्तन त्यांना गहन समाधान देते. एका आठ वर्षाच्या बालिकेच्या प्रकरणाने त्यांच्या संवेदनशीलतेला नवी दिशा दिली. प्रारंभी रागाच्या समस्या जाणवत असताना सत्रादरम्यान तिने स्वतःवर झालेल्या गैरवर्तनाची वेदनादायी अभिव्यक्ती केली. त्यानंतर त्वरित योग्य हस्तक्षेप व संरक्षणात्मक पावले उचलली गेली. आज ही बालिका सुरक्षित, आत्मविश्वासपूर्ण आयुष्य जगत आहे. या अनुभवाने अनुष्का यांना मानसिक आरोग्यसेवेकडे अधिक सजग, सहानुभूतीपूर्ण आणि जवाबदार बनविले.

किशोरवयीन मुलांचं मन म्हणजे खळबळजनक समुद्र. हा काळ शारीरिक, भावनिक, मानसिक आणि सामाजिक बदलांचा वादळी टप्पा असतो. स्वतःची ओळख शोधण्याची धडपड, करिअरविषयक अनिश्चितता, नातेसंबंधातील गुंतागुंत आणि भावनांचे तीव्र चढ–उतार या सगळ्यामुळे मनावर प्रचंड ताण निर्माण होतो.

पालकांच्या व्यस्ततेमुळे संवादाचा अभाव वाढतो आणि मुलं अनेकदा चुकीच्या दिशेने वळतात. या परिस्थितीचं अचूक चित्रण एका हिंदी शेरमध्ये व्यक्त होतं,

**दिल ही तो है न संग–ओ–ख़िश्त, दर्द से भर न आए क्यों,**
**रोएंगे हम हज़ार बार, कोई हमें सताए क्यों**

मन हे दगड नसतं; ते नाजूक असतं, संवेदनशील असतं. त्याला समजून घेणं, त्याचं ऐकून घेणं हीच खरी गरज आहे.

मोबाईल आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेक आज मुलांच्या मानसिक व भावनिक आरोग्यास गंभीर आव्हान ठरत आहे. सततची तुलना, अप्रमाणित माहितीवर विश्वास आणि आभासी नात्यांमध्ये गुंतणं यामुळे वास्तवाशी तुटलेपणा वाढतो. लहान वयात अनुचित आशयाचा संपर्क होऊन भावनिक परिपक्वतेवर परिणाम होतो. तसेच पडद्याच्या व्यसनामुळे बोलण्यात उशीर, लक्ष कमी होणं, डोळ्यांचे त्रास आणि सामाजिक संवादात घट दिसून येते. जरी काही विकार थेट मोबाईलमुळे होत नसले तरी अति वापरामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासावर नकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच संतुलित वापर, पालकांचे मार्गदर्शन आणि सजगता अत्यावश्यक ठरते.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्यांच्याकडे सजगतेने लक्ष देणं अत्यंत आवश्यक ठरतं. त्यांच्या क्षमतेनुसार ध्येय ठरवणं, सातत्याने प्रयत्न करणं, शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे, तसेच चांगल्या सवयी जोपासणं हे व्यक्तिमत्त्व घडवण्याचे मूलभूत आधार आहेत. भावनिक समस्यांचे प्रारंभीचे संकेत झोप – खाण्यातील बदल, चिडचिड, नकारात्मक विचारवेळीच ओळखणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

येथे पालकांची भूमिका निर्णायक ठरते. त्यांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधावा, त्यांच्या भावनांना समजून घ्यावं आणि त्यांच्यावर विश्वास ठेवावा. कुटुंबातील सुसंवाद, परस्परांचा आधार आणि मोकळं वातावरण हे मुलांच्या मानसिक आरोग्याचं भक्कम आधारस्थान ठरतं.

अतिसक्रियता किंवा लक्ष विचलनासारख्या समस्यांकडे पाहताना देखील समजूतदार दृष्टिकोन आवश्यक आहे. शिक्षा करण्यापेक्षा सकारात्मक प्रोत्साहन देणं अधिक परिणामकारक ठरतं. कौतुक, छोटे

बक्षीस, उरलेली दिनचर्या आणि काम–विश्रांती पद्धती यांच्या सहाय्याने मुलांची एकाग्रता वाढवता येते. त्यांच्या ऊर्जेला योग्य दिशा दिली, तर त्यांच्यातील क्षमता अधिक प्रभावीपणे फुलू शकते. या संपूर्ण प्रक्रियेत एक गोष्ट स्पष्ट होते. मुलांना घडवण्यासाठी केवळ शिक्षण नव्हे, तर संवाद, विश्वास आणि जिव्हाळा आवश्यक आहे.

समुपदेशन या संपूर्ण प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावते. समुपदेशक पालकांना मुलांच्या वर्तनामागील कारणं समजावतो, योग्य तंत्र शिकवतो आणि संयमाने परिस्थिती हाताळण्याचं मार्गदर्शन करतो. तसेच अतिसक्रियता नेहमीच विकारामुळे नसून इतर कारणांमुळे असू शकते, याची जाणीव करून दिली जाते. पालक, शिक्षक आणि मानसतज्ज्ञ यांचा समन्वय असेल, तर मुलाच्या विकासाला योग्य दिशा मिळते.

या सर्व प्रवासात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते मुलांना घडवण्यासाठी केवळ शिक्षण नव्हे, तर प्रेम, संवाद आणि समजूतदारपणा आवश्यक आहे. कुटुंबातील सुसंवाद, परस्परांचा आधार आणि मोकळं वातावरण हे मुलांच्या मानसिक आरोग्याचं भक्कम आधारस्थान ठरतं. अशा जिव्हाळ्याच्या वातावरणात मुलं आत्मविश्वासाने, स्थैर्याने आणि सकारात्मकतेने आयुष्याकडे वाटचाल करू शकतात हा अनुभवच मानसोपचार क्षेत्रातील सर्वात मोठा आहे.

समारोप करताना पुन्हा त्या छोट्या मुलाची आठवण येते ज्याच्या मनात एकेकाळी वादळ होतं. आज त्याच मनात शांततेचा किनारा दिसतो. कारण कुणीतरी त्याला दोष देण्याऐवजी समजून घेतलं, त्याच्या भावनांना शब्द दिले.

मन हे गुतागुंतीचं असलं तरी ते जपलं, समजून घेतलं, तर त्यातली वेदना शक्तीत बदलते. प्रत्येक वादळानंतर जसं आकाश स्वच्छ होतं, तसंच प्रत्येक अस्थिर मनातही एक शांत, सुंदर विश्व दडलेलं असतं फक्त त्याला स्पर्श करणारा संवेदनशील हात हवा असतो.

अनुष्का यांच्या मानसोपचार क्षेत्रातील समृद्ध प्रवासास मानसी परिवाराच्या शुभेच्छा! त्यांनी संवेदनशीलतेने मनोविकास, आत्मजाणीव आणि भावनिक स्थैर्य घडवत अनेकांना आधार द्यावा या सदिच्छा.

---

## मुलींना मोफत शिक्षण; शुल्क मागितल्यास मान्यताच रद्द..!




**कोल्हापूर :** मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांचे महाविद्यालयीन शिक्षण मोफत देण्याचा निर्णय दोन वर्षांपूर्वी अंमलात आला आहे, तरीही काही महाविद्यालये मुलींकडून शुल्क आकारत आहेत. त्या महाविद्यालयांची मान्यता रद्द केली जाईल, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील यांनी केली आहे.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुलींना मोफत शिक्षण देण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. यामुळे आर्थिक दुर्बल घटकांमधील मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणे सहजसोपे झाले आहे.

जवळपास ६०० हून अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी हे मोफत शिक्षण दिले जाते. मात्र, निर्णय घेऊनही अनेक कॉलेज मुलींकडून फी आकारली जात असल्याचे काही लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले होते.

याची दखल घेत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यापुढे अशा प्रकारे शिक्षण शुल्क आकारणाऱ्या कॉलेजची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. शिवाय, अतिरिक्त शुल्काच्या माध्यमातून विद्यार्थिनींची फसवणूक केली जात असून, यापुढे अतिरिक्त शुल्कही नियामक समितीच्या अखत्यारित आणण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले आहे.

त्यामुळे मुलींकडून, असे शुल्क कोणतेही कॉलेज आकारत असेल, तर त्या–त्या विभागीय सहसंचालकांकडे तक्रार केल्यास संबंधित कॉलेजवर कारवाई होणार आहे.

**...तरीही महाविद्यालये वसूल करतात शुल्क : व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी मुलींना मोफत शिक्षण दिले जात असले, तरी प्रतिपूर्तीची रक्कम सरकारकडून वेळेत कॉलेजला दिली जात नसल्याने अनेक कॉलेज मुलींकडून शुल्क घेत असल्याच्या तक्रारी होत्या.**

**व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुलींना मोफत शिक्षण आहे. जर अशा शिक्षणासाठी कोणत्याही कॉलेजने शुल्क मागितले, तर थेट सहसंचालक कार्यालयाकडे तक्रार करा. – डॉ. प्रकाश बच्छाव, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर.**

**सहा हजारांपर्यंत मिळतो निर्वाह भत्ता : निर्वाह भत्ता ही योजना शहरांच्या वर्गवारीनुसार विद्यार्थ्यांना १० महिन्यांसाठी वसतिगृह भत्ता दिला जातो. मुंबई–पुण्यासारख्या शहरांसाठी दरमहा ६,००० रुपये (एकूण ६०,००० रुपये), महसूल विभागाच्या ठिकाणी ५,१०० रुपये आणि तालुका स्तरावर ४,८०० रुपये दिले जात आहेत.**

***

# काळ बदलला! गंगापूरमध्ये मुलगीच आली मुलगा पाहायला; जुन्या रूढींना दिला कायमचा छेद गंगापूरच्या तरुणाने लग्नाचा खर्च उचलून जपली माणुसकीची नाळ



नवरीच्या आत्मविश्वासाला चष्म्याची साथ... आणि नवरदेव मात्र विचारात गढलेला



**पूर्वी मुलगी पाहिली जायची, आज मुलगी निर्णय घेते आहे. पूर्वी मुलगा अटी ठेवायचा, आज मुलगी अटी स्पष्ट करते आहे. आणि म्हणूनच... काळ फिरला आणि हुंडा उलटला आहे. आता मुलींचा काळ आला आहे. – बी. जे. लोणे, पत्रकार, रायरी**

